म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक मा. रा. पुणेकर

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव रंभा

माधवसिंग राजारामसिंग पुणेकर

व

प्रकाशक

खंडेराव जनार्दन इंजिनियर

भडोचें येथें सेंट्रल गुजरात प्रेसांत छापिलें
सन १[illegible]१.

सन १८६७ च्या पंचविसाव्या आक्टाप्रमाणें मते

२५

ची

## पुस्तकार्पण.

रावसाहेब खंडेराव जनार्दनजी

बडोदें राज्यांतील एक्झीक्युटीव इंजिनियर

यांस

त्याचें चातुर्य, धूर्तपणा, प्रेक्षकता, विद्येची अभिरुचि

आणि स्वदेश उन्नतिविषयीं उद्भवलेले

सुविचार व सुकीर्ति ऐकून

अत्यादरें हें पुस्तक

ग्रंथकर्त्यानें अर्पण केलें असे.

सन १८९१.

वडोदें " सेंट्रल गुजराथ "

आणि

अमदावाद " हिंदुस्थान " प्रेसांत छापिले.

श्रीराम.

# प्रस्तावना.

सांप्रतकाळीं विद्येची भरभराटी होऊन माझ्या शेंकडों स्वदेश बांधवांनीं आपआपल्या बुध्द्यनुसार स्वदेशभाषेची सेवा करून अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. कोणी अनेक वीर पुरुषांचे इतिहास लिहिले आहेत. कोणी स्वकल्पित कादंबऱ्या रचून प्रसिद्ध केल्या आहेत. कोणी नाटकांच्या सरणीवर पुस्तकें रचून नाटककारांस नाटक रूपानें दाखविण्यास सुलभ व्हावें ह्या हेतूनें नाटकें रचिलीं आहेत. सारांश ज्यांनीं त्यांनीं आपआपल्या बुध्द्यनुसार प्रयत्न करून आपलें कर्तव्यकर्म बजाविलें आहे, व असे करितां करितां कालांतरानें तरी आपल्या देशांत उत्तम व सुबोधक पुस्तकांचा भरणा व त्यापासून आपल्या देशाची सुधारणा दिवसें दिवस अधिकाधिक होत जाईल हें निर्विवाद आहे.

सांप्रतकाळीं आपल्या देशांत नाटककार मंडळ्याही बऱ्याच झाल्या आहेत; व नाटकाविषयींची गोडीही आपल्या लोकांस बरीच लागली आहे. सांप्रतकाळीं आपले लोक स्त्रियां समवेत लहान थोर एके ठिकाणीं जमून, मुलांबाळांसहपरिवार आपल्या श्रमाचे पैसे खर्च करून, त्या परिवारास आपल्यासह सुबोध व मनोरंजन उत्तम होईल या समजुतीनें नाटकें पहावयास जातात. तर अशा मोठ्या समाजांत आपल्या लोकांचें मनोरंजन व त्यांस सुबोध प्राप्त होऊन, सदाचरणास प्रवर्त होतील असा ठसा आपल्या अबालजनांवर वठण्याविषयीं प्रयत्न करणें हें किती अवश्य आहे; ह्याचा विचार करणें अत्यंत जरूर आहे; एतदर्थ मी आपल्या अल्प बुध्द्यनुसार हें स्वकल्पित नाटक रचून हितेच्छु व सुधारणेच्छु नाटककारांस दिलें आहे. मला एका कवीच्या दोन आर्या आढळल्या त्यांकडे लक्ष ठेवून ह्या उद्योगास मी प्रवर्त झालों:—

रंग नसे मयुरासम तरी कागें पंख काय टाकावे ॥
गान नये मयुरासम अल्प रितीं कां तरी न म्यां गावें ॥ १ ॥

बाल हुशार नसे बहु परि बोला बोबड्या न तें सोडी ॥
विद्वज्जनहो माझ्या अल्पमतीची तशीच घ्या गोडी॥ २ ॥

ह्याक ीचे विचार मला अतिशय आवडल्यामुळें हें नाटक अल्पमतीनें रचून तयार केलें.

ह्या माझ्या नाटकांत रंभा नांवाची स्त्री मुख्यपात्र असल्यानें तेंच नांव ह्या ग्रंथास दिलें आहे. ह्यांत सर्व लहान मोठ्या मिळून २९ प्रवेशांची योजना केली आहे. पांच अंकांतील प्रत्येक प्रवेशांतील पात्रांचे भाषण चटकदार असून त्या प्रत्येक भाषणांत सुबोध होऊन मनोरंजन व्हावें अशाविषयीं माझ्या अल्पमतीनें होईल तितका प्रयत्न केला आहे. सारांश हें स्वकल्पित नाटक रचून संसारांत नेहमीं घडणाऱ्या गोष्टींचे हुबेहुब चित्र प्रेक्षकजनांचे अंतःकरणावर उठावें. नाटक पहात असतां ज्या ज्या व्यक्तीमध्यें जो जो निर्गुण असेल त्याविषयींचा पश्चात्ताप व खेद त्या त्या व्यक्तीस झाल्यावांचून कदापि राहाणार नाहीं. व परिणामीं आपल्यामधून हें दुर्गुण जावेत अशा विषयांचा बोध होईल, सद्वर्तनीं व पतिचरणीं तत्पर राहण्याऱ्या स्त्रियांना हें नाटक पाहून अत्यंत आनंद होईल व तसें राहण्याबद्दल त्यांचा जास्ती सदृढ संकल्प होईल. सदाचरणानें वागलें असतां, परमेश्वर संकटांतून दूर कसा करितो व परमेश्वरास विसरून विषयांत बुडणाऱ्या मनुष्याचे परिणामीं हाल कसें होतील हें थोडक्यांत सुरेखपणानें दाखविलें आहे. आतां हा माझा प्रयत्न सर्वमान्य होऊन मी ह्मणतों ह्याचप्रमाणें सर्व रसिक सज्जन लोक ह्मणतील तेंव्हांच माझा इच्छित हेतू सिद्धीस गेला असें वाटेल. हा माझा प्रयत्न प्रथमारंभींच असल्यामुळें जरी माझ्या ह्मणण्याप्रमाणें सर्व गोष्टी सिद्धिस गेल्या नसतील, तरी जी कांहीं सेवा मी बजाविली आहे ती अवलोकनांत घेऊन हंसदृष्टीनें गुणाकडे लक्ष देतील अशी आशा धरून सांप्रतचा हा मी आपला लेख पुरा करितों.

**माधवसिंग राजारामसिंग पुणेंकर**
ग्रंथकर्ता.

# रंगभुमी.

(सुत्रधार पडद्या बाहेर येऊन चहूंकडे रंग उधळून प्रार्थना करितो)

**सुत्र.**— हे जगदिश्वरा, तूं आपल्या इच्छामात्रें करून हे सकल ब्रह्मान्ड उत्पन्न केलेंस, व तूं आपल्या विलक्षण सत्तेनें ह्या विश्वाचें पालन करितोस, तुझ्या अघटीत लीलेचा विचार करितां आह्मां क्षुद्र जिवांची मती कुंठीत होते असा जो तूं विश्वंभर तो तुला माझा अनन्यभावें नमस्कार असो. (इतक्यांत पडद्या बाहेर नटी येते.)

**नटी**— प्राणनाथ, हें काय तुमच्या हातीं आहे, आणि हे सकल जन कशासाठीं जमले आहेत, आणि हा उच्छाह कसला हें मला कांहीं समजत नाहीं, तरी ह्या दासीस कृपा करून सागाल काय?

**सुत्र.**— प्रिये, तूं या प्रसंगीं आलीस हें फार चांगलें जहालें, सखे या ठिकाणीं मी या सभाजनांच्या मन रंजनार्थ येक सुरस कल्पित कथाभाग नाटक रूपानें करून दाखविणार आहें.

**नटी**— (दचकून) काय? आपण आतां नाटकाचा कां धंदा करणार? जळो तीं नाटकें या नाटकांनीं तर आमच्या देशाचा सत्यानाश वाळला, आमचीं हजारों कुटुंबें भिकेस लागलीं असा हा मेला हलकट धंदा करण्याचा नाद केव्हां पासून आपण लाऊन घेत-लात आपण आतां नाटक करूं लागलात ह्मणजे पुढें माझी गती कशी होणार? व मी या पुढें आतां काय करावें तें तरी सांगा?

**सुत्र.**— (आपल्या मनाशीं हर हर या मुर्ख स्त्रिची नाटका विषयीं काय ही कुच्छित कल्पना) अग नाटक करणें हें का तूं ईतकें हलकट समजतेस नाटक भगवत् भक्ता वांचून कोण रचितो व रचलेलें नाटक रंगभुमीवर हुबेहुब प्रेक्षक जनास करून दाखविणें हें फार कठीण कर्म आहे, आणि ह्या दोन्ही गोष्टी गणपाना वांचून होत नाहींत. वेडे हें सारें विश्वतरी विधात्याचें नाटकच आहे, हें अफाट नाटक क्षुद्र जिवांच्या लक्षांत येत नाहीं, ह्मणून विद्वान लोक या विश्वातील अनेक घडलेल्या किंवा सांप्रत घडत अस-

लेल्या गोष्टींचें हुबेहुब वर्णन करून सकल जिवांस बोध व्हावा येतदर्थ जो प्रयत्न करितात, तो तूं इतका निच समजतेस काय?

**नटी–** प्रिया किती तरी मेली माझी समजुत करून मला फसवावयाचें अहो, "नाटक रचणें हें भगवत् भक्तांचें काम आहे, हें रचण्याला मोठा विद्वान पाहिजे, नाटक करणारे मोठे गुणी असले पाहिजेत" असें आपण ह्मणता याचें मला मोठें नवल वाटतें, हीं मेलीं नाटकें आपल्या देशांत पायलीचीं पंद्रा जहालीं आहेत, आमच्या कोंकणांत पायलीभर भात घातला कीं आपलें नाटक तयार. नाटक करणारे लोक गुणी असले पाहिजेत असें आपण ह्मणतां. हो, हो, केव्हडा पण गुण, बहुत करून गांजेवाल्यांचे दुकानांतील गांजा यांच्या येथेंच खपतो. दारू पिऊन तर सदां बिचारे धुंद, संवसार नाहीं, विचार नाहीं, आपल्या संवसारावर, अब्रुवर व बायका मुलांवर पाणी सोडून मात्र देशो देशीं मेले हिंडत असतात, त्यांची प्रौढी मला किती सांगावी कोणजाणें.

**सुत्र.–** (हंसून नाटकांची स्थिती खरोखर आमच्या देशांत अशी जहाली आहे, ही अशी बोलते, यांत हीचा तरी काय दोष) प्रिये, तूं ह्मणतेस हें तरी येका अंशानें खोटें नाहींच, पण असें जरी जहाले तरी उत्तम ग्रंथकारांस, किंवां नाटक करून दाखविणारे उत्तम जनास मात्र हा देशारोप शोभणार नाहीं, आतां खऱ्या गुणा वांचून कोणतीही गोष्ट करणें हें खरोखरच हानीकारक आहे व त्या प्रमाणें त्याचा धंदा करणारे लोकही थोर व समंजस असले पाहिजेत, यांत बिलकुल संवशय नाहीं. असो, प्रिये तूं आतां ही सारी कल्पना सोड, आणि स्वस्त चित्तानें हें नाटक पाहा, ह्मणजे नाटकाची किंमत किती आहे, आणि जगांस सुधारण्यास हें किती बलवत्तर साधन आहे हें पूर्णपणें तुझ्या लक्षांत येईल.

**नटी.–** बरं, सध्या असा तो कोणता भाग आपण करणार अहांत कीं ज्याच्या योगानें मला व या साऱ्या सभाजनांस अनंद होईल.

**सुत्र.–** प्रिये माझ्या नाटकांत सुवर्णपुरांतील रंभा नावाची एका सरदारा-

ची कन्या आपल्या दासी सहवर्तमान हिरा बागेंत हवा खाण्यास्तव येईल, तेथें तीची व त्या शहरच्या राजपुत्राची भेट होईल, ती गंमत तूं पहा तर खरी?

**नटी.**–प्रिया अहो पण त्या बागेंत त्या राजपुत्राची व तिची भेट होऊन नंतर तिचें त्याच्याशीं लग्न वगैरे होणार आहे कीं काय?

**सुत्र.**– खरे ती राजपुत्राशीं लग्न करण्यास योग्यच नव्हती, ती एका कुमती नावाच्या दुष्ट स्त्रियेच्या बहिणीची मुलगी होती, व तिचे पालन पोशण वगैरे कुमतीनें केलें.

**नटी.**–काय? कुमती!! वाहवा!! मग काय विचारावें, जी स्वतःच कुमती तिजकडून सुमती कोणास मिळणार? प्रिया, तर मग खरोखर हें नाटक मी मन लावून पाहाणार, व हें सारे सभाजनही पाहातील असें वाटतें.

**सुत्र.**– माझ्या कडून मी आपला प्रयत्न मनोभावें केला आहे, मग तें उत्तम किंवा कनिष्ट याची परिक्षा करणें हें या सज्जनांचें काम आहे, व हें उत्तम रितीनें मजकडून निरविघ्नपणें शेवटास नेऊन मजला यश देणारा तो परमेश्वर समर्थ आहे. (असें ह्मणून पडद्याचे आंत जातो.)

(पडदा पडतो.)

# सुवर्णपुर नगर.

## अंक १—प्रवेश १

### पात्रें.

१ रंभा..................( एका सरदाराची कन्या. )
२ गिरिजा............................( रंभेची दासी. )
३ राजपुत्र शूरसेन (सुवर्णपूर नगरीचा राजपुत्र. )

( रंभा बागेमध्यें फिरत आहे, व तिच्या जवळ तिच्या दासी वगैरे पंखा हातीं घेऊन उभ्या आहेत. )

**रंभा**—ह्या बागे मध्यें तो प्राणसखा आज मला भेटेल काय?

**गिरि**—बाईसाहेब आपण कोणाची वाट पहात आहांत! आपल्याला वाड्यांत यावयाचें नाहीं काय?

**रंभा**—दासी, अग माझा प्राणाचा सखा कोण? आणि हें चित्त कोणासाठीं इतकें वेडें जहालें आहे तें तूं ओळखलें नाहींस काय?

**गिरि**—बाईसाब, आह्मीं आपळे जोडे उचलनाऱ्या दासी, आपल्या पायाच बटकुर, आपलं मन कशावर गेलं है हें मला कसं समजल? बाईसाब आपलं मन येखाद्या बागतल्या फुलावर गेलं आसल आणखीन तें काय असणार?

**रंभा**--गिरजे, अग तूं ह्मणतेस हेंच खरें, तूझें ह्मणणें तरी खोटें नाहींच. ह्या आपल्या शहरांत जीं कांहीं मानवीरूपीं पुष्पें आहेत त्या पुष्पांतच जें परम सुगंधीक नाजुक पुष्प त्याचीच मी इच्छा करितें आणखी तें काय?

**गिरि**—बाईसाब, आपण काय ह्मणतां तें बाई मला समजत नाहीं पण बाईसाब तें फूल तुह्मीं आपल्या हातानं तोडु नका, जर तुह्मीं आपल्या हातानं तोडाल तर त्याच काट तुह्मांला लागतील मंग त्या पासुन बाईसाबाला लई दुःख होईल.

रंभा– शाबास, ही मेली किती शहाणी आहे? हिला वेडी ह्मणावी तर ह्या आपल्या वेडेपणाच्या बोलण्यांत जणुं काय माझ्या बोलण्याचा झोंक समजून त्याचें उत्तर देते असा इच्या बोलण्याचा अर्थ होतो. गिरिजे अग मीं स्वत: जर तें फूल तोडीलें नाहीं तर मग त्या पुष्पास आधीं स्पर्श माझा व्हावयाचा नाहीं मग तें दुसऱ्याचे हातून माझ्या हातांत येणार? हें तूं कसें समजत नाहींस.

गिरि–महाराज आपण मोठ लोक आपल्याला सगळ समजत है! पण माझ येवढंच सांगण कीं बाईसाबाच हात लई नाजुक आणि गुलाबाचा झाडाला लई काट असत्याती ह्मणून एखादा आपल्या हाताला लागून तरास होईल, अस बगुन मोगऱ्याचं फुल तोडाल तर लई बेस होईल.

रंभा– अरे या बोलण्यांत हिनें मला असें सुचविलें कीं, अग रंभे तूं राजपुत्रावर वेडी होऊं नकोस, हें काऱ्याचें झाड आहे, कदाचित् ह्याच्या काऱ्यानें तुला दु:ख होईल; करितां आपल्या योग्यतेला शोभेल असाच वर पाहून त्याच्यावर मन ठेव, इचे ह्मणणें हें खरें असेल काय? छे: असल्या साधारण बटकीला ह्या गोष्टीचें सौख्य कोठून माहीत असणार?

गिरि– बाईसाब, धाकल्या माहाराजांची स्वारी पण बागमंदी आलीया जनु. ते बगा रामोरच्या कारंजावर उभ हैती आणि येकटच आपल्याकड बगत्याती जनु.

रंभा– खरंच अग तो माझा प्राण विसावा माझ्या करितां बागेंत येऊन माझिच वाट पहात उभा आहे. गिरिजे, अग चंद्रे, तुह्मी कीनी बाई, एक बाजुला उभ्या राहा.

गिरि–जी बाईसाब, आह्मीं आपल्या जातों आणि बाहेरच्या बंगल्या जवळ गाडी पाशीं उभ्या राहतों. बाईसाब, आल जनु आपल्या जवळच आल (असें ह्मणून गिरिजा व चंद्री तेथून निघून जातात.)

रंभा– गिरिजे, अगे चंद्रे तुह्मी मला सोडून कुठे जातां मला बाई भिती वाटते, अग मला सोडून गेल्यावर मग मीं येथें कोणाशीं बोलावं!

( असें ह्मणून त्यांच्या पाठीमागें जाऊं लागते इतक्यांत राजपुत्र समोर येऊन दोन्ही हातानें आडवितो. )

शूर.– कां? मी नाहींका आपल्या जवळ, माझी कां भिती? मला पाहून आपणास भिती वाटत असेल तर मग असला प्राणी तरी जगांत कशास पाहीजे.

रंभा– माहाराज, आपल्या साह्यानें तर सर्व प्रजाजनाची भिती नाहींशी होते, मग मलाच भिती अधीक कशानें वाटणार? परंतु जर आपल्या मनांत प्रिती असली तर मात्र भिती दूर होणार; नाहीं तर त्या प्रितीला कां एक अकाराचा उपसर्ग असला ह्मणजे मात्र कल्याणच व्हावयाचें.

शूर.– नाहींग नाहीं सखे, जर तुजवर माझी प्रिती नसती तर पहा! वेड्या सारखा बागेंत एकटा तुझ्या दर्शनाची वाट पहात कां बसलों असतों, हें प्रीति शिवाय होत असेल काय?

रंभा– महाराज अहो हल्लीं जें आपणांस वाटतें ती प्रीती नव्हे (दातां खालीं जीभ चाऊन गप्प बसते.)

शूर.– सखे नकोग नको, तुझ्या ह्या सुंदर मुखकमलांत असें हें कठीण वाक्यशर शोभत नाहीं. प्रीति नव्हे तर मग काय ह्मणावें.

रंभा– महाराज, जर आपण आपल्या सदयीं अतःकरणांत जर मजशिवाय दुसरीस थारा देणार नाहीं तर मीही आपल्या भाषणांत हे असले अमंगल शद्ब उच्चारणार नाहीं.

शूर.– सखे, तर मग सांग पाहूं मीं काय करावें ह्मणजे मग तूं या निर्दयास आपला ह्मणशील.

रंभा– महाराज, जे निर्दय असतील त्यास मी माझा ह्मणणार नाहीं नर आपण दयाळू असाल तर कदाचीत् माझे व्हाल?

शूर.– (काय करावें कांहीं इलाज चालत नाहीं; इच्या पुढें तर एक शब्द उच्चारण्याची सुद्धां मारामार पडते, असें मनांत ह्मणून) सखे, तूं आपल्या विलक्षण सौंदर्याचे जाळें पसरून या दीनास मोहून टाकिलें आहेस; अग तुजसीं एक शब्द सुद्धां माझ्यानें नीट

बोलवत नाहीं.

**रंभा**– महाराज जे दीन असतील त्यांच्या तर आह्मी मुळींच नादीं लागूं नये. आमचा सांभाळ करणारा तर मोठा शूरच पाहीजे.

**शूर.**– सखे, आतां नको छळूं, मला क्षमा कर; परंतु एकवार तूं माझी कशी होणार हें मात्र सांग? (असें ह्मणून जवळ जातो इतक्यांत रंभा दुर जाऊन उभी राहते.)

**रंभा**– महाराज, मीं आपलीच आहे आपण माझ्याशीं लग्न करा ह्मणजे झालें, मग जन्म पर्यंत आपल्या सेवेंत ही दासी तत्पर राहील.

**शूर.**– (हे शद्ब कर्णीं पडतांच जरा खिन्न मुद्रा करून ह्मणतो) सखे जें तुझ्या मनांत आहे तेंच माझ्या मनांत आहे, परंतु काय करूं माझें जिवीत परस्वाधीन पडलें (माता ती अशी, पिता ह्मणावा तर तोही स्त्री आधीन पडला) तेव्हां ते जें करतील तसें मला ऐकिलें पाहिजे सर्व सत्ता त्यांचे हातीं.

**रंभा**– सख्या, जर आपल्या मनांतूनच मला वरण्याचें असेल तर मग आपणांस कांहीं कठीण नाहीं आणि उगीच सत्रा वहाणें करणें असेल तर मात्र इलाज नाहीं.

**शूर.**– तर तूंच सांग मीं कसें करावें, जर मी गादीवर बसलों तर मात्र निःसंशय तुझ्याशीं लग्न करीन, परंतु ती फार पुढली गोष्ट आहे; लग्नासाठीं आजच पित्याचें मरण ईच्छिलें पाहिजे मग मात्र हा आपला संकेत सिद्धीस जाणार व कदाचित् जरी हीं गोष्ट सिद्धीस जाण्याचा प्रयत्न केला तरी त्याला फार काल पाहिजे इतक्या कालांत तुझें लग्नही होऊन जाईल मग अशी गोष्ट तरी करून काय उपयोग.

**रंभा**– सख्या, जर आपल्या मनांतच ही गोष्ट कर्तव्य असली तर यांत मोठेसें कठीण नाहीं पण बाई, मी कशाला असले वाईट शद्बाचा उच्चार करूं परमेश्वर त्यांनां मार्कंडेय याचें आयुष्य देवो मला फक्त आपली जाहली ह्मणजे पुरे.

**शूर.**– असो तूज वांचून तर कांहीं मला सुचत नाहीं. आणि तूं तर या

चित्ताचें समाधान करीत नाहींस तेव्हा कदाचीत् माझ्याच आयुष्याचे दिवस संपले असतील तर कोणास कळे. (असें ह्मणून राजपुत्र धरणीवर पडतो)

**रंभा**– सख्या, काय असा अनीवारपणा अहो मी आपलीच आहें, आपल्यासाठीं जें माझें होणार असेल तें होईल; आपण असे घाबरतां कां, मी आपणांस उद्यां येऊन भेटेन.

**शूर.**– सखे, आतां या शरिरास थोडासा धीर आला, परंतु तूं मला कशी भेटणार? कारण तुझ्या घराण्याशीं आमचे तर खडाष्टक जुंपलें आहे. तुला पहातांच आईच्या पायांची आग तर मस्तकास पोहोंचेल व त्या पासून भलताच अनर्थ होईल.

**रंभा**– सख्या, तुह्मी कांहीं काळजी करूं नका, मी कशी भेटणार हें सर्व मी आपल्या दासी कडून आपणांस कळवीन, असें ह्मणून गाडीकडे जाते, व राजपुत्रही तेथून चालता होतो.

## प्रवेश २ रा. अंक १

### पात्रें

१ **कुमती**......................(रंभेची मावशी)

२ **रंभा**....................................

**रंभा**– (एकटीच आपल्या मनाशीं विचार करीत बसली आहे इतक्यांत तिची मावशी येते.)

**कुम.**– बये, काग आज अशी तूं एकटी बसली आहेस. काय? माझ्या बयेजवळ कोणी दासी सुद्धां नाहींत? गिरिजे, अग चंद्रे, ह्या रांडा आहेत तरी कोठे?

**रंभा**– मावशी, तुझ्या कृपेनें सर्व कांहीं मजला आहे, तुझी पूर्ण कृपा मजवर असतां मला तें काय कमी आहे? पण मी तुजजवळून गेल्यावर मात्र माझा परिणाम काय होईल तो होवो.

**कुम.**– बये, तुला या हृदयाशीं लावून लहानाची मोठी केली ती काय माझ्या दृष्टीआड होण्या साठीं? माझ्या बयेसाठीं हिकडचे जग

हिकडे करीन, पण माझ्या लाडकीला डोळ्याआड करणार नाहीं. बये तूं कसली चिंता करतेस? अग हाच राजपुत्र याच्या दृष्टीस मात्र तूं एक वार पडलीस ह्मणजे पुरे, मग माझ्या बयेच्या पायाचा गुलाम होऊन जाईल आणी मग माझी बया सगळ्या राज्याची मालकीण जाहली, मग बयेच्या नखाची सुद्धां बरोबरी कुणी करणार नाहीं.

रंभा– अग मावशी, तूं ह्मणतेस हें सर्व खरें, पण काय बाई ती ह्मण आहे कीं, "बनीया देता नहीं पुरा तोल" या ह्मणी प्रमाणें, अग येवढा मोठा राजपुत्र असून मी यकःश्चीत त्याच्या राज्यांतील सरदाराची मुलगी, त्याचें लग्न माझ्याशींग कोठून होणार? असें होणें मुळींच संभवत नाहीं.

कुम.– बये, अग तूं अशी निराश कां होतेस, जरी आपण सरदार आहोंत तरी आपल्या जवळ द्रव्यकां थोडें आहे? माझ्या लाडकीसाठीं आज मीं असा एक एक दागिना करून ठेविला आहे कीं त्या मेल्या सुडक्या राज्याच्या बापानेंही पाहिला नसेल.

रंभा– मावशे, बाई तुझें बोलणें कांहीं चमत्कारिकच वाटते, अग द्रव्य असल्यानें कां कोठें राजा पती मिळतो! एक द्रव्य, योग्यता, आणि दुसरें प्रालब्ध असलें पाहिजे; नाहींतर द्रव्यानें जर राजा पती मिळतो असें असतें तर आपल्या शहरांतील खेमचंदानेंही आपली मुलगी राणी केली असती.

कुम.– माझे बये, तूं अशी निराश होऊं नकोस, अग तूं सर्व गुणानें शाहणी आहेस, विद्वान आहेस, नानाविध गुण तुजमध्यें भरले आहेत, मग प्रालब्ध तें तुजला काय करील. अग, भिकारड्या शेंबड्या, खेंबड्या, अशा ज्या असतील त्यांनां प्रालब्ध आडवें येणार, आपल्या श्रीमंताला प्रालब्ध तें काय करणार! नराशी तूं सजून नटून संध्याकाळचे वेळेस बागेंत जात जा, ह्मणजे झालेंच काम असें समज. त्याची स्वारी आली ह्मणजे जरा गालांतले गालांत हांसावें.

रंभा– जा बाई, मला तें कांहीं नको हंसणें न बिसणें; मावशी तूं जेव्हां हंसतेस तेव्हां तर तुझे तोंड उलटें वाईट दिसते, मग बाई असें जर मी हंसलें तर त्यांची उलटी मजवर अप्रिती होणार?

कुम.– अहाग चावट पोरी!! अग माझ्या तोंडांत दांत नाहींत व तुझ्या सारखे गुलाबी गालही नाहींत ह्मणून माझें हंसणें वाईट दिसते, ह्मणूनकां तुझें हंसणें असें दिसणार? माझी बया जरा हंसली कीं जमीनीवर रत्नें पडलीं कीं काय असा भास होतो.

रंभा– पुरे तें मेलं किती माझं वर्णन करावं कोणजाणें, मावशी आतां मी निजतें.

कुम.– बये, आतां पुढें तूं राजाची पट्टराणी होणार, तेव्हां त्याचें मन रंजविण्यासाठीं हजारो गुण तुजमध्यें असले पाहिजेत, तरच त्यानें कितीही स्त्रीया केल्या तरी त्या सर्वांवर तुझा तोरा राहील.

रंभा– तर मावशी, मग मी आतां काय करूं ह्मणतेस तें तरी सांग.

कुम.– अग ते आपले शहरांतील मोठे नामांकित गवई आले आहेत त्यांच्या कडून चार चिजा शिकून ठेवाव्यात. ख्याल, टप्पा, गज्जल, कुठे भैरवी वगैरे रागांची जरा माहिती करून घ्यावी, माझ्या तर मनांत तुला जरा नृत्यांचेंही अंग शिकवावयाचें आहे पण तें तुला साधेल कीं नाहीं कोणजाणें!

रंभा– काय? मावशी तूं मला नाचावयास का शिकावेणार आणि नाच शिकवून मला कसबीण करणार कीं काय?

कुम.– अग वेडे, काय हें तुझ्या मनांत घाणेरडे विचार भरले आहेत! अग नाच का फक्त कसबीणी शिकतात, अग वेडे तूं चांगली शिकलेली विद्वान असून तुझ्या मनांत असे कसे विचार येतात? अग आपण कां भिकारी आहोंत, कसबीणी तर पोटासाठीं शिकतात. माझ्या बयेला का कांहीं कमी आहे! आज बयेसाठीं नुसते हिऱ्याचे दहा लक्षाचे दागिने मी करून ठेविले आहेत.

रंभा– मावशी, नाच शिकून मला काय करावयाचें आहे?

कुम.– बये अग पुराणांतरी लिहिलें आहे कीं देव आणि राक्षस यांनीं समुद्र मंथन केलें त्या वेळीं समुद्रांतून अमृत निघालें, त्या वेळीं देवांचें आणि दैत्यांचे भांडण लागलें त्या समयीं साक्षांत जगन्नियंता परमेश्वर मोहिनी स्वरूप घेऊन आला, तेव्हां तिचें तें स्वरूप पाहून सर्व देव आणि दैत्य तिला मोहून गेले, त्या वेळीं तिनें तें अमृत आपल्या हातीं घेऊन नृत्यास आरंभ केला, मग एका हातानें दैत्यास मदिरा व दुसऱ्या हातानें देवांस अमृत पाजिलें. तेव्हां ही सर्व भूल देव आणि दैत्यास तिच्या हाव भाव, नृत्य व गायन कलेनेंच पडली कीं नाहीं?

रंभा– खरेंच मावशी नृत्य व गायन हा तरी विषय मोठा मनोरंजकच आहे. मी बाई खरोखर शिकणार, पण-नको.

कुम.– कां? पण नको ह्मणावयाला काय जहालें.

रंभा– अग मावशी, परवां मी किनी ते आपले प्रसिद्ध गवई कायग त्यांच नांव, असो मेला मसणोबा कां असेना त्याला मी सांगितलें कीं मला एकदोन चिजा बसवून द्या; पण तो मेला मला कांहीं भलतेंच बोलला.

कुम.– काय भलतेंच ह्मणाला?

रंभा– हें पहा तो ह्मणाला कीं (दिलसे दिल मिले वगर, सच्चे गानेका सीकना नही होता.) आणखी ह्मणाला "सरकार ये गुन कुछ पैसा खर्च करनेसे हासल नहीं होता, कुछ पैसा आवर कुछ खिदमत" मी ह्मणालें वस्तादजी आह्मी बरें काय आपली खिदमत बजवावी? माझी मावशी तुह्मास जर कांहीं बक्षीस पाहिजे असल्यास देईल, पण मेला तो काय ह्मणाला कीं "बडे बडे राजा लोक सुन्नेके तोडे लेकर हमारे पीछे पांव पडते फिरते है, लेकिन, हाम वस्ताद लोक उनके छायामें खडे नहीं रहेते, आपकी नजर और खूपसूरत नयाज देखकर, हमारा दिल आपपर बहाल हो चुका है" तेव्हां पासून तो मेला मजजवळ आला कीं कशेसेच डोळे आणि तोंड करूं लागतो.

कुम.– अग वेडे मग तर फारच चांगले, अशा मेल्यांना एक फुटकी कवडी न देतां सर्व गाणें त्यांचे पासून शिकून घ्यावें, हे मेले गुणी लोक असेच उल्लू असतात.

रंभा– काय? आपण त्यांच्याशीं निंद्य कर्म करावें?

कुम.– अग वेडे पोरी न करण्याला काय जाहलें असल्या रसीक गंधर्व लोकाशीं जर न रममाण व्हावें तर मग काय गावांतील अरसीक व नीच जनाशीं?

रंभा– मावशी जर करितां उद्यां महाराजाची मी पट्टराणी जाहलें तर मग कसें होईल,

कुम.– अग वेडे, काय खुळी पोर आहे ही! तूं महाराजाची पट्टराणी झालीस ह्मणून काय झालें. परपुरूषांशीं निंद्य कर्म केलें ह्मणून त्याचा छापा कां आपल्या तोंडावर असतो.

रंभा– अग तस नव्हें पण उष्ट ताटच किनी त्यांच्या हातीं लागणार.

कुम.– मग लागेना लागलें तर त्यांत काय झालं. नाहीं तरी आपल्या श्रीमंताच्या घरच्या मुली साऱ्या स्वच्छच अशा कुठें कोणास मिळतात? गरीब भिकारडे अशिक्षीत लोकांच्या मुली पतिव्रता निघावयाच्या.

रंभा– पुरे बाई आतां तुझं तें बोलणं, मला झोंप येते, असें ह्मणून पलंगावर जाऊन पडते.

कुम.– गिरिजे, अगे चंद्रे, रांडा हो माझ्या बयेला जरा पंखा तरी घाला, बये मी पण आतां निजते हो. असें ह्मणून कुमती आपल्या पलंगावर जाऊन निजते.

(पडदा पडतो.)

## अंक १ प्रवेश ३रा.

### १ राजपुत्र शूरसेन.

(राजपुत्र पलंगावर पडला आहे, शिपाई घड्याळावर टोले मारतो.)

शूर.–(ह्या करवटीचा त्या करवटीवर वळतो पण झोंप लागत नाहीं

असें पाहून उठून बसतो.)

"काय करावें, त्या मन मोहिनीनें माझें चित्त वेडें करून सोडलें आहे, तिजवांचून आतां या मनास कांहीं सुचत नाहीं व ती तर कांहीं केल्यानें माझ्या हातीं येत नाहीं. बाबाचा विचार तर मज उलटच पडला ते तर ही गोष्ट कधींही मान्य करणार नाहींत; मग आई विषयीं तर सांगणेंच नको, ती तर या कामांत आपली संमत्ती कधींच देणार नाहीं. तिनें मला, रंभा स्त्री करावी असें जर बाबाला अनुमोदन दिलें तर बाबा तात्काल रंभेशीं माझें लग्न करून देतील, पण छट, नांव कशाला. आमच्या आईसाहेब तर तिकडचें नांव काढूं देणार नाहींत. खरोखर ह्या वेळीं ही माझी माता आणि तसाच पिता हे माझे हाड वैरी झाले आहेत. ह्या वेळेस या दुष्टांना कोणी जर ठार मारील तर त्या बहादरास मी आपलें अर्धें राज्य देईन, परंतु आतां रंभेच्या अधरामृताचें पान मजला कधीं मिळेल असें झालें आहे. आहारे आहा!! किंचित् तिच्या जवळ बसलों ह्मणजे मला असें वाटतें कीं स्वर्गींच्या इंद्रास देखील मी थप्पड मारली. काय तिचे ते नेत्र! अरे, माझ्या सारखा तिच्या नेत्र कटाक्षास भुलून गेला यांत नवल तें काय? पण प्रत्यक्ष तिला घडणारा ब्रह्मदेव जर या वेळेस पाहील तर तोही मोहीत होऊन जाईल. कांहीं असो तिचें येवढेंच ह्मणणें कीं नाहीं बाबास ठार मारावें; तर मग हा बहादर हेंच काम करणार. उद्यां सूर्य उगवतांच माझ्या मित्रास बोलावितों आणि त्यांच्या साह्यानें ह्याचे तुकडे उडवितों. असो आतां झोंप येई तों पर्यंत कांहीं तरी निशा घेतली पाहिजे त्या वांचून झोंप येणार नाहीं, असें ह्मणून कपाट उघडून एक बाटली काढतो आणि कांचेच्या प्यालांत घेऊन पितो, व पलंगावर पडतो.

(पडदा पडतो.)

## अंक १ प्रवेश ४ था

### पात्रें

१ विजया ........... (चंद्रशेखर राजाची सणी.)
२ मथुरा ............... (विजया राणीची दासी.)
३ चंद्रशेखर........... (सुवर्णपुरी नगरीचा राजा.)

### सुवर्णपुर नगर.

विजया आणि चंद्रशेखर.

**राणी**–काय करावं, मी वारंवार सांगतें कीं हा मुलगा आतां मोठा झाला आहे आतां याचें लग्न करून द्यावें अलिकडलीं हीं मुलें आणि त्यांतून आमचें त्यांना शिक्षण मग काय दिवाच सर्वोपरी लागणार. अरेरे!! राजेपणाचा आळ मात्र आमच्यावर आला आहे, पहा हाच मुलगा आमच्यापुढें गादीचा मालक होणार सर्व देशाची सत्ता याचे हातीं येणार तेव्हां पुढें हा राज्य कसें करील तें करो, आणि तिकडे तर अगदीं लक्षांतच नाहीं, आपण जास्त बोलावयास जावें तर स्त्रिया मोठ्या अगोचर असतात हा डाग आमचे मुखास आहेच. (असें बोलते आहे तोच मथुरा दासी येते.)

**मथु.**– बाईसाब, माहाराजांची स्वारी खालच्या चौकांत आली चोपदार पुकारतोया आले आले हिकडेच आले.

**राणी**–ठीक आहे. (असें ह्मणून राजा येतांच राणी हिंदोळ्यावर बसविते व आपण समोर उभी राहते.)

**राजा**–आज आपला मुखचंद्र कोमेजलेला दिसतो पण असें होण्याचें कारण कांहीं समजत नाहीं.

**राणी**–महाराज, आपण असतां आमचा मुखचंद्र कशानें कोमजणार, आह्मास कसली चिंता आहे आपल्या कृपेनें सर्व ऐश्वर्य, विलास परिपूर्ण भोगित आहों, एक महाराजाना ईश्वर दीर्घायु करो आणि आपल्या समोरच आमची गती होवो ह्मणजे आह्मी मिळविलें.

**राजा**–सखे, आज तुझी मुद्रा खरोखरच खिन्न दिसते सांग सांग माझ्या

कडून कांहीं अपराध तर झाला नाहींना?

**राणी**–प्रिया, नाहीं हो नाहीं, आपणा कडून कांहीं झालें नाहीं पण विनंती एवढीच कीं शूरसेन हा युवराजा आहे आणि आपले डोळे झाकले ह्मणजे तो आपल्या मागें गादीचा मालक होणार करितां त्यास कांहीं शुद्ध वळण लागावें अशी फार आशा आहे.

**राजा**–अग वेडे, हीच कां चिंता आज तूं घेऊन बसली आहेस? अग सिंव्हाच्या पोरास हत्तीचें गंडस्थळ कसें विदारण करावें हें काय शिकविलें पाहिजे? किंवा माशाच्या पिलांस पाण्यांत कसें पोहावें याविषयीं त्यांचे आईबाप प्रयत्न का करितात? अग तो अझून लहान अल्लड आहे, आतां दिवसोंन दिवस सुधरेल. आतां त्याचें लग्न मात्र यंदा केलेंच पाहिजे.

**राणी**–माझें ह्मणणें तरी येवढेंच आहे व त्यांत आपण लग्न तर करालच, आईबापांनीं आपल्या मुलाचें लग्न करून देणें यांत मोठें महत्व नाहीं, गरिबांच्या देखील मुलांचीं लग्नें होतात, मग आपण तर राजेच आहांत; आपण एक ह्मणतां हजारों देशींच्या राजकन्या उड्या टाकतील. पण जशीं लग्नाची काळजी आहे तसेंच त्याला योग्य शिक्षण सुसंगती व सद्वर्तनानें राहण्याची संवय लागली पाहिजे. अशी माझी दासीची विनंती आहे मग आपणास पसंत पडेल तेव्हां खरें.

**राजा**–सखे, खरोखर स्त्री असावी तर तुज सारखीच असावी. फार काय सांगूं मजसारखा भाग्यवान् पुरुष या पृथ्वीतलावर विरळाच असेल, कारण आज सार्वभौमत्वाचा अधिकार आणि तुजसारखी स्त्री सन्निध असल्यानें मजला तुझ्या शुद्ध आचरणानें धन्य केलेंस, हें पाहून जो आनंद झाला आहे त्याचें वर्णन करितां येत नाहीं, बरें प्रिये, रात्र बरीच जाहली आहे तर आतां चल सर्व सुखांत जें विश्रांती सुख परमेश्वरानें रंकापासून राजा पर्यंत एक सारखें दिलें आहे, त्याचा अनुभव घेऊं (असें ह्मणून राजा राणीस घेऊन पर्यंकावर जातो.)

(पडदा पडतो.)

## अंक १. प्रवेश ५ वा.

### १ राजपुत्र शूरसेन.

**शूर.**– काय करावें या रंभेनें तर विलक्षण माझें मन वेडें करून टाकिलें आहे, तिच्या प्राप्ती करितां नानाप्रकारचे कुतर्क माझे मनांत धांवत आहेत; घटकेंत माझ्या प्रत्यक्ष बापास ठार मारावें अशी कल्पना येते, तोंच अंगावर शहारे उभा राहून हें घोर पाप करण्यास मी तयार जहालों आहें असें माझ्या मनांत येतें. छेः हे दुष्टा नीच मना! इतका उन्मत्त कां झालास? अरेरे, मनुष्य या कामाच्या तडाक्यांत सांपडला कीं त्यास बरें वाईट कांहीं सुचत नाहीं. असो असें जरी माझें मन त्या मोहिनीवर गेलें आहे तरी चिंता नाहीं पण आपण असें घोर पाप मात्र करण्याचें मनानें आणूं नये; पण आज प्रियेच्या संकेता प्रमाणें पत्र येणार होतें तें कां बरें आलें नाहीं! असो आपण नित्या प्रमाणें बागेंत जावें ह्मणजे कदाचित् प्रिया पत्र पाठवील किंवा स्वतः भेटेल, चला तर जावेंच. (असें ह्मणून बागेंत जाण्यास सिद्ध होतो.)

## अंक १. प्रवेश ६ वा.

### पात्रें

१ रंभा.
२ गिरिजा ................ (दासी)
३ चंद्री ...................... ,,
४ सारजा .................... ,,
५ बकुळी .................... ,,
६ निळी ...................... ,,
७ कुमती ......... (रंभेची मावशी)

(रंभा आपल्या रंगमहालांत बसली आहे, चंद्रा व गिरिजा तिच्या दासी उभ्या आहेत.)

**रंभा**– गिरिजे, अग चंद्रे, (गिरिजा आणि चंद्री धांवत येतात.)

गिरि–जी सरकार आपल्या पायां जवळच आह्मी हजर हवींत.

रंभा– अग, जासूदाला स्वारीची वर्दी दे, मला आज बागेमध्यें जावयाचें आहे.

गिरि–जी सरकार हें बगा सांगतें, माझ्या बाईसाबाच्या कामाला उशीर तो कशाला?

रंभा– अग तूं कां स्वतः जाणार? तूं जाऊं नकोस.

गिरि–व्हय, जी महाराज स्वारीची वर्दी सांगावयास मला कशाला गेलं पाहिजे, सरकारच्या पायां जवळ बटकी कां थोड्या आहेत! सारजा नाहींतर कस्तुरीला पाठवून देतें.

रंभा– ठीक आहे, जा तर त्यांना सांग आणि माझी दागिन्याची पेटी लवकर आण.

गिरि–बाईसाब आज सगळं दागिन आंगावर घाला, बाईसाबाला लई चांगलं खुलत्याती, आकशी जणु बाईसाब चंद्राच्या कळावाणी झळकु लागत्याती.

चंद्री– बाईसाबाची वेणी मी घालणार. आज माझ्या बाईसाबाची अशी वेणी घालतें कीं जणुं काय नागीनच येटोळा घालून बसली आहे.

सार– अग चंद्रे, हा बग शालू बाईसाबाला आज मी नेसविणार, बाई-साबाच सगळं अंग जर शालूंतून न दिसेल तर मग तो शालू काय! काल माझ्या बाईसाबाला तें जड जड जरिचं मेलं गोदडं नेसविलं व्हतस कीं.

रंभा– अग रांडाहो, तुह्मीच आपसांत भांडता कीं माझी वेणी लवकर घालता? रांडानूला बोलावयाला फार पाहिजे चंद्रे आटपग लवकर. (असें ह्मणून आरशांत वेणी पाहते आणि ह्मणते ठीक है.) अग कोण ग मेली ती बकुळे, अग, माझा कुंकवाचा करंडा आण.

बकु.– जी बाईसाब, हा बगा आणला. (असें ह्मणून कुंकवाचा करंडा पुढें नेऊन कुंकू लावते.)

रंभा– अग स्वारीची वर्दी सांगितलीस का?

गिरि—कवाची सांगितली है, सरकारांनी मला सांगितलं तं॰व्हांच मी निळीला सांगून जासूदाकडे पाठीवली.

चंद्रा-- बाईसाब स्वारीचं सामान वाड्याखालीं समद आलिया. सोन्याचा रथ, छत्री, आणि संमद समदं येऊन तयार उभ हैती.

रंभा-- तर मग आटपावंच लवकर (आंगांतील भरजरी कबजांतून घड्याळ काढून पाहते आणि जीभ जराशी चावते.) अग मेलीनो आट-पाना लवकर.

गिरि--सरकार, आतां काय बाईसाबाच्या पायांतील तोड्यावर येवढ्या तोरड्या घातल्या आणि काजळ डोळ्यामंदी घातलं कीं जाहलच, मग तयारीच बगा.

रंभा-- आटप आटप मेलींना बोलावयाला फार पाहिजे.

गिरि--(डोळ्यांत काजळ घालून बारीकसा काजळाचा डाग गालास लावते.)

रंभा-- गिरिजे, हें ग काय मेलं, इथग कशाला हें काळ पाहिजे?

गिरि—सरकार, अमूंचा बाईसाबाना दृष्ट न व्हावी ह्मणून मी लाविलें आहे.

रंभा-- रांडे, दृष्ट मलाग कोणाची व्हावयाची.

गिरि--बाईसाब सरकारचीच होणार. बगा बर आज माझ्या बाईसाबाला बघतांच सरकार घेरीं येऊन पडलेच समजा.

रंभा-- पुरे मेलं आतां (असें ह्मणून डब्यांतला विडा तोंडांत घालून चोपाळ्यावर बसली आहे; समोर आरशांत नखशिकांत स्वरूप न्याहाळीत आहे.)

निळी--बाईसाब, थोरल्या बाईसाब आपल्याकडे येत्याती.

रंभा-- कोण माझी मावशी कां?

निळी--व्हय सरकार. (इतक्यांत मावशी येते व रंभे जवळ उभी राहते आणि रंभेकडे पाहून ह्मणते) बये आजून तूं फिरावयास कां गेली नाहींस?

रंभा-- मावशी, जातेंच ही पहा मी निघणार होतें इतक्यांत तूं आलीस.

कुम.-- (गिरिजाच्या पाठीवर एक धप्पा देऊन) बयेची वेणी उघडी

काग ठेविलीस? वेणींत गजरा कांग घातला नाहीं?

**रंभा**-- खरंच मावशी, अग मी गजरा वेणींत घालावयाचा विसरलें होतें.

**कुम**.-- बये, तूं विसरशील पण मी कोठें विसरणार आहें? माझी बया माझा प्राण, आणि बयेचें रूप हेच माझे डोळे; एकदाची पट्टराणी माझी बया झाली कीं मी काळजींतून सुटलें.

**रंभा**-- मावशी मी बागेंतून जाऊन येतें.

**कुम**.-- (डोळ्याचा इशारा करून) नुसती जाऊन नको येऊं, तिकडची भेट पण घेऊन ये. (रंभा मान हाल्वते.)

पडदा पडतो.

## अंक १. प्रवेश ७ वा.

**पात्रें**

**१ राजपुत्र शूरसेन.**

**२ रंभा.**

**३ चंद्री** ................ (दासी)

**४ गिरिजा** ................,,

सुवर्णपुरांतील हिराबाग.

**शूर**.-- (घड्याळ काढून पहातो) अरे साडेपांच वाजून गेले, प्रिया अझून कां बरें येत नाहीं! किंचित् संकेताचा वेळ टळून गेला ह्मणजे हा प्राण शरिरांतून निघून गेल्या सारखें वाटतें. आज प्रिया आली ह्मणजे कांहीं होवो तिला सोडावयाचीच नाहीं. (इतक्यांत रंभेच्या दासी दृष्टीस पडतात.)

**रंभा**-- चंद्रे, बागेमध्यें स्वारी आली आहे कीं नाहीं पाहा बरं आले असतील हे तर खास; पण नित्या प्रमाणें कारंज्या जवळ आज स्वारी दिसत नाहीं.

**चंद्री**-- जी बाईसाब बगतें (असें ह्मणून चंद्री बागेंत पहावयास जाते आणि लागलीच परत येते.)

**रंभा**-- कांग आलीस, सरकार स्वारी आली आहे कीं नाहीं.

चंद्रा– बाईसाब आले हैती अन दोडावाणी नाई का ह्मणून? त्या गुला-बाच्या समोरच्या ताटव्याच्या आड जमीनीवरच बकुळीच्या झाडा-ला टेकूनशीनी शेल्यावर बसल हैती.

रंभा– अग रांडे! मला दोडावाणी ह्मणतीस कांग?

चंद्रा– बाईसाब आपल्याला दोडावानी मी कशास ह्मणूं, आपण शाहण्या आहात, ते सरकारच कां दोड होईनात.

रंभा– आग लागो तुझ्या तोंडाला रांडे अझून नीट बोलता देखील येत नाहीं, ते कांग द्राड आहेत! थांब मावशीला सांगतें.

चंद्रा– बाईसाब आह्मी आपल्या पायांच बटकुर आह्मांला काय कळतया, बाईसाब तुह्मी आणि सरकार ग्वाड व्हा आणि आह्मी आपल्या दोड असलों ह्मणजे झालं. बाईसाब मी तुमच्या पायां पडतें पण येवढी गोष्ट थोरल्या बाईसाबांला सांगूं नका; त्या माझ्या पाठीच कातडच काहाडत्याल.

रंभा– पुरे तुझें तें चराट आतां, मी त्यांच्याकडे जातें तुह्मी दोघीं येथेंच असा.

चंद्रा– जी, आह्मी ईतच बसलोंया तुह्मी बिगीनी ना ते कवाच वाटूळ गरिबावानीं वाट बगत बसल्याती.

रंभा– रांडेची जीभच तोडून घेतली पाहिजे, केव्हां झाले तरी बोलण्याचे असेच चराट लावते. (असें ह्मणून रंभा राजपुत्रा जवळ जाऊन उभी राहते. राजपुत्र बकुळीचे झाडा खालीं जमिनीवर शेला टाकून विचार करीत बसला आहे, तों रंभेच्या पायांतील तोरड्यांचा आवाज ऐकून दचकून पहातो, तों रंभा पुढें उभी आहे.)

रंभा– कां आज स्वारि फारशा खोल विचारांत गुंग जाहली आहे, असल्या अमोल्य विचार समई आह्मांला कोण विचारतो!

शूर.– अहा तूंच प्रत्यक्ष माझी हृदय देवता मज समोर उभी असतां आतां चिंतन कोणाचें करावयाचें. अहा!! नेत्रांनों तुमचें आतां सार्थक जाहलें.

**रंभा**– महाराज हें वर्णन करण्याची शैली आपण कोणत्या शाळेंत शिकला होता?

**शूर**.– प्राणवल्लभे अग हे शद्ब उच्चारण्यास अभ्यास कां कोठें करीत असतात, अग मनुष्य येकदां तुमच्या नादीं लागला ह्मणजे खडकामध्यें जसा जिवंत पाण्याचा झरा फुटतो तद्वतच आमच्या मुखांतून शद्ब आपोआप निघतात.

**रंभा**– सख्या खरंच कां ह्या दासीवर आपलें इतकें प्रेम आहे?

**शूर**.– संशय कशाला प्रिये तुझा ध्यास लागल्या पासून दुसरें कांहीं सुचत नाहीं. माझी प्रिया ती माझ्या हृदय मंदिरांतील देवी आणि तीचा मी खरा भक्त बनलों आहे.

**रंभा**– मग तुह्मी सध्या शाक्त उपासकच बनलात ह्मणावयाचे?

**शूर**.– यांत काय संशय तूंच माझी शक्ती, येवढेंच नाहीं पण मुक्तीचें द्वार तूंच, आराध्य देवता तूंच, आणखी काय सांगूं?

**रंभा**– प्रिया, मग शक्ती उपासकांना जो प्रिय पदार्थ तो सुद्धां आपण घेतला पाहिजे. त्या वांचून खरें शाक्तधर्मी आपण बनणार नाहीं.

**शूर**.– तें काय? मद्य, अग त्याचा तर अभ्यास केव्हां पासूनच मला होऊन गेला आहे; तूं डोळ्यासमोर नसतांना जर ती मला घ्यावी लागते तर तूं आज प्रत्यक्ष असतां आळस कसला!

**रंभा**– मग प्रिया आपण दोघें उभयतां तीचा आज स्वीकार करूं.

**शूर**.– प्रिये, मी तर अलीकडे तीचा स्वीकार केला आहे पण तुला संवय नसेल.

**रंभा**– सख्या, हें काय ह्मणावं!! अहो माझ्या मावशीचें पूर्ण प्रेम मजवर आहे तिचा मी जीव कीं प्राण आहें. तीनें मद्याची संवय मला समजूं लागण्याचे अधींच लावून ठेविली आहे.

**शूर**.– अहा! मग तर तुझी मावशी सुद्धां आपल्या पथ्यावर पडेल. तीच्या मनांत सुद्धां तुझा माझा समागम व्हावा असें असेल.

**रंभा**– महाराज हें काय ह्मणावं, अहो तीच्या गळ्यांतील मी ताईता प्रमाणें आहें आणि मला आपण मिळावेत अशी तीची इच्छा नसेल?

शूर.– खरोखर तर ती आपल्या कामांत साद्य आहे ही एक उत्तम गोष्ट जाहली, मग सखे चल आपण या समोरच्या महालांत जाऊं.

रंभा– प्रिया तर मग आपणांस जें औषध सांगितलें तें मागवितें.

शूर.-- सखे आतां यावेळीं आपणांस तें कोठून मिळणार?

रंभा– अहा! सरकार झालेत आणि त्याची उणीव आपणांस पडली? अहो मी तरी येवढ्यांत मागवितें पहा, (असें ह्मणून शीळ वाजविते. इतक्यांत गिरिजा दासी येते.)

गिरि--बाईसाब मला बोलाविलं व्हंई.

रंभा– अग गिरिजे, ती आपली धाकटी पेटी गाडींतून घेऊन ये.

गिरि–जी बाईसाब घेऊन येतें.

शूर.-- अहा, ह्या तुझ्या दासी तरी किती तत्पर आहेत; शाबास ह्याचें नांव दासी.

गिरि--बाईसाब, ही बगा मी आपली हातपेटी आनलिया.

रंभा-- अग, ती पेटी घेऊन बंगल्यांत जा आणि सर्व तयारी करून नंतर तूं गाडी जवळ जाऊन उभी रहा.

गिरि--जी महाराज, ही तयारी जहालीच बगा (असें ह्मणून महालांत जाते.)

रंभा– सख्या, तर चला आपण वर जाऊं, मला लवकरच मावशीनें बोलविलें आहे.

शूर.– सखे, मी तरी हेंच इच्छितों अग, तूं मला वर नेतेस येवढेंच नाहीं पण सखे आज जशी काय स्वर्ग लोकींच घेऊन जातेस असा आनंद या मनास जाहला आहे. प्रिये तर चल जाऊं. (असें ह्मणून वरच्या बंगल्यांत राजपुत्र रंभेस घेऊन जातो व पडदा पडतो.)

गिरि-- चंद्रे, आज बाईसाब अजून येत नाहींत बागेत दिवे देखील लागले. आज आपल्याला वाड्यामंदीं जायाला लई रात्र होईल असं वाटतं.

चंद्री– कायग गिरिजे, आज कांहींतरी घोटाळा दिसतो.

गिरि–ह्मनजे, घोटाळा कसला (आधींच उल्हास त्यांत फाल्गुन मास.)

चंद्री– अस ग दोडावानी कां ह्मणतीस! आज आपल्याला बाईसाब कांहींतरी बक्षीस देत्याल. आज लया दिवसांनीं बाईसाबाचा घाट शेवटास गेला.

गिरि– अहाग भोळे, भोळी बाई ह्मनून ह्मटल तर ओ ह्मनशील, अग त्यांत ग काय बाईसाबाला कुठ आज नव धन सापडलं ह्मनून तुला नव जून बक्षीस देतील.

चंद्री– नव नाहींतर काय. आजची ही पहिलीच खेप नव्हं का.

गिरि– अहाग बावळे! यरत रांड त्वा आपला जलम वाड्यामदीं काडला. अग वेडे पोरी, शालू नवा असला ह्मणून काय झालं, नेसणारीन नवी पाहिजे कीं नाहीं समजत नसलीस तर समज.

चंद्री– खरंच बया आपल्या गरिबाला कशास हाव्या या गोष्टी, श्रीमंताला नांव कोणी ठेवावित. काय मेली ह्मण आहे ना "गरीबानं खाल्लं तें पोटासाठीं आणि श्रीमंतानीं खाल्लं तर औषधासाठीं" तशांतलच ह्मनायच.

गिरि–अग, गप, गप, राहा बाईसाब आल्या जनु (इतक्यांत रंभा येते.)

रंभा– अग गिरिजे, अग चंद्रे, गाडी इकडेस आणावयास सांगा.

गिरि– जी बाईसाब. रंभा गाडींत बसून निघून जाते.

(पडदा पडतो.)

## अंक १ प्रवेश ८ वा.

पात्रें.

१ रंभा .........................

२ चंद्रा ................. (दासी)

३ कुमती ............ (मावशी)

### रंभेचा रंगमहाल.

(रंभा शेंकि त्यात त्यात बाहेर येते.)

रंभा– दासी, अग मावशी ग काय करते? माझ्या बाई जिवास कससच झालं आहे, असें ह्मणून धांवत जाऊन सज्यांत पडते व ओकते. (दासी रंभेचें तोंड धुवून पलंगावर आणून बसविते.)

चंद्रा– बाईसाब, थोरल्या बाईसाबांना बोलावु व्हई. (असें ह्मणते तोंच कुमती रंभेचे जवळ येते.)

कुम.– बये, इतकाग उशीर आज तुला बागेंतून यावयास का जाहला. आज माझ्या बयेचें तोंड पण उतरल्या सारखें दिसते.

रंभा– मावशी, अग आज किनी तुझा हेतू पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला. (असें ह्मणून कुमतीच्या कानाशीं लागते, कुमती चंद्रीस बाहेर जाण्याची डोळ्यानें खूण करते. चंद्री बाहेर जाते.)

कुम.– येकंदरींत बये, तो मेला आज तुझ्या स्वाधीन जाहलाना?

रंभा– अग हो, स्वाधीन ह्मणजे काय? अझून मेला माझ्या पायांवर तर लोळण घेत होता.

कुम.– ह्मणजे, आजही त्याचा व तुझा स्नेह झालाच नाहीं ह्मणावयाचें.

रंभा– मावशी मला बाई असल्या गोष्टी सांगावयास तुजशीं लाज वाटते.

कुम.– अग पोरी, लाज कसली; माझ्या बहिणीच्या पोटचा गोळा काय आणि माझा काय, यांत कांहीं निराळेपणा आहे काय? माझ्या मनांत भेद असता तर बये तूंच सांग, तुझ्या कल्याणा विषयीं मी रात्रं दिवस इतकी झुरतेंच ना!

रंभा– मावशी हें कां मी समजत नाहीं? पण मला भिती इतकी वाटतें कीं त्यांचा माझा समागम तर झालाच पण त्या पासून त्यांच्या शरिरास नुकसान कांहीं न पोहोंचो ह्मणजे झालें.

कुम.– अग वेडे, त्याची ग तूं कसली काळजी करितेस? आतां तुझ्या शरिरांत त्यापैकीं कांहीं विकार राहिला असेल असें मला तर वाटत नाहीं.

रंभा– मावशी, मी किनी तुला बाहेरून नीट दिसते, पण आंतून त्या मेल्या दुष्ट रोगानें माझें शरीर सगळें दग्ध करून सोडिलें आहे.

कुम.-- वये, या गोष्टीची तिळमात्र काळजी करूं नकोस, आजच दयाराम भाईला मी तीन हजार रुपये रोख दिले आहेत, ते दोन चार दिवसांत सगळ्या वनस्पतींचीं औषधें, उत्तम उत्तम मात्रा, व अनेक प्रकारचीं सर्व रोगांस हटकून नीट करणारीं भस्में आणणार आहेत; मग माझ्या वयेस मी धुतल्या मोत्या सारखी केलीच असें समज.

रंभा-- मावशी, असं किनी केलंच पाहिजे; माझी तब्बेत पुढें सुधरेल, पण आजच्या गोष्टीनें त्यांना कांहीं भलतें सलतें न होवो ह्मणजे झालें.

कुम.-- वये, अग त्या मेल्याची काळजी आपणास कशास हावी! आज राजाच्या पदरीं थोडेका वैद्य आणि हकीम पडले आहेत? मेले लाखो रुपयांची जहागीर खात आहेत. एकास ह्मणतां हजारो वैद्य तेथें पायां पडून औषध देण्यास तयार आहेत. त्या मेल्यास येवढी ही शिक्षा नको का; स्वरूपाच्या ठिकाणीं असला प्रकार तर असावयाचाच. चांगला पदार्थ सर्वांसच खावासा वाटतो. निर्मळ शरिराच्या तर हजारों सांपडतील, पण असे गुलाबी गाल, आणि चांपेकळी सारखे सुंदर नाक, कुंदकळ्या सारखे दांत, आणि हारिणी सारखे डोळे अशी सुंदर लावण्य लतिका त्या मेल्याला एक तरी मिळेल?

रंभा- पुरे बाई आतां तुझी ती तारीफ, मावशी मी किनी आज ती मेली दारू त्यांच्या बरोबर प्यालें तेव्हां पासून माझ तोंड कससच झालं आहे.

कुम.-- मेल्यांना, मी एका बाटलीस दहा दहा रुपये देतें तरी मेले चांगला माल देतच नाहींत. वये, तुजसाठीं किनी थेट विलायतेहून ताजा माल आणविण्यासाठीं आपल्या दिवाणजीस सांगितलें आहे, व तेही होय ह्मणाले. मग तर झालेंना? माझी वया कोणी कडून खुशी असली ह्मणजे झालें.

रंभा- मावशी, आज किनी मी ते मेले क्याट खेळणार नाहीं, त्या मेल्या

पत्र्याचा मला कंटाळा आला आहे.

कुम.-- बये, मग आज तूं काय खेळणार? तुला खेळावयाचा कंटाळा आला असेल तर तुझी मर्जी असल्यास, तमाशा मागवितें. मागवूं काय?

रंभा- खरंच गडे, बरीच आठवण केलीस आज किनी तो परवां तमाशा जहाला त्यालाच बोलवावा.

कुम.- बये, कोणग तो!! आप्पा भराडी तर नव्हे?

रंभा- हो, हो, त्याचाच.

कुम.- कोण आहे ग दासी, जासूदाला आज तमाशा आणविण्याची वरदी दे.

चंद्री- जी, व्हई बाईसाब, बिगिनी आणावयास सांगतें, असें ह्मणून जाते.

(पडदा पडतो.)

## अंक १ प्रवेश ९ वा.

### पात्रें.

१ रंभा ..............................

२ कुमती ..............................

३ हरिपंतखोटे. (कुमतीचा दिवाण.)

४ यमुना .... (एक शहरांतील विधवा)

५ रामशास्त्री ............... (दिक्षीत)

६ नारोभटजी .......... (पुराणीक)

(रंभा व कुमती चांदीच्या पलंगावर बसल्या आहेत, दासी पंखे घालीत आहेत, पलंगाचे आस पास तमाशा पहाण्यास्तव कांहीं सरदार लोकांच्या व आश्रित जनाच्या स्त्रिया बसल्या आहेत, पलंगा पासून कांहीं अंतरानें कुमतीचा दिवाण व भिक्षुक आणि आश्रित मंडळी बसली आहे, समोर तमाशा उभा आहे.)

कुम.- बये, हा तमाशेवाला तरी मोठी बहार करितो.

रंभा- मावशी. अग परवा तूं निजली होतीस त्या वेळीं या मेल्यांनीं बाई

मोठीच गंमत केली, ती मेली विटाळशीची लावणी फारच यांच्या तोंडानें गोड लागते, आणि मेल्याचा सोंगाड्याही फारच बाई नकली आहे. बैराग्याची, कंजारिणीची, आणि कायग बाई हं, गजाऊ कुटनीची ह्या नकलेत फारच गंम्मत करितो.

**कुम.**– बयें, अग हे मेले लोक आपल्या येथें फारच खुलतात, कारण आपल्या कडून त्यांना देणगीची आशा असते; गरिबां कडून कोठून मिळणार?

**रंभा**– मावशी, अग मेल्यांनीं आज हा मल्लार राग कोठून सोडला, इशकाची लावणी मुळींच ह्मणत नाहींत.

**कुम.**– दिवाणजी, त्या मेल्याला सांगा कीं एखादी बहारदारीची इशकाची लावणी ह्मण, असल्या भिकारड्या लावण्या ह्मणशील तर माझ्या कामास पडणार नाहीं.

**दिवा**–जी, महाराज सांगतों, बाईसाहेबाच्या आज्ञे प्रमाणें तशीच तजविज करितों. (तमाशे वाल्याचे कानीं लागतो व तमाशेवाला हात जोडून मान हलवितो आणि इशकाची लावणी ह्मणतो.)

**रंभा**– आतां बाई बहार येणार. कां? यमना काकू आजची बहार कशी आहे?

**यम.**– महाराज, इशकाच्या लावणी वांचून तमाशांत रंग भरतच नाहीं. महाराज, काय तुह्मांला सांगूं या मेल्याची लावणी ऐकली ह्मणजे चित्त इतकें बेभान होतें कीं (असें ह्मणून रंभेच्या कानांत सांगते) "बापास बाप सुद्धां ह्मणावेसें वाटत नाहीं." (रंभा हंसते व यमूनेचे टाळीवर टाळी देते.)

**कुम.**– कां, दिक्षित कशी गंमत आहे? लावणी याला ह्मणतात.

**दिक्षि**–महाराज, आपल्या पायांमुळें असली गंमत आह्मांस पहावयास मिळते. श्रीमंताचा आश्रय येवढ्याच करितां, श्रीमंताची गोष्ट काय सांगावी? सरकार, ह्या तमाशांतील नाच्या तर फारच खुपसुरता आहे त्याला मांडीवर घ्यावासा वाटतो. (कुमती तोंडाला पदर लावून हंसते.)

कुम.— कां नारोभटजी तुमच्या पुराणांत अशी मजा आहे का?

नारो—महाराज व्यास वाल्मीकांच्या बापानेंसुद्धां असली बहार पाहिली नसेल, ह्या मजेपुढें त्यांची काय मात्रा?

रंभा— मावशी आतां मला झोंप येते.

कुम.— अग चंद्रे, जासूदाला सांग कीं तमाशा बंद कर. (जासूद तमाशा बंद करितो. आश्रितजन मुजरे करितात.)

(पडदा पडतो.)

## अंक २. प्रवेश १ ला.

### पात्रें.

१ राजपुत्र शूरसेन.
२ दुराचार ............... ( खिसमतगार. )
३ आफिण्या ..........................,,
४ कपटाजी ........................,,
५ खलराज ............. ( शूरसेनाचा मित्र )
६ दंभिकजी ........ ( सुवर्णपुरांतील कलाल. )
७ कलागतीराव शिंदे......
८ आळसाजीराव फाकडे.. } सरदार मंडळी.
९ दुराचारीराव सरदेसाई.
१० सुंदरसिंग .... ( खासपागेतील जमादार. )

शूर.– काय करावें! रंभा जर एक दिवस भेटली नाहीं तर या मनास क्षणभर सुद्धां करमत नाहीं, आणि तिची भेट जाहली कीं, तिचें ह्मणणें हें तुह्मी आपल्या बापास कैद करा आणि गादीचे मालक व्हा, आणि माझ्याशीं लग्न करा. आतां तिचें बोलणें कबूल न करावें तर रंभा हातची जाते, कारण, ती थोर घराण्यांतील पड-ली ती विवाहा वांचून कोठ पर्यंत राहणार. आतां मजसाठीं तिनें तसें रहावें तर ऐकत नाहीं; आणि ती ऐकत नाहीं ऐवढेंच नाहीं तर लौकिकांत सुद्धां वाईट दिसते, पहा लौकिकाचा तरी किती पगडा आमच्यावर आहे. हीच जर लग्नाची घाणेरडी चाल आमच्यांत नसती तर रंभेचा उपभोग सदा सर्वकाळ चोरून खुशाल घेतला असता, कारण ही माझी कपट मसलत माझ्या आईबापास कोण सांगतो; आणि यांतून तिची मावशी तर मला पूर्ण साह्य आहे. आंतून पाहिजे तें जरी असलें तरी लौकिका-साठीं कित्येक गोष्टी जगांत करणें भाग पडतें. असो तर आतां

असा विचार करीत बसणें उपयोगी नाहीं, कांहीं तरी उपाय शोधून काढावा असें ह्मणून जरा विचार केल्या सारखा करितो, आणि ह्मणतो अहा! मनाचें तर ह्या वेळीं पूर्ण साह्य आहे, मनांत आणिलें कीं पुरे, कल्पनेचा समुद्र पुढें उभा रहातो. (असें ह्मणून हाक मारतो.) कोण आहेरे बाहेर!

दुरा.— जी महाराज, आपला शेवक दुराचार हजर है कीं आपल्या पायां जवळ.

शूर.— काय मूर्खाचें नांव "दुराचार" कोणी मूर्खानें याचें नांव ठेविलें कोणास ठाऊक! पण हल्ली हाच दुराचार मला तर सुविचारी होणार. दुराचारा, ही चिठ्ठी घे आणि आपल्या शहरांत जो चोर बाजार आहे तो तुला ठाऊक आहेना!

दुरा.— जी महाराज मला सगळी माहिती है चोर बाजार छिनालपुरा, चाहाडगल्ली संमद समदं माहित है.

शूर.— शाबास तर हाच बहादर माझें काम करणार, तर मग ही चिठ्ठी घे आणि दंभिकजीशेट जे पारशी त्यांना नेऊन दे ह्मणजे ते सर्व चिठ्ठींतील सामान आणून देतील.

दुरा.— जी महाराज, हा चाललों बगा, असें ह्मणून मुजरा करून चालता होतो.

शूर.— चला, येवढ्या गोष्टीचा तर निकाल लागला, आतां दंभिकजीशेट सर्व सामान घेऊन येतील, तिकडची काळजी तर आता उरलीच नाहीं, आतां आपला मित्र बोलवावा, आपल्या जीवाचा मित्र एक खलराज आहे, त्याच्या साह्यानें ही आपली मसलत सर्व सिद्धीस जाईल. तर आतां त्यालाच येथें आणविलें पाहिजे, आणि हो, बरी आठवण जाहली प्रथमारंभी आपल्या राज्यांतील आपला बहादर शिपाई सुंदरसिंगास बोलवून नंतर खलराजास बोलवूं. बाहेर कोण आहे, कोणी बाहेर आहे कीं नाहीं!

कप.— सरकार, मी कपटाजी है की आपल्या पायांप हजर, दुराचार गेल्या पासून मी आपल्या पाहऱ्यांत हजरच है.

**शूर.**— कपटाजी, हा बेटा माझ्याशीं कांहीं कपट तर करणार नाहीं?

**कप.**— सरकार अस आपण काय ह्मणता, सरकारच लक्ष्य जव्हर गरिबांवर है तव्हर पायाला सोडून आह्मी कुठ बी जाणार न्हाय, आणि एकदां आह्मांला आपन कां सोडलं तर आह्मी आपल्या सावलींत उभ बी राहणार न्हाय, जव्हर सरकारचा जीव आह्मांवर है तव्हरच आह्मी सरकारच दास होय पघा.

**शूर.**— कपटाजी, तर तूं अस कर कीं आमच्या खासपागेंतील जो सुंदरसिंग जमादार आहे त्याला आतांचे आतां घेऊन ये, मी बोलाविलें ह्मणून सांग.

**कप.**— जी महाराज आतां सरकारच्या पायाप घेऊन आलोंच पघा.

**शूर.**— आमच्या राज्यांत तेवढा मात्र शूर सरदार आहे व त्याच्या शौर्याची तारीफ आमचे बाबाच फार करीत असतात, तेव्हां त्याची तरवार त्यांच्याच गळ्यावर घातली पाहिजे.

**कप.**-- सरकार मुजरा करतो.

**शूर.**-- अरे, येतांना माझा प्राण प्रिय मित्र खलराज यालाही घेऊन ये.

**कप.**-- जी सरकार हा चाललों बगा आतां गेल्या पायांनीं आलोंच त्यानला घेऊन.

**शूर.**-- आतां फक्त एक कोणी तरी विश्वासू मनुष्य पाहून त्याच्या कडून आपल्या राज्यांतील आणखी पांच चार थोर सरदार बोलवावेत कारण बाबाला कैद करणें ही गोष्ट कांहीं साधारण नाहीं. सस्याच्या शिकारीस वाघाची तयारी ठेवावी लागते; मग ही गोष्ट तर फारच महत्वाची पडली. कोण आहे रे बाहेर? अरे बाहेर कोणी आहे कीं नाहीं? काय पाहऱ्यावर कोणीच नाहीं? (आणखी एकवार मोठ्यानें पुकारतो,) अरे कोणी पाहारेकरी आहे कीं नाहीं?

**अफी**--(घाबरून पागोटें हातांत घेऊन घाबऱ्या घाबऱ्या जातो, आणि झोंके खात खात मुजरा करितो.) सरकार, मी अफिण्या आपल्या पायाप हजर है.

**शूर.**– काय तुझें नांव अफिण्या, अरे वेड्या तूं अफू खात असशील ह्मणून लोक तुला अफिण्या ह्मणत असतील, परंतु तुझें नांव काय?

**अफी**–सरकार, आह्मला गरिबाला नांव कसलें, लई दिसा पासून अफिण्या ह्मणून हाका मारत्यात, तेंच माझं नांव.

**शूर.**– असो ह्या वेळीं हाच मनुष्य माझ्या उपयोगीं आहे, कारण व्यसनी मनुष्य अधिक खटपटी नसतो, ह्याला अफू मिळाली कीं हा खुश असणार तर ह्यालाच आपलें काम सांगावें. अरे अफिण्या, तूं आतांचे आतां जा आणि आपली जी खाशी सरदार मंडळी ह्यांना बोलविलें आहे ह्मणून सांग. अरे ऐकिलेंस कां (हा तर बेटा झोंप घेतो) अरे समजलास कां?

**अफी**–जी होय महाराज, डोळे उघडून बघतो, पण महाराज कोणास बोलावून आणूं.

**शूर.**– आतां या अफिण्याला काय करावें! अरे मूर्खा हे पहा अमीर, उमराव, खाशे, कलागतीराव शिंदे यांस, तसेंच दुसरे राजे बहादर, आळसाजीराव फाकडे, तिसरे कोण ह्मणशील तर समशेर बहादुर दुराचारीराव सरदेसाई या सर्वांना सांगावें कीं, धाकटे सरकार यांनीं आतांच्या आतां ह्याच पाउलीं तुह्मांस लालबागेंत बोलाविलें आहे.

**अफी**–(डोळे उघडून) जी व्हई सरकार, आतां त्यांना घेऊन येतो. मुजरा करितो.

**शूर.**– हं जा लवकर. आतां मात्र सर्व बेत जमला.

**कप.**– सरकार, मुजरा करितों.

**शूर.**– कायरे, कोण आले आहेत?

**कप.**– महाराज आपले मित्र खलराज आले हेत आणि सुंदरसिंगजी येण्याच्या तयारींत हेती.

**खल.**–(मोठ्या झपाट्यानें येऊन मित्रा जवळ बसतो, आणि गळ्यांत हात घालून विचारतो;) मित्रा मजला फारच घाईनें बोलविलेंस, सांग

या मित्रास आज कोणती कामगीरी सांगणार.

शूर.– ठीक, ठीक, अजून कामगिरीच कां विचारतोस? अरे, जो घाट करावयास सांगितला तो घाट केलास कीं नाहींस?

खल.–हं, त्याच दिवशीं; त्यांत काय मोठें कठीण आहे? अरे पण तूं त्यांना आज बोलाविलें आहेसना?

शूर.– अरे, सर्व बेत बराबर केला आहे, आतां ते आलेच समज.

खल.–मग मीही त्यांना आज पुन्हा असें बनवितों कीं तूंही ह्मणशील, यीं रे यीं; पण दंभिकजीचा बेत आजचा आहेना?

शूर.– हं तो सर्व तयारीच आहे.

खल.–मग तर काम सोळाआणे जहालेंच समज.

दुरा.–( मुजरा करतो ) महाराज, पायाप शेटसाब आल हैती अनी सगळी तयारी निशी आल्याती.

शूर.– कां दंभिकजीशेट चिठ्ठी प्रमाणें सर्व गोठवण केलीना?

दंभि.–गरीब परवर. आतो शूं वात, महाराज साहेब जे फरमान किधोछे तेमा वाल ओछू हसे तो रूजगार नहीं करूं. कदमपासे मागणूं येटलूच के गरीबनी परवस्ती थवी जोईयें. आ मोटा महाराजा तो छे पण बाबजी हमारा हकमा कई नथी, भूखा मरियेछे हवे हमारा कई दाडा वळशे येवी आशा छे.

शूर.– ठीक आहे, दंभिकजी तुह्मी आज इकडेच असा जी जी वस्तू सरदार लोकास लागेल ती पुरविली पाहिजे.

दंभि.–गरीब परवर, आपनच्या पायाचे गुलाम पहिल्या पासून अमारा लोक हसेल अने अह्मी बी छू सरकारची खात्री हसेल, हमी गाई-बीला हमारा घरमा घणू मानेछे, अने तमारा जेवा सबळा पण हमच्या घरमा जोयेला हसेल.

शूर.– हो, हो, मला माहीत आहे तुमची जात आरधी हिंदूची आहे आमच्या लोकांना तुमचे हातचे खाण्यास कांहीं हरकत नाहीं. कारे दुराचारा यानें करून आणलेल्या चिजा आपल्या लोकांस चालतील कीं नाहीं,

दुरा.—सरकार, निशा पाण्याचे वेळीं बिलकुल हरकत नाहीं. निशा पाण्याचे वेळीं पारशाचे घरचें तर काय पण धेडाचे घरचें सुद्धां चालतें. कारण निशा केवळ मायेचें साक्षात स्वरूप आहे.

शूर.— तर मग ठीक आहे. जा तूं दंभिकजी बरोबर सर्व व्यवस्थेत ऐस.

दु. दं.—मुजरा करितात (आणि निघून जातात.)

अफ्री—सरकार मुजरा करितों, महाराज, सरदारमंडळी पण मुजरे करत्याती.

शूर.— (उठून उभा राहतो आणि ह्मणतो) या, शिंदे या, फांकडे तुह्मी इकडे बसा. अरे सरदेसाई पण आले आहेत तर मग मीही तुमच्या जवळच बसतों. सरदार हो, तुह्माला माझा बेत खल-राज यांनीं सांगितला असेलच.

सरदा-जी महाराज आह्मी आपल्या पायाच दास, सरकारांनीं जी कामगिरी आह्मासनी सांगितली है, ती आह्मी आपल्या मना पासून करणार आपल्या पाई आमच शीर बी तैयार है अस समजा.

शूर.— सरदार हो, तुमची सर्वांची आज मजवर कृपा आहे येवढें तरी माझें मोठें भाग्यच समजावयाचें, नाहीं तर मला कोण विचारतो? आज तुमची मला मदत असली ह्मणजे मी आकाशासही हात लावीन, स्वर्गींचा चंद्र सुद्धां हस्तगत करीन, मग दुसऱ्या गोष्टी-ची काय विशाद आहे?

खल.—(तिघे सरदाराचा हात धरून ह्मणतो) कां महाराज मी आप-णांस जी विनंती केली त्या प्रमाणेंच वर्तणूक आहेना?

फाक—राजाच पुतर ह्यानलाच ह्मनाव, त्या मारवाड्यानं काय राज करा-यच है, माझ्या बी मनांत लई दिसापुन घोळत होत कीं, माझ्या बी तरवारीचा हात कसा है तो दावावा; देवाच्यान् त्याला बगीतल कीं ही तरवार त्याच्या डोकशावर घालावी अस वाटत, (ह्मणून तरवारीचें टोंक हातीं धरून तरवार जमीनीवर आपटतो, तों तरवार हाताला लागून रक्त निघते.) अर इच्या बन तरवार ह्मनती असच रगत त्याच्या डोकीच मी काडीन.

**सिंदे**– राव माझ्या मनावानी गोष्ट तुह्मी सांगितली, त्यो त्यापर जवां तवां ह्मनतो तुमच्या अफिण्यानीं काय व्हयाच है, पन लेका आमचा भाला कुठ बगितला है अजून?

**सरदे**–कशाच राव राज, अन फिज, ह्यो महाराज गादीवर बसल्यापुन नाच नाहीं, कीं तमाशा नाहीं, राज तर पहिल होऊन गेल, आमच्या बाबासाहेबांनीं येकी परी येक दहा कळवंतीनी जातीन ठेविल्या व्हत्या. ती मजा अन ती गमत तेंच्या संगत गेली. अन हा ल्योक ह्मणतो तुह्माला तीन लाखाची जाहीरगिरी आर का ह्मनत्याती त्याला–ती कशास हावी ह्मनतो.

**शूर.**– सरदार हो, तुह्मी तिळमात्र काळजी करूं नका तुमच्याच बळावर सर्व गोष्टी सिद्धीस जाणार आहेत, आतां तोच काळ समीप आला आहे असें समजा.

**खल.**–(उठून तिघां सरदारांना हातीं घेऊन कानामध्यें सांगतो परस्पर परस्परास टाळ्या देतात, व खलराजाचे हातावर तिघेही वचन देतात.)

**सरदा**-(मिशावर हात फिरवून) काय फिकीर है माहाराजांनीं अगदीं काळजी करूं नये. आज आह्मां तिघा जवळ नाहींतरी च्याळीस हजार फौज है जसा उंदरावानी वाड्यांत त्याला कोंडून टाकूं अन कैद करा ह्मटल तर कैद करूं नाहींतर त्यांची मुंडी आमच्या हातांतून कुठ जाणार?

**शूर.**– सरदार हो, आज तुमच्या ह्या अभिवचनानें मी कृत कृत्य झालों, माझें काम तुह्मी बजवाल.ही मला पूर्ण खात्री आहे.

**खल.**–महाराज, परंतु पायां जवळ विनंती ही कीं ज्या दिवशीं हा घाट करावयाचा त्या दिवशीं माहाराजावर कांहीं निमित्य ठेविलें पाहिजे?

**शूर.**– अरे वेड्या, निमित्य हेंच कीं आपल्या सर्व सरदारांनीं बाबास सांगावें मला (शूरसेनास) रंभा बायको करावी, आणि हें जर त्यानें कबूल केलें तर ठीकच आहे नाहींतर त्याच वेळीं त्यांना कैद करावें व त्यापुढें काय करावयाचें तें मी तुह्मास सांगेन.

सरदा.-लई बेस, आमच्या बी मनावानी आन झालं, आह्मी बी आपली तरवार आतां पासून पाझळून ठेविलीच नगा.

शूर.— आतां फक्त माझा विश्वासू सुंदरसिंग आला ह्मणजे झालें.

खल.—सरकार, त्याची कांहीं आपणांस मोठीशी गरज नाहीं, तो आला तरी वाहवा आणि नाहीं तरी वाहवा; महाराज हे तिघे आपणांस वश्य जाहले यांत आपण त्रैलोक्याचें राज्य हस्तगत केलें असें समजा.

शूर.— अरे, त्या विषयीं तर माझी खात्रीच आहे. आतां दंभिकजीशेट यांना बोलवा आणि करा तयारी. कोण आहेरे? दंभिकजीला सांगा कीं सर्व साहित्य घेऊन ये.

दु.दं.—जी माहाराज हुकमा प्रमाणें अकशी रेट तयारी. (सारे सामान मांडतात, चिनीचे च्यार च्यार प्याले आणि काचेचे दहा पांच ग्लासांत निर निराळ्या रंगाची दारू ओतून ठेविली आहे, जवळ खाण्याच्या दहा वीस जातीच्या पदार्थांनी रिकाब्या भरून ठेविल्या आहेत, तसेंच सुरी, काटे, चमचे मांडले आहेत.)

शूर.— फांकडे, देसाई, शिंदे, बसा. हा आजचा तुमच्या सर्वांच्या कृपेचा प्रसाद आहे.

दंभि.—(पांच चार सोडावाटरच्या बाटल्या सोडतो त्या आवाजानीं तिघेही सरदार दचकतात, फांकडे मोठ्यांनीं ओरडतात, आणि अर खंडबा धांव, घात झाला, ह्मणून खिजमतगारास बोलावितो. खिजमतगार अफूचे पेंगांत उठतां उठतां ते एकमेकांवर पडतात.) महाराज! तमे केम घाबरता, घबरावानू काम इथ कांहीं नथी, हूं तो सोडावाटर खोलूंछूं.

फांक—अर लेकाच्या, अशी हिकमत कशापाई केलीस, तुला बी माझ्या तरवारीचा हात हावा जणूं.

देसा.—आव फाकड, त्यो बिचारा गरीब, त्यो बिचारा फिरंग्याची करामती दारू तुह्मासनी देतोया अन तुह्मी घाबरतां कशा पाई.

फांक.-अर, आन आन भितोस कशापाई आमच्या महाराजानं तुला

समुंदराच्या पलिकडच्या देशांतून आनल व्हंइ, अर तू कुठ असतूस ?

**दंभि.**—महाराज, आमचे लोक तर तमारा मुलुखमा रेहेछे; अने गाईची पूजा पण तुमच्या जेवी करशील.

**फांक.**-अर हा ल्योक काय ह्मनतोया करशील ह्मनतोया कां मला पड-शील ह्मनतोया! अर लेका तू चेष्टा करतोस व्हंई!

**शूर.**— फांकडे, अहो तुह्मांस त्याची भाषा समजत नाहीं, तो जातीचा गुजराथी आहे.

**फांक.**-मग महाराज कांहीं चिंता नाहीं, तुह्मी ईचार केल्या वांचून आननार नाहीं पण ह्यो लई बामनी बोलतोया अन गाईची पूजा कराया सांगतोया, लई सवळ करतोया ह्मनून सांगितल, (असें ह्मणून सर्व सरदार लोक दारूचे प्याले घेतात.)

**शिंदे**— कां देसाई! आमची मजा कशी है? आज झालेला घाट येकदां सिद्धीस गेला कीं मग बगा हीच मजा आणि हाच रंग.

**कप.**— सरकार, सुंदरसिंग आल हैती. (सुंदरसिंग मुजरा करतो.)

**फांक**—कोनर त्यो, मागून उष्ट खायाला कशापाई आला है.

**शिंदे**— अर त्यो सुंदरसिंग, पागतला जमादार.

**शूर.**— या सुंदरसिंग मी अझून पर्यंत तुमची फार वाट पाहिली सरदार-मंडळीही नुकतीच बसली आहे बसा. दंभिकजी, याचीही तयारी बरोबर ठेवा.

**सुंद.**— खाविंद आपके मेहेर और नेक कदरदानिशमंदीसे आपके गुलाम कदमके पास परवरिश हुवा है खाविंदके निमकसे हमारे बाल बच्चे पलते है. आप इतनी निगा गुलामपर रखतेहो इतनी बहोत है.

**शूर.**— सुंदरसिंग ह्या पैकीं तुह्माला कांहींच चालावयाचें नाहीं!

**सुंद.**— सरकार, कुछ मुजाखा नहीं है, आपके और बडे महाराजके दयासे जिंदगानी बहोत ऐश आराममसे गुजारते हैं. आपके दुवासे कुछभी हमकु कम नही है.

**फांक**–सरकार ह्या परदेशाची लईशी खुशामत आपनासनी कशास हावी हा रांगडा आमचं उष्ट खानार लई गोष्टी करतोया!

**सुंद.**– अबे, हरामखोर इस सुंदरसिंगको जाणता नही है तूं. (असें ह्मणून तरवार काढतो.)

**खल.**–हां, हां, सुंदरसिंग तुह्मी काय करित आहांत, हा पुरुषार्थ कोणास दाखवीत आहांत. समोर तुमच्या कोण आहेत?

**सुंद.**– अबे बह्मण जबान संभाल, इस सुंदरसिंगकी समशेर इस पावके मुलाजेसे म्यान होती है. याद रख नहीतो इस फांकडेके तुकडे कर देता.

**शूर.**– सुंदरसिंग तुह्मी असे मजजवळ या. अहो हा प्रसंग असा रागावण्याचा नव्हे, आपण आतां सर्व ह्या वेळीं बंधू आहोंत असे समजलें पाहिजे.

**देसा.**–सरकार हे परवाच कोल्ह लई बक बक करतया, असली इलायती फिरंग्याची दारू ह्या लेकाच्या बापानें बगीतली होती!

**सुंद.**– (फिरून तरवार उपसतो राजपुत्र आपल्या हातानीं म्यान कारितात.)

**शूर.**-- सुंदरसिंग, तुह्मी माझ्याशीं बोला. (सुंदरसिंगाच्या कानांत महाराज सांगतात सुंदरसिंग गप्प बसतो.)

**सरदा**-(जेवून उठतात, व हात पुसून बसतात पानसुपारी अत्तर गुलाब सर्वत्रांस होतो.)

**शूर.**– खलराज, आपली मसलत सुंदरसिंगालाही सांग.

**खल.**--(सुंदरसिंगाचा हात धरून एक बाजूला नेऊन कानांत सर्व मसलत सांगतो. व सुंदरसिंग ऐकून स्तब्ध होतो. खलराज उभा राहून भाषण करितो, अमीर, उमराव, कलागतीराव शिंदे, तसेंच राजे बहादर, आळसाजीराव फांकडे, तसेंच समशेर बहादर दुराचारीराव सरदेसाई या प्रमुख व शूर सरदारांस महाराज साहेबांच्या मार्फतीनें अशी विनंती करण्यांत येत आहे कीं:—

प्रत्येक सरदारास महाराज साहेबांचा जो घाट स्पष्टपणें मनकदून कळविला गेला आहे, तो घाट सिद्धीस नेण्याची सर्व

सरदार एक निष्ठेनें दक्षता ठेवतील व महाराज साहेबांच्या इच्छे-नुसार ही मसलत पार पडल्यास महाराज साहेब प्रत्येकाचे फार आभारी होतील, व त्यांना पुढें सरदार गणतील येवढेंच नाहीं, पण महाराज प्रत्येकास आपले मित्र समजतील, व राज्य मन-सुब्यांतील कोणतीही गोष्ट तुमची सर्वत्रांची सल्ला घेतल्या शिवाय करणार नाहींत. आतां या गोष्टीचें वचन पूर्णपणें आहेच, पण पुन्हां एकवार सर्वत्रांनीं आपआपलें वचन दिलें पाहिजे, आणि या गोष्टीस मोठ्या महाराजाच्या विश्वासांतील खासपागेंतील जमादार सुंदरसिंग हेही मनोभावें मदत देतील; व त्यांनीं उत्तम मदत दिल्यास त्यांनाही पुढें महाराज साहेब एक मोठा प्रांत तोडून देऊन तुमच्या सर्व सरदारांच्या बरोबर लेखितील. ( असें ह्मणून खालीं बसतो. )

**सरदा-**( शूरसेनाच्या सर्व सरदार हातावर हात देतात तशांत फांकडे टाळी चुकून खालीं पडतो, ) आणि अर खंडबा पागोटें कुठ हे ह्मणून विचारतो.

**शूर.**– कां सुंदरसिंग ही मसलत तुमच्या मनास कशी आली?

**सुंद.**– सरकार बंदा आपका निमक खाताहै, जरूर गादीकी खिदमत् और ताबेदारी उठाना यही गुलामका काम है.

**फांक**--सरकार ह्या रांगड्याच्या हातान काई बी नायी होणार, शिपा-याचं काम लई कठीण है. ह्यो उडदाची डाळ आणि पासरीभर चपात्या खाणारा ह्याच्या बाला शिपाईगिरी काय ठाव.

**सुंद.**– सच है सरकारके कदमके मुलाजेसे तुजको आज छोड देता हूं.

**शूर.**-- आतां ही मसलत केव्हां व किती दिवसांनीं व कोठें या बदलची नक्की खबर माझा प्रिय मित्र खलराज तुह्मा सर्व-त्यांना सांगेल.

**सरदा-**मुजरे करतात. फांकडे दारूच्या निशेत पडतो व त्याचा धक्का दुसऱ्या सरदारांस लागल्यामुळें तेही झोकांडे खातात.

(पडदा पडतो.)

## अंक २ प्रवेश २ रा.

### पात्रें.

१ विजया ................ (राणी)

२ मथुरा ................ (दासी)

३ चंद्रसेखर ............ (राजा)

(विजयाराणी एकटीच विचार करीत बसली आहे, मथुरा व मैना पंखा घालीत उभ्या आहेत.)

**राणी**–मथुरे, अजून स्वारी कांग आली नाहीं!!

**मथु.**– महाराजांना हजार वर्षांचं आयुष्य है, महाराज बैसाइवानं मला सांगितलं आणि मी सज्यावर जातें, तों महाराज पुढेंच हैती; तों चंद्रसेखर येतो.

**राजा**–कां आठवण करतांच जवळ आहें कीं नाहीं?

**राणी**–तें काय विचाराव! माझ मन पायां जवळ आहे ह्मणून परमेश्वरही आमच्या जवळच आहे.

**राजा**–पहा किती ही शहाणी आहे! एका अर्थानें माझे उपकार मुळींच मानले नाहींत, आणि दुसऱ्या अर्थानें परमेश्वरा सारखें मला पूज्य मानिलें. खरोखरच परमेश्वरा जवळ जर आपलें खरें लक्ष्य आहे तर तोही जवळच आहे.

**राणी**–असो, पण आपण शूरसेनाचें लग्न केव्हां करणार?

**राजा**–हो बरी आठवण केली. तुला दाखविण्यासाठीं मी स्वतः राजकन्याच्या तसबिरी आणिल्या आहेत, (असें ह्मणून तसबिरा दाखवितो.)

**राणी**–(मोठ्या आनंदानें) सरकार ही कोणत्या देशाची राजकन्या?

**राजा**–प्रिये ही काशी राजाची मुलगी हिचें नाव मधुमालती, दुसरी ही काश्मीरच्या भुवनपाल राजाची इंद्रसेना मुलगी, आणि तिसरी ही दक्षिण दिशेस सिंव्हलद्वीपा जवळ जें कांतीपुर आहे तेथल्या राजाची कमळादेवी ह्मणून ही कन्या आहे.

**राणी**–आहाहा!! महाराज ही कमळादेवी आपल्या शूरसेनास करावी.

ही प्रत्यक्ष देवीच दिसत आहे.

**राजा**–प्रिये, ही कमळादेवी उत्तम आहे पण हिला शोभणारा आपला शूरसेन कोठें असा आहे? तो जर योग्य असता तर ही स्त्री शोभली असती.

**राणी**–काय बोलावं कोणजाणे आपला मुलगा कां कोठें आपणास वाईट आहे?

**राजा**–प्रिये, आपला मुलगा जाहला ह्मणून काय झालें, आपल्या हातानें कांटा कां आपणांस लागत नाहीं.

**राणी**–मेलं असोंद्या आतां तुमचं तें ब्रह्मज्ञान, मी तर हीच सून करणार. पाहिजे तें करा पण आपल्या बाळासाहेबास हीच बायको करा.

**राजा**–अग, पण आपण पसंत करून काय उपयोग? त्याला पसंत पडली पाहिजेंना!

**राणी**–मी उद्यां ही तसबीर त्याला पाठवून देतें ह्मणजे झालं, तो थोडाच ह्मणणार आहे कीं मला हीच बायको पाहिजे किंवा नको. आपल्या मनांत आली ह्मणजे त्याच्या मनांत आली असेंच समजावयाचें.

**राजा**–अग, आतांच्या मुलांना आपलें करणें आवडत नाहीं. त्यांना असें वाटतें कीं आईबाप ते वेडे आणि आपण शहाणे.

**राणी**–त्यांना काय होत तें ह्मणतील कीं आह्मी नाचतों आह्मांला नाचूंद्या.

**राजा**–हो, मग नाचविलेंच पाहिजे न नाचवून कसें चालणार?

**राणी**–अशीं मुलें नाचविणाऱ्या आईबापांना आईबाप ह्मणत नसतात, ते मुलांचे प्रत्यक्ष शत्रूच समजले पाहिजेत.

**राजा**–ठीक तुझी मर्जी आहे तर हीच मुलगी जमवूं. उद्यां पासून लग्नाच्या तयारीला लागलें पाहिजे, व उद्यांच व्याही मंडळीला पत्रें वगैरे पाठवून त्यांनाच इकडे बोलावितों.

**राणी**–पण त्यांचा रुकार आहे का? नाहीं तर केलेली खटपट व्यर्थ न जावी.

**राजा**–वेडे, अग पायां पडतील, कारण तो सुद्धां आपला मांडलीक राजा आहे.

**राणी**—मग तर ठीक झालें. माझ्या तर मनांत ही मुलगी सोळाआणे उतरली.

**राजा**—मी सुद्धां आज राज्यांतलि कामें पहातां पहातां फार थकून गेलों आहें. मलाही झोंप येते.

**राणी**—स्वभावच चवकसखोर पडला त्याला काय करणार, नाहींतर राज्यांत मंत्रीजन थोडे कां आहेत?

**राजा**—सखे, राजानीं नुसता मंत्रीजनावर विश्वास ठेवून का कोठें राज्य चालतें! अग आह्मी तरी प्रजेचे नौकर आहोंत असें समजलें पाहिजे. कारण प्रजेच्या श्रमाचा जो आलेला पैसा त्या पैशा वरच आह्मी मौजा मारितों.

**राणी**—मी आपली वेडी मला कांहीं समजत नाहीं. असें ह्मणून आळस देते.

( पडदा पडतो. )

## अंक २. प्रवेश ३ रा.

### पात्रें.

१ शूरसेन.........(राजपुत्र)

२ मथुरा ............(दासी)

( शूरसेन विचार करीत बसला आहे. )

**शूर.**— रंभेला पुष्कळ सांगितलें पण कांहीं केल्यानें ती ऐकत नाहीं. तिला सोडून मी वाड्यांत आलों ह्मणजे माझी बुद्धी उलटते, आणि तिच्या संन्निध असतां ती जें जें ह्मणते तें सर्व तिच्या ह्मणण्या प्रमाणें कबूल करावें लागतें तीनें जशी काय मोहिनीच मजवर टाकिली आहे. ( असें ह्मणतो तों वाड्यांतील मथुरा दासी येऊन पायां पडते. )

**मथु.**— सरकार मला पयठनी पाहिजे, तर मी सरकारास दाखवीन नाहीं-तर मी कधीं दाखविणार नाहीं.

**शूर.**— अग काय पण, तुला पयठणी येक सोडून माझ्या कडून च्यार, ही तसबीर कोणाची? माझी प्राणवल्लभा रंभा हिनें आपली तस-

वीर का तुझ्या हातीं पाठविली आहे ?

**मथु.**– (हे शद्ब कर्णी पडतांच तिचें तोंड खरकन उतरतें आणि ह्मणते) सरकार कोणती रंभा, मला ती माहीत नाहीं; पण थोरले महाराज आणि राणी साहेब तुमचें यांच्याशीं लग्न करणार (असें ह्मणून तसबीर हातीं देते.)

**शूर.**– तसबीर हातीं घेऊन, आहा! खरोखर अरे, रंभा तर हिजवरून ओंवाळून टाकावी पण आतां काय उपयोग तिजला वचन देऊन चुकलों, तीच माझी प्रिया आह्मी जर आपलें वचन न ठेविलें तर मग जगांत वचन शद्ब कोठून राहणार ?

**मथु.**– महाराज असल्या कमळाच्या पाकळी सारख्या बाईसाब टाकून मेली ती रंभा कोठून आली.

**शूर.**– अग चावट पोरी, तुला ग कोणी हा चावटपणा सांगीतला? अरे कोणी बाहेर आहे का नाहीं हिला येथून बाहेर काढा. (असें ह्मणतांच मथुरा बाहेर निघून जाते.) अरे? नादांत हिला तर असें बोललों, पण ही पोर आतां ही गोष्ट माझ्या आईला जाऊन सांगेल आणि मग रंभा तर मुळींच मला मिळणार नाहीं. अरे मी आपल्या हातानेंच आज हा अनर्थ करून घेतला. आतां तर मला कांहीं सुचत नाहीं. झाला!! घात झाला!! रंभे अग मीच तुझ्या अनर्थास कारण होणार. प्रिये, माझें तर लग्न होईल परंतु तुझें कसें होणार. तू तर सर्वस्वी माझ्यावर अवलंबून राहिली आहेस, (हातीं तसबीर घेऊन ह्मणतो.) "अरे शूरसेना ही कमळा तर शुद्ध कमळाच आहे, असो रंभा तर आपल्याला मिळालीच आहे परंतु आधीं ही कमळा प्राप्त करून घेतली पाहिजे. अहा!! मग तर मी जास्त सुखी होईन, तर आतां हाच बेत निमूटपणें कमळेशीं लग्न करून घ्यावयाचेंच, मग पुढचा बेत पुढें. हो तर मग हाच बेत ठरला.

(पडदा पडतो.)

## अंक २. प्रवेश ४ था.

### पात्रें.

१ विजया ............ (राणी)
२ मैना ................ (दासी)
३ मथुरा ............... ( ,, )
४ चंद्रशेखर .... ....... (राजा)

(विजयाराणी वसली आहे.)

**राणी**–बहुत करून तर सर्व तयारी जहालीच, आतां फक्त व्याहीमंडळी मात्र येण्याचें बाकी आहे, पण होय बरी आठवण झाली. कोण आहे? दासी मैने, आणखी कोण आहेत?

**मैना**– बाईसाब सगळ्या हैती. रंगी, केशरी, विठी आह्मी सगळ्या पायांपशी हजर हैत सरकार.

**राणी**–अग मथुरी दिसत नाहीं, रांडेन मला परबाचा निरोप कांहीं दिला नाहीं.

**मैना**– बाईसाब तिला बी बोलावतें. (ह्मणून आंत मोठ्यानें हाका मारते) मथुरे, अग मथुरे, ही बगा महाराज मथुरा आली.

**मथु.**– (येते व खालीं मान घालून उभी आहे.)

**राणी**–अग मथुरे अशी कांग रांड उभी! बाळासाहेबास तसबीर दाखविलीस कीं नाहीं?

**मथु.**– (गोरं मोरं तोंड करून रडूं लागते.)

**राणी**–(घाबरून) अग ही रांड रडती कशाला, अग रांड बोल तरी! तुला रडावयाला झालं तरी काय? अग बाळासाहेबांची तब्येत तर बरी आहेना?

**मथु.**– बाईसाब त्यांची तब्येत बरी हे पण मला सरकार ह्मनाल कीं, या चावट पोरीला काडून द्या.

**राणी**–(हसून) रांडे तर तूं कांहीं चावटपणा केला असशील.

**मथु.**– बाईसाब, मी तसबीर उघडली आणि सरकारला दाखवितें इत-

क्यांत मला ह्मणाल मधुर, माझी प्राण प्रिया जी रंभा तिची कां तसबीर तूं आणली आहेस? हीच माझी स्त्री होईल काय, असं ते बोलले.

**राणी**–( कपाळास हात लावते ) कोण रंभा हर हर घात झाला, कर्मा शेवटीं तूं धांव घेतलीस. तरी ह्मणत होतें कीं कारटा बिघडेल याच्यावर लक्ष्य असूंद्या. ( इतक्यांत चंद्रशेखर येतो. )

**राजा**–ह्या समयीं तूं मोठ्या घाईत आणि आनंदांत असावयाची, तो अशी कपाळास हात देऊन कां बसलीस?

**राणी**–कर्म ओढ घेतें ह्मणून, "मन चिंती एक आणि प्रालब्ध घडवी अनेक"

**राजा**–असें झालें तरी काय, तुझ्या माहेरचें पत्र का कांहीं बरें वाईट आलें आहे?

**राणी**–माझ्या माहेरचीं सर्व मनुष्यें बरीं आहेत, परंतु तुमच्या शूरसेनाचे प्रताप ऐकून काळीज करपून गेलें.

**राजा**–अग असं त्यानीं केलं तरी काय?

**राणी**–अहो, तो त्या भिकारड्या सरदाराच्या मुलीशीं बिघडला आणि ह्मणतो तिच्याशीं लग्न करून द्या.

**राजा**–अग तो कोण, आणि कोणाची ती मुलगी हें तर सांगशील?

**राणी**–अहो ते नव्हे का विठोजीराव महाळुंगे आपले पदरचे सरदार त्यांच्या भावाची मुलगी. त्यांचा भाव मरून गेला, ती रांड सगळ्या गांवची वेश्या रंभी तिच्याशीं, आणि ती तरी घरीं कोठें आहे, तिचे आईबाप मेल्या पासून ती रांड खराम्याची बोडकी तिची मावशी, तिच्याच जवळ ती असते.

**राजा**–हर! हर! कोण हा अनर्थ!! अरे ती तर प्रत्यक्ष नरकाचें द्वार. ती ह्मातारी आणि तिच्या तालमींत वाढलेली आमच्या महत द्वेषी अशा सरदाराची मुलगी ती कार्ट्याला आवडली काय? अग हा मुलगा आतां पासूनच मला पूर्ण कर्म चांडाळ दिसतो, माझ्या मागें राज्य कसें चालवील तें चालवो. मूर्खा, प्रत्यक्ष रत्नाला

झुगारून देऊन गारगोटीची इच्छा करितोस काय? तर मग आतां वाट पाहून उपयोगच नाहीं. उद्यां व्यांहीमंडळी आली कीं परवा कार्टीचें लग्न करून टाकितों. कार्टी असा बिघडत चाललास काय?

**राणी**—हो असेंच केलें पाहिजे. परंतु दासीची विनंती इतकीच कीं, या गोष्टीचा खेद न करितां कार्य स्वसंतोषानेंच केलें पाहिजे.

**राजा**—छे, छे, त्याचा कसला खेद त्यांत आपलें काय बिघडलें. त्या माहाळुंग्याच्या मुलीचेंच वाईट होणार, आणि हाही कार्टा केल्या कर्माचें फळ भोगील. आपलें कर्तव्य कर्म तें आपण करावें, जन्माचे धनी आपण आहोत, कर्माचे धनी कां आपण कोणाचे आहोंत!

**राणी**—सांगावयास फार करून नकोच पण सहज सूचना केली.

( पडदा पडतो )

## अंक २. प्रवेश ५ वा.

### पात्रें.

१ रंभा.........................

२ कुमती.........................

३ गिरिजा.........................

४ हरिपंत खोटे......( दिवाण )

( रंभा गालास हात लावून एकटीच विचार करीत बसली आहे. )

**रंभा**— देवा, ज्या गोष्टीची मी आणि माझी मावशी इच्छा करीत होतों ती इच्छा पूर्ण होणें आतां कठीण दिसते. छे, आशा कशाची! व्यांही मंडळी सुद्धां नवरी मुलीसह येऊन पोहोंचली, गावांत लग्नाची तयारी दिसूं लागली, लग्नमंडप सुद्धां पडला. ( मोठ्यानें सुसकारा टाकिते. )

**कुम.**— बये, कांग अशी तूं दुःखीत होऊन बसलीस.

**रंभा**— मावशी माझं कर्म फुटलंग फुटलं, आतां रडूं नको तर काय करूं.

कुम.– बये मी तुझ्या साठीं थोडाका प्रयत्न केला! तुला राजा नवरा मिळेल ह्मणून हजारों रुपये खर्च केले, परंतु प्रारब्ध खाला आपण काय करावें.

रंभा– अग मावशी, तूंच आज पर्यंत ह्मणत होतीसना प्रारब्ध गरीबाचे मागें लागते, आपल्या श्रीमंताला प्रारब्ध काय करणार?

कुम.– बये तें सार खरं, पण असं होईल ह्मणून मला काय ठाऊक.

रंभा– अरे देवा! त्यांना सुद्धां माझा विसर पडला, आज आठ दिवसांत ह्या चांडाळणीचं मुख सुद्धां पहावेसें वाटलें नाहीं. आतां मी काय करूं, वाड्यांत जाऊन त्यांना भेटूं तर मला तेथें कोण जाऊन देतो. अग चांडाळणी रंभे गेले ग गेले तुझ्या हातूत ते निसटले, गरीबाच्या सुद्धां मुली त्यांचा सोहळा डोळ्यानें पहातील, परंतु माझ्या तर तेंही नशीबीं नाहीं.

कुम.– बये तूं असं रडूं लागलीस ह्मणजे मला कससच वाटत.

रंभा– मावशी, आतां तरी कोणाला देऊन माझ तोंड येथून काळ कर, आतां आशा मला कशाची. आतां माझा परिणाम पुढें बरा दिसत नाहीं, हें बग माझें सर्वांग कांपत आहे व वाईट आपशकुन होत आहेत रात्री स्वप्नें सुद्धां मला फार वाईट पडलीं होतीं.

कुम.– अग माझे लाडके बये, तूं अशी घाबरतेस कां उद्यां तुला सोन्या सारखा नवरा पाहून आणतें. कोण आहेग बाहेर गिरिजे, आपल्या दिवाणजीला बोलाव.

गिरि– बाईसाब कोणाला बोलावूं.

कुम.– अग रांडे आपले दिवाणजी हरीपंत खोटे यांना बोलाव.

गिरि– जी व्हई बाईसाब, गिरिजा धांवत खालीं जाते आणि मोठमोठ्यांनीं हाका मारते, य दिवाणजी दिवाणजी, चला बाईसाब तुह्माला बोलावत्याती.

दिवा– (खोलीमध्यें निजले आहेत ते हाक ऐकतात आणि ह्मणतात) काग पोरी बोंबलतेस.

गिरि– हं अजून ऐकल नाहीं जणूं; अन बाईसाब तुह्माला बोलावत्यात कीं.

दिवा–अग जा बाईसाबाचे सूडके पांच रुपये पगार द्यावयाचा आणि उगीच सतरादां दिवाणजी दिवाणजी ह्मणून त्रास द्यावयाचा! माझ्या पेक्षां सात रुपयांचा शिपाई सुखी. आपण तर बोवा या सरदार लोकांच्या खानगी चाकरीला कंटाळलों आणि त्यांतून ही जनानखान्याचे नोकरीला तर नमस्कार असो. नवा तरणा होतों तों पर्यंत ही नोकरी बरी वाटत होती, पण आतां नको, दमला जीव ( तपकीर ओढीत ओढीत जातो. )

गिरि–बाईसाब हे बघा दिवाणजी आल हेती.

दिवा–( दहा पंधरादा जमिनीशी लवून मुजरा करितो. )

कुम.– दिवाणजी तुह्मी आजचे आज चालते व्हा.

दिवा–सरकार आतां मला कोठें पाठवितां, माझीं लाकडें आतां मसणांत गेलीं आणि आपले पाय सोडून कोठें जाऊं.

कुम.– अहो, मी तुह्माला नोकरी वरून रजा देत नाहीं. तुह्मी असे घाबरता कां, माझ्या बयेला नवरा पाहून आणा.

दिवा–तें माझं काम, पण सरकार रुपयांची तजवीज?

कुम.– अहो माझ्या बयेच्या लग्नाला आणि रुपयांला काय कमती; पण हल्लीं सुमारें तुह्माला किती रुपये देऊं?

दिवा–सरकार पांच चार हजार रुपये पुष्कळ जाहले.

कुम.– तर मग जामदार खान्यांतून रुपये घ्या, पण हिशेब दमडी दमडीचा घेईन!

दिवा–सरकार मी आपल्या पायां जवळ नुसत्या कच्या शिध्यावर कारकून होतो, दिवाणगिरी मिळाल्याला आज सारी सोळा वर्षें झालीं, माझा विश्वास आपणास पूर्ण आहेच.

कुम.– जा, तर जा, आजचे आज चालते व्हा.

दिवा–( मुजरा करतो, जातो. )

( पडदा पडतो. )

### अंक २ प्रवेश ६ वा.

१ हरिपंत खोटे ............ (दिवाण)

**दिवा**—शिकार तर खूप आली आहे! ह्या मुलीचे लग्नांत दहावीस हजार रुपये तर सहज मिळणार, पण कष्ट मात्र आपल्यानें आतां व्हवयाचे नाहींत. बाकी लोकांना सांगावयास मला पगार पांच रुपये, पण परवांच मीं आपल्या व्याज बऱ्याच्या चोपड्या पाहिल्या त्यांत कमीत कमीं चाळीस हजाराची माझी देवघेव झाली आहे. शिवाय शेतकींत पैसा घातला तो निराळाच. पण येवढें मिळवून खाणार कोण? बायको तर मेलीच, बरा मुलगा होता तोही मेला; बरें स्वतः शरीराला तरी सुख आहे तर तेंही नाहीं. अलीकडे अंग तर माझें फारच पांढरें होऊन गेलें, तरी नेहमीं ब्राह्मण भोजन चालूच आहे, काशीला दोनदां जाऊन आलों. पण शरीराचा पांढरेपणा कांहीं जात नाहीं, तर आतां ही खटपट आपणास नकोच आपण जाऊन देशीं बसावें; आणि ही सर्व खटपट त्या आप्पा थाप्याच्या गळ्यांत घालावी.

(पडदा पडतो.)

### अंक २ प्रवेश ७ वा

#### पात्रें.

१ विजया .... ......... (राणी)

२ चंद्रसेखर............... (राजा)

(विजया राणी बसली आहे व दोन बाजूला दोन दासी पंखा घालीत आहेत)

**राणी**—आतां माझा जीव थोडासा स्थिर जाहला. अजून कां बरें स्वारी आली नाहीं! आलेच जणु, हो, तेच आले.

**राजा**—कां झालें कीं नाहीं तुझ्या मना सारखें, चला एकदाचें पार पडलें.

**राणी**—पण सूनमुलेच्या वेळीं सून पाहिली का?

**राजा**—अग तें मुख काय पहावयाचें आहे, मुख पहातांच त्याच वेळीं मनानें म्हटलें कीं, हीच आमच्या कुलाची कुलदीपिका होय,

‘ आमच्या सूर्य वंशाला उज्जल करणारी ही साक्षात् ज्ञानकळा होय, आमच्या ह्या सुवर्ण पुराची प्रत्यक्ष देवीच होय.

**राणी**–खरोखर, काय बाई तिच्या मुखावर तेज आहे, दिवसभर तिच्या मुखाकडे पहातच बसावसं वाटतं.

**राजा**–ह्मणजे, अग पुण्यवान् सुशील अशा पवित्र घरची मुलश्री अशीच असावयाची; तें तेजच निराळें.

**राणी**–या खटपटीनें मला तर केव्हां शय्येवर पडावं असं जाहल आहे.

**राजा**–तर मग आपली पण तयारीच.

(पडदा पडतो.)

## अंक २. प्रवेश १ ला.

### पात्रें.

१ **शूरसेन**. ............... (राजपुत्र.)

२ **कमळा**. (शूरसेन राजपुत्राची राणी.)

(राजपुत्र आणि नवीन कमळा राणी सुवर्णाचे पलंगावर बसलीं आहेत; दासी पंखा घालीत आहेत.)

**शूर.**– अहा! माझ्या आई बापानीं मला स्त्री तर मना सारखी करून दिली पण दरिद्री जसा धनवान व्हावा आणि नंतर त्याला जसें पूर्वीचें दारिद्र आठवावें तशी मला ती आठवण झाली ह्मणजे वाईट वाटतें.

**कम.**– सख्या, तें काय आपल्याला कसली मागली आठवण होते.

**शूर.**– प्रिये, तुला ती गोष्ट सांगण्या सारखी नाहीं.

**कम.**– ह्मणजे प्राणनाथ, हेंच माझें प्रथमारंभी सुखाचें मंगलाचरण कीं काय?

**शूर.**– (अरे माझी प्रिया किती चतुर आहे!) सखे, अग तूं आज माझ्या सन्निध्र आहेस ह्मणून मला किती आनंद वाटतो, आणि ह्याच रंगमहालांत मी एकटा निजत असें त्या वेळीं मला किती दुःख वाटत असे, ह्या गोष्टीचें स्मरण होऊन मी तसा बोललों, दुसरें कांहीं नाहीं.

कम.– सख्या, दासीनें आपणाशीं हा सहज विनोद केला त्याचा राग तर यावयाचा नाहींना.

शूर.– नाहींग नाहीं, सखे हे तुझ्या मुखकमळांतील शब्द नाहींत, पण शूरसेनावर पुष्पांचा वर्षाव होतो असें मी समजतों.

कम.– छे, छे, अशी योग्यता मजमध्यें मुळीच नाहीं. प्राणनाथ, मी सासूबाईला नमस्कार करून येतें, मी तिकडेच जाणार होतें पण आपली इच्छा दिसली ह्मणून आलें. (गालाला हात लावून) आज्ञा असेल तर जातें.

शूर.– प्रिये, जा बरं, जाऊन लवकर येशील ना?

कम.– हं त्यांना नमस्कार केला कीं मी आलेंच. (असें ह्मणून जाते)

शूर.– अहा हिचें बोलणें तरी किती सरळ आहे. पेंच, पाच, लाघव तर ही ओळखीत देखील नाहीं. आपणही जरा थोडा वेळ कशी तरी मनाची कर्मणूक करून घेतली पाहिजे. (असें ह्मणून निघून जातो)

(पडदा पडतो.)

## अंक ३ प्रवेश २ रा.

### पात्रें.

१ हरीपंत खोटे ...................... (दिवाण)

२ आपाजीराव थापे (सुवर्णपुरांतील एक भिक्षुक)

(हरिपंत खोटे व आपाजीराव थापे.)

हरी.– कां आपा, शिकार आली आहे, तुझ्यानें होण्या सारखें असेल तर सांगतों.

आपा– अरे हरिपंत सांग तर खरें, कांहीं तथ्यांश असला तर आपली तयारी; नाहींतर रिकामे हिसके कोण घेतो?

हरी.– अरे हिसके नाहीं, नुसत्या अकबरशाई मोहोराच समज.

आपा– तर मग आपली तयारी, हा बटवा मजजवळच आहे, जातां जातां वाटेंत एक तांब्या आणि दोन शेर पोहे घेतले कीं आपली तयारी.

हरी.– तें सगळें खरें पण काम मोठ्या मेहनतीनें आणि सचोटीनें केलें पाहिजे, व मुख्यत्वें करून माझा बोभाट न व्हावा.

आपा– अहो, पण हरीपंत एकदां काय तें आपलें गूढ तर पडूंद्या बाहेर ह्मणजे आमच्या कल्पना तरी चालतील.

हरी.– अरे आमच्या यजमान साहेबांनीं आज मला एक मोठी तातडीची कामगिरी सांगीतली आहे.

आपा– आपले यजमान, कोण, त्या-आपल्या जिवाच्या-वाड्यांतल्या ?

हरी.– अरे मूर्खा, मोठ्यानें बोलूं नकोस, कसें केलें तरी ते आज श्रीमंत आहेत. त्या गोष्टीचा संबंध निराळा, त्यांच्या मनांत येतें त्या वेळीं आपल्याला पाहिजे तें समजतात, पण आपण त्यांना मातुश्री समजतों असें निदान लोकांना तरी दाखविलें पाहिजे.

आपा– असो; आपल्याला तरी ह्या गोष्टीचें काय करावयाचें आहे, आपणास कांहीं तरी याचें पागोटें त्याच्या डोकीवर ठेवून वर्षाची फसल बाहेर पडली ह्मणजे झालें.

हरी.– फसल तर सहज पण वरती दोनशें रुपये दक्षणा.

आपा– हरीपंत तर आतां सांगाच एवढी कामगिरी या ब्राह्मणाचे पदरीं पडूंद्या, कारण अहो तुह्मी कसें केलें तरी श्रीमंताचे दिवाण अहांत तुमच्या हातानें आह्मांस दोन पैसे न मिळावेत तर मग आह्मी आशा तरी कोणाची करावी.

हरी.– हे पहा, आमच्या बाईसाहेबांच्या सख्या बहिणीची मुलगी रंभा बाईसाहेब ती फार उपवर झाली आहे तर तिला या दोन महिन्यांत कोठून तरी वर शोधून आणावयाचा आहे आणि तिचें लग्न यंदा ठेवावयाचें नाहीं, असें आमच्या बाईसाहेबांच्या मनांत आहे. ह्मणून कालच या कामासाठीं आह्मास बिदागी मिळाली, पण आपण आतां थकलों, आपल्यानें प्रवास होत नाहीं; ह्मणून तुला सांगितलें कारण तूं या कामांत हुशार आहेस. सर्व जमलें ह्मणजे मला माझ्या देशीं पत्र पाठीव मग मी व तूं मिळूनच इकडे येऊं.

आपा- मग ही गोष्ट करण्याचें तरी मला सहज आहे या बद्दल तुम्ही खात्री आहेच. परवा बोलतां बोलतां त्या दफेदाराची आंधळी मुलगी त्या मुजुमदाराच्या येथें घातली पण पांचशें रुपये घेतले.

हरी.– मग यंदा तुझा लाट आहे, तुझी चांगलीच पोळी पिकेल असें वाटतें.

आपा- मग ब्राह्मणाचा खर्चही तसाच आहे हव्य कव्य द्वादशीला पांच चार ब्राह्मणाला रगडून इच्छित भोजन देत असतो, अरे कांहीं तरी पुण्याईचा मार्ग असल्या वांचून पाप कमी होत नाहीं. पापा वांचून पाऊल प्राण्याचें पडत नाहीं, ह्मणून थोडी तरी देहास सुटका असलीच पाहिजे.

हरी.– तर मग हे पांचशें रुपये घे आणि पांच च्यार मनुष्येंही संगातें घे कारण मनुष्याला आमच्या वाड्यांत कांहीं कमी नाहीं, पाईलीचे पंधरा भरले आहेत, च्यार कांदे आणि च्यार जोंधळ्याच्या भाकरीवर रात्र दिवस आमचे येथें पडून राहतात. कुणवट गडी, येवढें तरी त्यांना कोण देतो. तेव्हां तूंही त्यांतून पांच चार घेऊन जा, काम मात्र करून आलें पाहिजे. रुपयांची खूट पडली तर मला लिही. मी हुंडी करून पाठवून देईन.

आपा- अरे पण असली सोन्या सारखी मुलगी आणि तिला इतका प्रयत्न?

हरी.– (कानांत सांगतो.)

आपा- (मान हलवितो) मग बरोबर, कारण असल्या मुलीला अजून सतरा मागणी आलीं पाहिजेत.

हरी.– तर मग तुला आजचे आज गेलें पाहिजे.

आपा- छे, त्याची तुह्मी काळजी करूंच नका, आज संध्याकाळीं तुह्मी आळशीचा मुक्कामच समजा.

(पडदा पडतो.)

## अंक ३. प्रवेश ३ रा.

### पात्रें.

१ कमळा .................. (राणी.)

२ दया ………………… (दासी.)
३ शांती ………………… ( ,, )
४ क्षमा ………………… ( ,, )
५ तितिक्षा ………………… ( ,, )

## महालक्ष्मीचें मंदीर.

( देवीच्या सभोंवती दासी चवऱ्या घेऊन देवीवर वारता आहेत. दोन दासी सोन्याच्या काठ्या हातीं घेऊन दोन बाजूला उभ्या आहेत, गवयानें गाणें सुरू आहे, जागजागी दिवालगीच्या शामदाने, जळत आहेत, कमळाराणी हातीं आरती घेऊन उभी आहे, आरती करताना अनेक वाद्ये वाजत आहेत, आरती व पूजा जाहल्या नंतर कमळाराणी देवीची प्रार्थना करिते. )

कम.— हे जगत जननी, तूं या सर्व ब्रह्मांडाची आदी माया आहेस, अंबे प्राणिमात्रास तुझ्या कृपेनेंच या संसारांत सुबुद्धी उत्पन्न होणार, अनंत जन्मीच्या आणि जन्म मरणाच्या दुर्धर संकटांतून मुक्त करणारी तूंच आहेस. अंबे तुझ्या स्वरूपास जे विसरतील तेच अधम जीव लक्ष चौऱ्याशीं जन्माच्या चक्रांत पडून विपत्ती, क्लेश, घोर यातना सोशीत अनंत जन्म पर्यंत या जन्म आणि मरणरूपी अघोर नर्कांत पचणार आहेत. हे आदी माये तूंच मला सुबुद्धी दे, या मृगजलवत् क्षणिक संसारांतील माईक विषयाची वासना माझ्या हृदयांत उत्पन्न होऊं देऊं नकोस. सर्व जन्मांत जो श्रेष्ठ मनुष्य जन्म मला प्राप्त जाहला आहे हा देह ज्या मातेच्या उदरीं जन्मला आहे त्या देहास कसलाही कलंक न लागतां माझ्या मातापितरांचे तसेंच सासू सासऱ्यांच्या तसेंच माझ्या प्रिय पतीच्या मुखास कलंक लागेल असें वर्तन कदापी मजकडून घडवूं नकोस, हीच अनन्य प्रार्थना तुझे चरणी नित्य आहे. (असें म्हणून देवीवर पुष्पवृष्टी करिते. वाजंत्री वाजतात.

( पडदा पडतो. )

( पांच चार दासी पडद्या बाहेर येतात. दया, क्षमा, शांती आणि तितिक्षा. )

**दया**– अग शांते, बाईसाहेबांची पूजा आणि त्यांचें लक्ष देवीवर करों आहे तें पाहिलसना?

**शांती**–आहा! काय बाई, तें सांगाव अग बाईसाहेबा जवळ सदा बसून असावसं वाटत. घर नको, दार नको, कसली खटपट नको, त्यांची सेवा करावी, आणि चरणां जवळ बसून रहावसा वाटत.

**क्षमा**– ह्या बाईसाहेब वाड्यांत आल्या पासून मला तर तहान लागत नाहीं, भूक लागत नाहीं, कोणी बोलेल त्याचा राग येत नाहीं, कोणी बर ह्मणा वाईट ह्मणा, बाईसाबांना मी आवडलें ह्मणजे झालं मला कोणाची परवा वाटत नाहीं.

**तिती**–अग खाण्याचच काय घेऊन बसलीस, बाईसाबानीं सांगितलें कीं गच्चीवर थंडींत निजून रहा तर मी महिनाभर निजून राहीन त्यांनीं मला दुपार, रात्रीं, अंधार काळोखांत पाठविलं तरी मी जरा भिणार नाहीं. अहाहा! धनीन मिळावी तर अशीच मिळावी ह्मणजे आपल्या जन्माच सार्थक व्हावयाचं.

**क्षमा**– कायग दये, आपल्याला देव मिळेल कायग?

**दया**– हो आपल्याला त्यांच्याच पुण्याईनें मिळेल. अग कालच बाई-साब पुराण वाचीत होत्या तें त्वां ऐकल नाहींस? कोणीएक देशच्या राणीला अंत समई वैकुंठीहून विमान आलें तेव्हां ती राणी जा-ताना आपल्या दासींना सुद्धां आपल्या बरोबर घेउन गेली.

**क्षमा**– अग त्या दासीही तशाच असतील, त्यांच आपल्यावानीं सत्वावर ध्यान नसेल.

**दया**– अग त्या तरी आपल्या सारख्या दासीच होत्या, अग बाई हे तर जे करील त्याच आहे, आपण तरी सत्वावर ध्यान कशाला ठेवाव.

**क्षमा**– मी देवीच्या पायांवर शपथ वाहून सांगतें, आपल्या तर मनांत तें भलत सलत येतच नाहीं, जशी विष्टेची घाण यावी तशी त्या गेल्या अमंगळ कर्माची घाण येते. या बाईसाब वाड्यांत आल्या पासून असच झालया.

**दया**– मला बी तसंच, अग सगळे मेले लुचे, जिवाचा सोयरा कोणी

नाहीं. मागल्या जन्मांत कांहीं पाप केलं व्हतं ह्मणून आपण बटकी झालों, नाहीतर आपल्याच बाईसारं बगाना! परमेश्वर त्यांना हजार वर्षांचं आयुष्य देवो, कशा नशीबाच्या हैती! राज्य लक्ष्मी आज त्यांच्या पायाशीं लोळण घेत आहे.

क्षमा– अग आपण इथंच बोलत उभ्या राहिलों पण बाईसाब जेऊन उठल्या असतील, मी बाई पानाचा डबा घेऊन जातें, चला चला तुह्मीबी सगळ्याजणी चला. (सगळ्या निघून जातात)

(पडदा पडतो.)

## अंक ३. प्रवेश ४ था.

### पात्रें.

१ सरदेसाई............... सरदार.
२ फांकडे .................. ,,
३ शिंदे ..................... ,,
४ खलराज..................मित्र

(खलराज, फांकडे, शिंदे, सरदेसाई जमले आहेत.)

देसा.– का फांकडे, अव्ह राव, तें राजाच पोर तरी लई लबाड दिसतया, आपल्याला बोलल कीं माझ्या बापाला कैद करून मला गादीवर बसवा, असं ह्मणून आमच्या जवळून वचन घेतलं आणि आतां विसरून गेल.

फांक– अव्ह राव, त्या किड माकडाच्या हातानं काय व्हावयाच है. चला एकदा फौज घेऊन आणि करा दोघानलाबी कैद, मग ध्या सुवर्णपुरीच राज्ज आपल्यालाच.

शिंदे– माझ्याबी मनांत तेंच घोळतया.

देसा– सुंदरसिंगबी आपल्याला मदत हैच, त्यालाबी कागुद ल्या, आणि करा हल्ला, आपल्याला नकोबा असला राजा.

फांक– नको, नको, तो आपल्याला नको; आपून गादीवर ह्या आपल्या खलराजाला बसवूं ह्मणजे झाल.

शिंदे- अहो राव तो त्या दिशीचा टोपीवाला गुजराथी कुठ रहातो. त्यान त्या दिवशी निशापाण्याची तर मोठीच बहार केली.

फांके- दम धरा कीं जरा, खलराज गादीवर बसला कीं तेलाच गादीच दिवाण नेमून टाकूं ह्मणजे झाल. मग निशाच निशा, घ्या निशा.

खल.—सरदारहो, मला एकवार तुह्मी सगळे वचन द्या ह्मणजे मी तुह्मांस कळवीन व सुंदरसिंगासही कळवीन.

सरदा- घ्या वचन, वचन, वचन, वचन ; ( असें ह्मणून प्रत्येक तीन-तीनदां टाळ्या देऊन जातात. )

(पडदा पडतो.)

## अंक ३ प्रवेश ५ वा

### पात्रें.

१ खलराज.

२ चहाडीखोर .... खिसमत्‌गार

( खलराज एकटा विचार करीत बसला आहे. )

खल.—तर मग आपल्याला सुवर्णपुरीचे राज्य मिळणार. या सरदार लोकांनीं आज मला अश्वासन दिल्या प्रमाणें जर मला राज्य मिळालें तर या सरदार लोकांचें एका क्षणांत कल्याण करून टेईन, यांत तर संशयच नाहीं. हो बरी आठवण जहाली, मी लहान असतांना कोणी ज्योतिषी माझ्या बापा जवळ आला होता व तोही ह्मणत होता कीं, खलराजाला राज्य प्राप्ती होईल, तेव्हां आतां मला तर खचीत वाटतें कीं त्याचें बोलणें निश्चयानें खरें होणार, याची तर आतां शंका नकोच. पण ज्या प्रमाणें राज्य मिळणार त्या प्रमाणे शूरसेनाची रंभा जर मला मिळेल तर मग माझ्या सारखा दैवशाली कोणीच नाहीं. अरे पण किती मी वेडा, जर राज्य मला मिळणार तर रंभा मिळण्याचें काय मोठें कठीण आहे ! आणखी शूरसेनापेक्षां रंभा माझ्याशीं लग्न करण्यास तर फारच लवकर तयार होईल, कारण शूरसेनापेक्षां मी दहापट

स्वरूपवान आहे, परंतु हा विचारच कशाला! ह्मण आहे कीं "जिवंत सर्प कोणी उशाखालीं ठेवतो?" मला गादी मिळाल्यावर राजघराणें तर मला तळामुळा सद्धां खणून काढलें पाहिजे, तें तर मी पहिल्यानें करणार. अहाहा! मग राज्याचा आणि रंभेचा उपभोग हा बहाद्दर मनमुक्त घेणार. कोण आहेरे बाहेर?

**खिज**--जी महाराज मी आपला हुजऱ्या चहाडीखोर पायांप हजर हैंकीं सरकार.

**खल.**--मी राजा जहाल्यावर या मूर्खाला आपले जवळून बदललें पाहिजे, कारण असला हलकट मनुष्य मग मला शोभणार नाहीं.

**खिज**--सरकार काय ह्मनत्याती, मला काढून टाकणार महाराज? आपण राज जहाल्यावर माझ्या बी गरीबाच दळीदर दूर होईल, आणि मला काडता कशापाई? सरकार राज जाहाल्यावर मीबी हलकटा सारखा कशाला राहूं. डोईला मंदील, अंगांत जरीचा कबजा, आणि मग दिमाखानी पान खावून थुकत थुकत चालीन. हे दिवस आपल्याला कशाच येतात! वांझला पोर झाल्यावानीं.

**खल.**--अरे किती बक बक चालविली आहेस, जेवणाची तयारी जहाली कीं नाहीं पहा.

**खिज**--बगतो सरकार.

(पडदा पडतो.)

## अंक ४ प्रवेश १ ला.

### पात्रें.

१ कुमती.

२ हरिपंत खोटे.

३ रंभा.

( रंभा आणि कुमती बसल्या आहेत, दासी उभ्या आहेत. )

**कुम.**— दिवाणजी अद्याप वाड्यांत आले नाहींत काय? अग कोणी आहे का नाहीं! दिवाणजीला बोलाव. (दाशी दिवाणजीला घेऊन येते)

**दिवा**—सातदां मुजरा करून खालीं बसतो.

**कुम.**— दिवाणजी तर मग तुह्मी ह्मणता तो वर माझ्या बयेला बरा आहे.

**दिवा**—महाराज बरा आहे ह्मणजे काय? रंभाबाईचें दैव थोरच, शुद्ध हिरा आपणास मिळाला आहे. उद्यां वरा कडील मंडळी आणि वर दोन प्रहरा पर्यंत वाड्यांत ठेविलेंच आहेत. कारण, महाराजाला या गोष्टीची किती चिंता आहे हें मला का समजत नाहीं?

**कुम.**— दिवाणजी तुह्मी वाईट करणार नाहीं ही माझी पूर्ण खात्री आहे. तर आतां असें करा कीं ही सर्व लग्नाची देखरेख आणि तयारी मंडपा पासून तों अखेर पर्यंत कोणी तरी विश्वासू मनुष्यास सोपून द्या.

**दिवा**—( माझ्याही मनांत तसेंच आहे. ) जी असेंच केलें पाहिजे. या गोष्टीकडे सरकारला अगदीं पहाणें नको. बाईसाहेबांनीं नुसता उभयतांचा सोहळा पहात असावा, आणि विहिणी व व्याही पक्षांकडे मान अपमानाच्या संबंधावर दृष्टी असली ह्मणजे पुरे, बाकी गोष्टींकडे अगदीं पहाणें नकोच.

**कुम.**— बये, तुला नीट दिसतेंना, तुझ्या मनास आलें ह्मणजे माझें शेरभर रक्त वाढलें.

**रंभा**— हूं. सर्व माझ्या मना प्रमाणेंच घडतें आहे ( मोठ्यानें सुसकारा टाकिते. )

**कुम.**– बये, अशी तूं उदास कां होतेस, तुला राजा काय सुख देणार होता? माझे बये-तूं ह्मणशील तर एक वस्त्र सुद्धां मी आपल्या आंगावर धड ठेवीन तर! तुझीच शपथ. सुतळीचा तोडा सुद्धां माझ्या बयेचा! तुह्मी आपले सुखानें नांदा. माझें बरें वाईट मी पाहून घेईन. अग हा तुला पाहिलेला वर भिकारी आहे येवढेंच कीं नाहीं, त्याची काळजी तूं करूं नकोस, त्याच्या सत्तावीस पिढ्याला पुरेल इतकें मजजवळ आहे. दिवाणजी उठा तर आतां आणि लागा तयारीला, मुहूर्त वगैरे ठरवा आणि जवळची तीथ पाहून माझ्या बयेवर आक्षदा टाका. ( डोळ्यांतून पाणी काढते व पदरानें पुसते. )

**दिवा**–सरकार, तें जहालेंच समजा आणखी दोन महिन्यांनीं रंभाबाईच हंसत सांगतील कीं माझें बरें झालें. सरकार, ह्या मुलाचें तरी कुळ हलकें नाहीं. वराचा बाप ह्मणत होता कीं, आह्मी हरिचंद्राच्या वंशांतले आहोंत. सरकार दरिद्री ते नुकतेच जहाले आहेत. ह्मणूनच वीस हजार रुपये हुंडा मी कबूल केला, नाहींतर मी एक फुटकी कवडी सुद्धां दिली नसती. असें ह्मणून मुजरा करतो.

( पडदा पडतो. )

## अंक ४. प्रवेश २ रा.

### पात्रें.

१ **सुंदरसिंग.**

२ **कल्याणसिंग.** ( सुंदरसिंगाचा मित्र )

### सुवर्णपुर खासपागा.

( सुंदरसिंग, कल्याणसिंग, जव्हेरसिंग वगैरे खासपागेंतील कामदार मंडळी बसली आहेत. )

**सुंद.**– ( हातांत कागद घेऊन ) अबे निमक हराम बह्मण खलराजा तूं सुवर्णपूरीका राजा बनता है क्या? बहोत खूब तेरेकू सुवर्णपूरीके स्मशानका भूपाल करता हूं.

**कल्या**-सुंदरसिंग किस गध्धेनें यह खत आपको लिखा है?

**सुंद.**— कल्याणसिंग, खलराज करके छोटे माहाराजका बीन दूमका एक गध्धा दोस्त है, वो हरामखोर मुजको लिखता है के माहाराज और छोटे माहाराजको हम परसूके दिन कैद करेंगे, तुमने हमको अच्छी मदत देना. हम तुमको बहोत बडे सरदार बनावेंगे.

**कल्या**-सुंदरसिंग बडी ताज्जूबकी बात है वो अहेमक् क्या बकता है. उसका बाप कभी गध्धेपरभी बैठा था, तो ये शैतान गादीपर बैठनेको चाहता है!

**सुंद.**— कल्याणसिंग, इस अक्कलके गद्दारकों औरभी तीन मुरगीपर हत्यार चलानेंवाले, औरतोंके दलाल मदतगार हुये है.

**कल्या**-ओ! हो!! भाइ, वो कौनसे विचित्र हरामजादे हैं सो मुजसे कहो तो सच.

**सुंद.**— तुम नहीं जानते, माहाराज बडे निगावानीसे और मेहेर नजरसे जिनको चाहातें हैं और लाखो रुपयोंकी जाहागीर जो खातें हैं वोही हरामखोर सरकारका गला काटनेकी कोशीस रखतें हैं.

**कल्या**-बहोत ताजुबकी बात है, भाई ऐसे नीमकहराम, बैमान, बदलिहाज, शैतानका, नाम तो मुजसे कहो.

**सुंद.**— कल्याणसिंग, येकतो दरबारमे कलागत लगानेंवाले जीनका नामही कलागतीराव है. दुसरा, हरामका खाके वाहीयाद चूलेके पास सोकर घरकी हंडीया संभालनेवाला आळसाजीराव फाकडे. और तीसरे सबसे बुरे दुनियाके दुशमान, रंडियोंके सरदार, निशाके राजा, और पैसेके भुके, दुराचारीराव, ये तीन्हो इस भटिआरा बच्चन जो खलराज उसको सामील हुवे हैं.

**कल्या**-ओ! हो!! जबतो क्या केहेना! पापी सो राजा बननेको चाहाता है, और धूतयारे उसको मदत देतें हैं, फिर क्या नरक कुंड कुछ दूर है; ऐ हरामखोर, याद रख. इस कल्याणसिंगसे गांठ है. तुजको कल वहीकुंडमे डालताहूं.

**सुंद.**— भाई कल अपने सब पासके लोक हत्यारबंद तयार रखना.

कल्या- बहोत आच्छा है अभी हुकम करदेताहूं. ( असें ह्मणून निघून जातात )

( पडदा पडतो. )

## अंक ४ प्रवेश ३ रा.

### पात्रें.

१ शूरसेन ............ ( राजपुत्र )

२ दुराचार ......... ( खिजमतगार )

३ खलराज ............... ( मित्र )

( शूरसेन एकटाच विचार करीत बसला आहे. )

शूर.– काय करावें आतां रंभा तर हातची जाते. एकदां रंभेचें लग्न जाहलें ह्मणजे मात्र ती आपल्या हातीं लागण्याचें कठीण, व तिला थोडे दिवस लग्न करूं नको ह्मणतों तर ती ऐकणार नाहीं, व आलिकडे ती मला भेटतही नाहीं व मलाही माझें लग्न झाल्या पासून तिला भेटावयाचें कठीण वाटतें, कारण ती आपणांस दोष देणार व माझ्याशीं लग्न करा असेंच ह्मणणार, व तिच्याशीं लग्न करण्याचा विचार करणें ह्मणजे बाबास व आईस कैद केल्या वांचून सूटका नाहींच व ते कैद होतात कसे हा विचार मी एक दोन दिवसांत न केला तर रंभा हातची खास जाणार, तर आपण ही मसलत करून ठेविलीच आहे. त्या प्रमाणें उद्यां बाबास, व आईस कैद करून रंभेशीं लग्न करून टाकावें., मग पुढचें विचार पुढें परंतु अद्याप माझा मित्र खलराज आला नाहीं, त्यास बोलवावें व ह्या गोष्टीची तयारी करण्या बद्दल त्यास सांगावें. कोण आहेरे बाहेर ?

दुरा.– जी महाराज मी दुराचार हजर है.

शूर.– जा, आमचे मित्र खलराज यास आताचे आतां घेऊन ये.

दुरा.– ( खलराजास घेऊन येतो ) महाराज हे आल्याती मुजरा करत्याती सरकार.

खल.– शूरसेना बरा आहेसना? अलीकडे मित्राची फार दिवसानें तुला

आठवण जाहली! ठीकच आहे श्रीमंताला गरीबाची आठवण कोठून होणार?

**शूर.**– मित्रा, हें काय ह्मणतोस! अरे असें बोलणें तुला शोभत नाहीं; तुझ्या विचारा वांचून मी काडी सुद्धां इकडची तिकडे करींत नाहीं, असें असतां तूं मला असा दोष देतोस! आतां चार दिवस लग्नाच्या गडबडींत होतों ह्मणून तुला भेटावयास फुरसत आली नाहीं.

**खल.**–खरें आहे बोवा, अरे त्या नवीन विकसीत जहालेल्या कमळावर, आसक्त जहालेला जो तूं भ्रमर त्यावर गुंजारव करणार अशा वेळीं मित्र तुला कोठून आठवणार?

**शूर.**– छे, छे, मित्रा तसें कांहीं नाहीं. हें सर्व तूं ह्मणतोस हें जरी खरें मानिलें तरी तुझा विसर मला कोठून पडणार?

**खल.**–बरें पण त्या गोष्टी आतां सद्या असूंदे, पण आज मला मुख्यत्वें करून त्वां जें तावडतोब बोलाविलेंस त्याचें कारण काय तें तर मला आधीं समजूंदे.

**शूर.**– अरे, आपण परवां जी सर्व सरदार मंडळीसह मसलत करून ठेविली त्या प्रमाणें बेत कधीं करावयाचा, त्याला आतां उशीर करून उपयोग नाहीं.

**खल.**–अरे, आमचे कडून उशीर मुळींच नाहीं, तुझ्या सांगण्याचीच वाट पहात आहोंत. तूं ह्मटलेंस हूं कीं आह्मी बाड्यावर जाऊन पडलोंच समज.

**शूर.**– तर आतां उद्यां हें काम करावयाचेंच, पहा फार सावधगिरीनें कर हो. सर्व विश्वास तुजवर आहे, नाहींतर भलतेंच होईल; आणि आपला केलेला बेत एक बाजूला राहून भलताच परिणाम होईल. याची काळजी मात्र ठेव.

**खल.**–अरे त्याची तर तिळमात्र काळजी करूं नकोच, आतां हा चाललों पहा, आणि आपल्या सर्व सरदारांस तयार असण्यास सांगतों, (असें ह्मणून जातो.)

(पडदा पडतो.)

## अंक ४. प्रवेश ४ था.

(खलराज पडद्याचे बाहेर येऊन म्हणतो.)

**खल.**—ठीक आहे, माझी पण मसलत मी उद्यांच सिद्धीस नेणार. शूरसेना! तुला आणि तुझ्या बापाला उद्यां कैदेंत घालून बहादर सुवर्णपुरीचें राज्य हा खलराज करणार आणि त्याच प्रमाणें रंभेवर आपला डोळा आहेच. आतां प्रालब्धानें अनायासें दुसरी आणखी कमळाही आपल्या सपाट्यांत येणार. अरे, दुर्दैवी शूरसेना! तूं नांवाला मात्र कारण आहेस, परंतु या दोन्ही पुष्पांचा भोक्ता उद्यां पासून हाच बहादर खलराज असें पक्कें समज. अरे, त्या कमळेच्या स्वरूपाचें वर्णन ऐकल्या पासून तर माझें देहभान नाहींसें झालें आहे. प्रियेच्या अधरामृताचें चुंबन घेऊन कधीं मीं धन्य होईन असें जहालें आहे, परंतु कसचा होतो! अरे, मी असा वेडा कशानें जहालों तिज विषयीं निराशा कसली! उद्यां राजास आणि या शूरसेनास कैद केलें कीं, कमळेच्या पलंगावर उद्याची रात्र आपलीच जाणार. तर मग आतां आपणांस सर्व तयारी केली पाहिजे. कारण आपल्यास आज सर्व सरदार अनकूळ आहेत, फक्त सुंदरसिंगाचा मात्र भरंवसा वाटत नाहीं, तर आधीं त्या लुच्चालाच कैद करावें, आणि त्याला कैद केल्या बरोबर तोच छापा वाड्यावर नेऊन राजास व राज पुत्रास कैद करावें, कीं जहालेंच काम, आणि नंतर जे सरदार आपणांस विरुद्ध होतील, त्याना धरावें कीं दे तोफेशीं, असा सपाटा उडविला कीं वर मान करतो कोण. हो, तर असेंच करावें परंतु आज प्रथमारंभीं सर्व सरदारास भेटून सैन्य वगैरे त्यांचे जवळ किती आहे हें पाहिलें पाहिजे, तसेंच आपणांस अनकूळ सरदार किती आहेत व प्रतिकूळ किती होतील हेंही पहावें. तर ही सर्व मसलत आजचे आज आटपलीच पाहिजे, ह्मणजे उद्यां राजाला आणि राजपुत्राला कैद केलेंच. कारण आज कमीत कमी या तीन सरदारांच्या पदरीं सुमारें पन्नास हजार फौज आहे, आणि ह्यांच्या

साह्यानें उद्यां मी फक्त राजाला आणि शूरसेनास कैद करूं शकणार नाहीं काय? अलबत करणार. मग पुढें जेव्हां दुसरी फौज उठेल, तेव्हां पहातोच आहोंत. "द्रव्येन सर्वे वशः" या ह्मणीकडे लक्ष्य दिलें, ह्मणजे द्रव्यानें सर्व जग आपलेंसें होणार, मग सरदार लोक आपलेसे होणें यांत तर काय कठीण आहे? तर हो, असेंच करावें. आतां सर्व सरदारांस गुप्तपणें बोलावून हा बेत तरी मोठ्या गुप्त रीतीनें सिद्धीस नेला पाहिजे. बाहेर फुटतां कामास नये. असें ह्मणून जातो.

( पडदा पडतो )

## अंक ४ प्रवेश ५ वा.

### पात्रें.

१ कुमती.

२ हरिपंतखोटे. ........ ( दिवाण. )

( कुमती, दासी व दिवाणजी बसले आहेत. )

**कुम.**– कां दिवाणजी, व्याही मंडळीकडचा समाचार बरोबर ठेविला आहेना? त्यांना कोणत्याही गोष्टीची कमतरता पडतां अगदीं उपयोगी नाहीं.

**दिवा**–महाराजांच्या पायांच्या कृपेनें कमतरता ती काय आहे, व्याही मंडळी तर इतकी खुश आहेत कीं, रात्र दिवस महाराजांच्या वर्णना वांचून त्यांचे तोंडीं दुसरा विषयच नाहीं. परंतु नवऱ्या मुलाला देशीं जाण्याची फारच उतावळ आहे, त्यांचे मनांतून रंभाबाईना लवकरच येथून घेऊन देशीं जाण्याचा झोंक दिसतो. महाराजां कडून सर्व गोष्टीनें त्याचें कल्याण जहालें. उत्तम मना सारखी वधू आणि दुसरें मनं वांछित धन, मग ते तरी येथें कां राहतील?

**कुम.**– (मनांत त्या विषयीं तर त्याला सांगावें कीं तोंड धुवून ठेव, जरूर असल्यास येथेंच तुकडे मोड आणि पडून रहा. असें ह्मणून,

नंतर सांगते) अहो दिवाणजी, त्यांना सांगा कीं तुम्ही आपली तयारी करा, बयेला एकदम तुमचे बरोबर पाठविणें हे का तोंडचे खेळ आहेत? बयेचा डाग दागिना, दास दासी, नौकर चाकर, या सर्व गोष्टीचा विचार करून नंतर बयेची रवानगी करून देऊं.

दिवा–ठीक आहे, त्यांना तरी असें कबूल करण्यास अवघड कां वाटावें? नाहीं तरी बाईसाहेब थोडेंच त्यांचें वाईट इच्छितात. आज नाहीं, च्यार दिवसानें मागाहून पाठवून देतील.

कुम.– हो, माझें तरी हेंच ह्मणणें आहे. तुह्मी त्यांना साफ सांगा कीं बाईसाहेब ह्मणतात, सध्या बयेस पाठविण्याची आमची सोय नाहीं. मागाहून पोंठवून देऊं.

दिवा–जी महाराज, तसेंच करितों आजचा सिधा बंद केला कीं झालें. त्यांचे जवळ एक दिवसाचें अन्न सुद्धां नाहीं, मग न जाऊन कोणास सांगतात. उद्यां उठून चालते होतील.

कुम.– हो तसेंच करा आणि आजचे आज त्यांना येथून रवाना करा, मग मागाहून बयेस पाठविण्याचा विचार करतां येईल.

दिवा–(मुजरा करून) महाराज माझे कडून तयारी आहे आज त्या सर्वत्रांची रवानगी करून महाराजांस वर्दी पाठवितों.

(पडदा पडतो.)

## अंक ४. प्रवेश ६ वा.

### पात्रें.

१. विजया. २ दासी.
३ चंद्रसेखर. ४ खलराज.
५. देसाई. ६ शिंदे.
७ फांकडे.

### सुवर्णपुरीचा रंगमहाल.

(विजयाराणी व चंद्रशेखर बसला आहे.)

राणी–प्राणनाथ, आज सारीपाट खेळण्यांत किती वेळ गेला हें समजण्यांत

आलेंच नाहीं. रात्र बरीच जहाली आहे, ( असें ह्मणत आहे, तोंच बंदुकीचे ताशेरे व तोफेचे आवाज होतात व वाड्यामध्यें एकच दंगा होतो.)

दासी–(धांवत धांवत येतात व ह्मणतात ) महाराज, बाईसाहेब, घात झाला, उठा उठा वाड्यांत कोणी नागव्या तरवारीचे लोक शिरले आहेत, व धाकटे महाराज पण आपल्याकडे पळत येत आहेत. (असें ऐकून राजा घाबरतो.)

राजा–काय! वाड्यांत लोक शिरलेत! प्रिये, उठ, उठ, तूं आंत जा अरे आज माझीं सर्व शस्त्रें पण मजजवळ नाहींत. ( असें ह्मणतो इतक्यांत शूरसेनास कैद करून शिपाई लोक राजा जवळ दीन दीन करीत येतात. )

खल.–फांकडे पहाता काय, चंद्रशेखरास कैद करा, अरे पण ती याची राणी कोठें गेली. ( इतक्यांत एक शिपाई राणीला धरून आणतो ) बस शाबासरे बहादर तिच्या हातांत बेड्या घाला, बरें पण ती शूरसेनाची नवीन कमळा कोठें आहे तिलाही पकडून आणा. (इतक्यांत एक शिपाई कमळाराणीस कैद करून घेऊन येतो. )

देसा.–अहो खलराज एवढी तर नागीण आपल्याला द्या, ह्मणजे झाल. पाहिजे असल्यास तुह्मी ती विजया घ्या, पण आपल्याला येवढं पाखरूं द्या.

खल.–अहो देसाई, ती तर आतां आपलीच आहे, तुमच्या जवळ असली ह्मणून काय झाले. आपणच तिचे आतां मालक आहात, बरें तर आता या विजयास आणि कमळास तुह्मी संभाळा, इतक्यांत मी या दोघास नेऊन किल्ल्यावर टाकितो.

शिंदे– अहो खलराज, तुमची बुद्धी एवढ्यांत कशापाई फिरली, ते दोन वाघ हेती, बगा त्यानां एका जागीं ठेवूं नका. दोघांला दोन ठिकाणीं ठिवा. ह्मणजे त्यांच कांहीं चालणार नाहीं.

खल.–अहो मी तरी असेंच करणार, पण ह्या रांगड्यास अजून कैद

केला कीं नाहीं.

**फांक**–महाराज, सुंदरसिंगास आणि सर्व त्यांच्या तरफच्या मंडळीस कैद करून सखत बंदोबस्त करून वर्दी देण्या साठीं आलोंया.

**खल.**–शाबासरे बहादर, मग तर आपण धारलेला सर्व बेत सिद्धीस गेला. आतां उद्यां दरबार भरून सर्वत्रांना पोशाग देण्याची कचेरी भरवूं.

**फांक**–अहो, उद्यां पोशाखच काय, पण उद्याच्या उद्यां गादीवर बसा. उद्यां मुहूर्त बी लई नामी है.

**शिंदे**–व्हई माझ्याबी मनांत तसंच है, दोडावानी गादी रंडकी कशापाई ठिवता.

**देसा.**–महाराज तुह्मी गादीवर बसला ह्मणजे आपल्याला येवढी कमळा बक्षीस द्या दुसरें कांहीं नको.

**खल.**–सरदार हो, आतां हें सर्व सुवर्णपुरीचें राज्य तुमचेंच आहे, मात्र तुह्मी ह्या सर्व राजकीय कैदी मंडळीची उत्तम खबरदारी ठेवा ह्मणजे झालें.

**फांक**–महाराज, त्यांची काळजी आपणाला कशाला हवी? तुह्मी आतां खुशाल वाड्यांत रामचंद्रजीच राज करा ह्मणजे झाल. एक रंभा, दुसरी कमळा, तिसरी विजया पण तुमचीच है.

**खल.**–ही सर्व तुमची कृपा आहे. तुह्मी सर्व मला साह्य झाला ह्मणून ही आपली मसलत शेवटास गेली. असो तर आतां तुह्मी ह्या सर्व कैदी लोकांस घेऊन जा, व सांगितल्या ठिकाणीं त्यांना बंदोबस्तांत ठेवा. मीही वाड्यांतील सर्व बंदोबस्त करितों.

(शिपाईलोक कमळास, व विजयास कैद करून घेऊन जात आहेत, विजया व कमळा उभ्या राहातात, आक्रोश करितात तों शिपायां वरील जमादार त्यांना ओढावयास सांगतो. तसेंच कांहीं वेळानें शुरसेन व चंद्रशेखर यांस धक्के मारित नेतात.)

**सरदा**–(तिघे सरदार खलराजास मुजरे करितात) सरकार ईनंती ईतकीच कीं त्या टोपीवाल्या गुजराथ्याची मेजवानी आपणास हावी.

**खल.**–सरदारहो, उद्यां पासून तोच बेत, असें समजा. आतां तुह्मां सर्व

सरदारांस सरकारी काम कोणतेंही करावयाचें राहिलें नाहीं. मेजवानी, नाच, रंग तमाशे या वांचून आपणास आतां काम दुसरें नाहींच.

**फांक**–लई बेस आतां आपल्या मनावानी सरकार बोलल ह्याच नाव मानुस्की अन राज बीज जलमाला येऊन खाल्ल पिल्ल नाहीं अन मनास लागल तस उडवल नाहीं तर राज कसल आणि आह्मी सरदार कसल. (असें ह्मणून मुजरा करितात.)

(पडदा पडतो.)

## अंक ४. प्रवेश ७ वा.

### पात्रें.

१ खलराज.
२ शिंदे............(सरदार.)
३ देसाई............( ,, )
४ फांकडे..........( ,, )
५ दंभिकजी........(कलाल)

(खलराज सिंव्हासनावर बसला आहे चोपदार, भालदार. पुकारतात.)

**खल.**–सरदार लोकहो तुह्मी आपलें कर्तव्य कर्म उत्तम रीतीनें बजाविलें या बद्दल मी तुमचा फार आभारी आहें. (असें ह्मणून जामदार खान्यातून कडी कंठ्या व पोशाख आणावयास सांगतो. पोशाख होतो.)

**सरदा**–सरकार, आतां निशापाण्याचा थाट जाहला पाहिजे.

**खल.**–अरे दंभिकजीला बोलवा आणि त्याला सांगा कीं आतां येऊदे? (असें ह्मणतांच दंभिकजी बाटल्या व सामान आणतो. व खलराज आपल्या हातानें तिघा सरदारांस दारू पाजितो व सरदार खलराजास पाजितात.)

**सरदा**–(तिघे हात जोडून) सरकार ह्या टोपीवाल्याला आपल दिवाण करा ह्मणजे लई मजा येणार दिवाणजीच्या जाग्यावर अकसी हा

आपल्याला लायक दिसतो.

खल.–सरदारहो तुमची इच्छा असल्यास असेंच करूं. (अत्तर, गुलाब पानसुपारी होते चोपदार पुकारतो.)

सरदा–(मुजरे करितात, व दारूच्या निशेंत येकमेकावर पडतात खलराज पडतो तिघे सरदार ओकतात लोळतात खीजमतगार सर्वत्रांस उचलून नेतात.)

(पडदा पडतो.)

## अंक ४. प्रवेश ८ वा.

### पात्रें.

१ कुमती. २ रंभा.

कुम.– माझ्या त्रयेची निराशा जहाल्यावर मग माझ्या प्रयत्नाचा शेवट तो काय जहाला. आतां शूरसेनास सांगावें कीं, तुरूंगांत राहून माझ्या रंभेची आठवण करीत जा. भली खोड मोडली. अरे निर्दया, चांडाळा मेल्या माझे त्रयेस विसरलास काय? तर आतां त्याची झाडा झडती तुरंगांत दे. (अशी ह्मणते आहे तोंच रंभा प्रवेश करिते.)

रंभा– मावशी, आज मनाशींच कायग फारसा विचार करीत बसली आहेस?

कुम.– त्रये आतां तुला काय कमी आहे, त्या मेल्या शूरसेनाच्या छातींत लाथ जाऊन मारीली पाहिजे, असें माझ्या मनांत फार घोळत आहे.

रंभा– मावशी अग तें सारें खरें पण तिकडची स्वारी आज येणार आहे कीं नाहीं?

कुम.– अग त्रये त्याला तूं काय शूरसेना सारखा समजतेस? अग तो तर माझ्या बयेच्या पायांचा गुलाम जाहला आहे.

रंभा– मावशी, पण मला जर तिकडचें बोलावणें झालें तर मग तूं काय करणार?

कुम.– त्रये आतां हें राज्य सुख सोडून कां मी त्या मेल्या भिकाऱ्याचे

येथें नांदावयास पाठविणार? ( इतक्यांत चंद्री दासी धांवत येते )

**चंद्री**– बाईसाब उठा उठा नव महाराज आल्याती आणि तुह्मासनी पुसत्याती.

**कुम**.– ( डोळ्यांचा ईशारा करून ) बये, पाहा बरें कोण आलें आहे. ( असें ह्मणतांच रंभा उभी रहाते. ) बये आज तूं हें मेलें घाणेरडें पातळ ग कां नेसलीस तुला मजजवळ कांहीं कमी कां आहे?

**रंभा**– ठीक आहे बाई ह्यालाग काय झालं.

**कुम**.– अग वेडे पोरी, येक नूर अदमी, सव नूर कपडा, आँवोर लाख नूर नखरा. अग तूं तशी स्वरूपवान आहेस, तुला नटण्याची फारशी गरज नाहीं पण तें काय ह्मणतात नां. कीं, अधिकस्य, अधिकं फलं, त्या मेल्यानीं माझ्या बये जवळ सदां लाळ घोटीत बसावें येवढ्या साठींच ह्मणतें.

**रंभा**– मावशी, खरंच बाई, तुला मी सांगावयास विसरलें, अग काल ते ह्मणत होते कीं त्या मेल्या शूरसेनास किल्यावर कैदेंत टाकिलें आहे तें तुला नेवून दाखवितों.

**कुम**.– (हसून) असें तर झालेंच पाहिजे, आतां ग त्या मेल्याची काय भिती आहे, त्याचें तर मन जळावयास्तव अवश्य खलराज बरोबर जाऊन त्याला पहावें.

**रंभा**– तर मग मावशी, मी उद्यां संद्याकाळीं जाणारच.

**कुम**.– तूं जाशील त्या वेळीं तूं आपला तो थोरल्या मोत्यांचा कंठा घालून तसीच मोठ्या थाटानें जा, ह्मणजे तो मेला अगदीं जळून खीन्न होईल.

( असें ह्मणून रंभा व कुमती निघून जातात. )

( पडदा पडतो. )

## अंक ४. प्रवेश ९ वा.

### पात्रें.

१ खलराज. २ रंभा. ३ शूरसेन.

( सुवर्णपुरीच्या किल्यांत शूरसेन बंदिखान्यांत पडला आहे, शिपाई नागव्या तरवारींनें फिरतात. खलराज रंभेच्या खांद्यावर हात ठेवून, तिला शूरसेन दाखवित आहे. )

**खल.**—हा पाहिलास कां, तो तुझा गळा कापणारा दुर्दैवी शूरसेन?

**रंभा**— प्राणनाथ, या मेल्या दुष्टाचा बाप कोठें आहे; आणि त्याची ती कमळा व तशीच ती रांड थेरडी विजया कोठें आहे?

**खल.**—प्रिये, याच्याच प्रमाणें त्या सर्वांची अवस्था केली आहे आणि या चौघांस च्यार किल्यांवर अशाच बंदोबस्तानें ठेविले आहेत.

**रंभा**— भली खोड मोडली असेंच पाहिजे, मेल्या, कमळा तुला पाहिजे काय?

**खल.**—प्रिये, पाहिलासना तूं हा तुरुंगखाना, आतां चल आपल्या विलास बागेंत जाऊं.

**रंभा**— प्रिया, खरंच चला जाऊं, या मेल्याला येथेंच रडत बसूंद्या. ( असें ह्मणून निघून जातात. )

( बिच्यारा शूरसेन बंदिखान्यात उभा आहे व ईकडे तिकडे पहातो आणि खीन्न होऊन जमीनीवर धाडदिशीं आंग टाकून मुर्च्छीत पडतो व कांहीं वेळानें थोडासा सावध होऊन पश्चाताप करितो. )

**शूर.**— हर हर! हे कूलघातका, दुष्टा, चांडाळा शूरसेना, तूं आपल्या दुराचरणानें सर्व राजकुलाचा संव्हार केलासरे केलास!! अरे, त्या माझ्या मातापितरांची काय अवस्था असेल, तशीच माझी प्रिया राजसुशीला मन मोहिनी कमळा तिची पण काय अवस्था असेल! ह्या सर्वांच्या सुखावर मी दुष्टानें आपल्या हातानें विस्तू ठेविला. ( असें ह्मणून पुनः धरणीवर पडतो. ) हर-हर! हे पृथ्वीमाते तूं तरी आतां या चांडाळास आपल्या पोटांत घे. छे! छे! तूं तरी या अधमास आतां कशाची थारा देतेस. अरे मी ह्या नीच कुलाधम सर्पिणीच्या मागें वेडा होऊन गेलों आणि आज ह्या अघोर

संकटांत पडलों!! अरे निर्दया शूरसेना तूं करालारे संकटांत पडला आहेस, नीच्या, सर्व जगांतलीं घोर संकटें तुजवर येऊन पडलीं तरी तीं तुला कमीच आहेत. अरे! माझी माता काय ह्मणत असेल? अहो बाबा, तुमच्या उदरीं हा चांडाळ पापी कसा हो जन्मला!! हे साध्वी कमळे, तुझी अवस्था काय असेल! अरे, हा माझा जिवाचा मित्र खलराजना? दुष्टा, शूरसेना आज पर्यंत विद्या शिकून शेवटीं प्रत्यक्ष खलाचे नादीं लागलास, तो तुझा परिणाम बरा कोठून होणार? अग, हे चांडाळिणी रंभे, तुझें स्वरूप या पापी डोळ्यांस किती सुंदर दिसलें!! तूं प्रत्यक्ष काल सर्पीण होऊन आमच्या सर्व राजकुलास गिळलेस, आग लागो तुझ्या त्या स्वरूपाला, चांडाळिणी वर वर सौंदर्याचा देखावा दाखवून तुझ्या उदरांत वसणारें कालकूट विष पाजून मला गेलीस काय. अरेरे!! ज्याला खरोखर नर्कांतच पडणें असेल त्यांनीं ह्या सुंदर राक्षसीणी ज्या कुलटा त्यांवर विश्वास ठेवावा. अरे चांडाळा! तूं मेल्यावर नर्कांत पडशील यांत तर संशयच नाहीं, पण जिवंतपणीं यमयातना सहकुटुंब परिवारें भोगतोस, मुर्खा, आतां तुला कळलें काय? अरे तो शिपाई आपली तरवार माझ्या पोटांत खुपसून या चांडाळास नाहींसा करील तर फार बरें होईल. अरे, ही माझें जिवंत असतांच काळींज खाणारीण अघोर डांकीण आणि तिला साह्य देणारी प्रत्यक्ष तिची मावशी कुमती. चांडाळा, तुला हें पूर्वींचरे कसें नाहीं कळलें. हर-हर!! परमेश्वरानें जर मनुष्यास उत्तम ऐश्वर्य दिलें तर त्या वेळीं त्याला संगतीही उत्तमाची असणें हें अवश्य आहे, नाहीं तर मनुष्याला हा तारुण्य मद, व ऐश्वर्य मद प्राप्त होऊन परिणामीं अनर्थास कारण होतो. प्राचीनकाळीं राजे लोक आपल्या प्रिय पुत्रांस विद्याभ्यासा साठीं घोर वनांत त्या ऋषी जनाच्या सेवेंत देत असत; व त्या सत्धर्म पालक नीतीमान् ऋषीनी त्या राजपुत्रांना विद्याभ्यास, राजनीती, व क्षत्रीय कर्म शिकवून त्याना नीतीमान् करावेत; हा तरी त्यांचा किती

शहाणपणा ह्मणावा अरे! आज मला जें अनुभवानें कळून आलें, आणि हेंच जर ज्ञान मला पुर्वीच असतें तर आज हा कां होता. अरेरे! जे पुरुष ह्या स्त्री जातीच्या बाहेरील सुंदर देखाव्यास भुलतात, ते आपल्या हातानें आपल्या गळ्यास फांस लावून घेतात असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं वर कांती स्त्री सौंदर्यास भुलणें ह्मणजे नरकावर प्रिती करणें यांत मुळींच संशय नाहीं. असो शूरसेना! ह्या तुझ्या राज्यांतील तुझें कारागृह हेंच तुला निवासस्थान योग्य आहे. ( असें ह्मणून जमीनीवर पडतो. )

( पडदा पडतो. )

## अंक ४. प्रवेश १० वा.

### पात्रें.

१ खलराज. २ एक शिपाई. ३ कमळा.

( रंगमहालांत खलराज निजला आहे. )

**खल.**—नशीब ह्मणावें तर याचें नांव नशीब. अरे रंभा मला किती सुलभ प्रयासानें प्राप्त जहाली. शूरसेना, तुझ्या रंभेचा तर पूर्ण उपभोग घेतलाच. आतां आज कमळेची पाळी, तिची तर काय विषाद, ती माझ्या स्वरूपास पहातांच पायाशीं लोळण घेईल. आज या मंचकावर कमळेची बहार हा खलराज लुटणार. हांक मारितो. कोण आहेरे बाहेर?

**शिपा**—जी माहाराज मी पायाप हजर है.

**खल.**—अरे आतांच्या आतां बंदिखान्यांतून कमळेला बंदमुक्त करून महालांत घेऊन या.

**शिपा**—जी महाराज. ( असें ह्मणून कमळेला लोटीत लोटीत आणून पोहोंचवितो. कमळा जमिनीवर पडते खलराज जवळ जातो आणि हात धरून उठवितो. )

**खल.**—सखे, आतां तुझा विनोद पुरा कर, अग पहा या खलराजाचें मुख तूं अजून पाहिलें नाहीस? ( असें ह्मणून गळ्यांत हात घाला-

वयास जातो इतक्यांत कमळा हिसडा देते. )

**कम.**– अरे चांडाळा, अधमा, सखे कोणास ह्मणतोस, मेल्या तुझं तोंड येथून काळं कर. नीचा!! अरे स्वरूपाला मोहित होणारी ही कमळा नव्हे. दुष्टा!! दूर हो तुझ्या अमंगल कायेची छाया मजवर पडूं देऊं नकोस. मूर्खा, परलोकाची तयारी कर, नर्क-कुंड तुझी वाट पहात आहे.

**खल.**–प्रिये अशा नाजूक बोलण्यानें कां मी तुला सोडणार आहे. ( असें ह्मणून धरावयास जातो तों, कमळा जमीनीवर पडते व ह्मणते) "हे आदिमाये! जगत जननीं! तूं कां आमचा अंत पहातेस" ( असें ह्मणून हात आपटिते, इतक्यांत पृथ्वी कंपायमान होऊन खलराजाचे छातीवर एकदम धपका बसतो. खलराज रक्त ओकतो व मोठ्यानें ओरडतो. खिजमतगार धावून येतात व खलराजास उचलून नेतात. )

( पडदा पडतो. )

## अंक ४. प्रवेश ११. वा.

## सुवर्णपुर नगर.

**इच्छावती.** ( खलराजाची स्त्री येकटीच मंचकावर खिन्न मुद्रेनें बसली आहे. )

**इच्छा**-परमेश्वरा तुझ्या मायेची कांहीं अगाध लीला आहे. हें तुझें अगम्य ज्ञान आह्मा किंचिज्ञास कोठून व्हावें. या अफाट जालानें भरलेल्या सिंधूचा थांग आह्मास कसा लागावा. हें दुरनीवार मन सर्वत्रांस जिंकून अजित जाहालेलें यास मज सारख्या अबलेनें कसें जिंकावें. ह्या जगांत सुख कोणतें आणि दुःख कोणतें हें तरी कशास ह्मणावें. याचाही पार लागत नाहीं, त्याच प्रमाणें पुण्य तें कोणतें, आणि पाप तें काय, हेही समजत नाहीं. पहा या जगांत सर्वांत मनुष्याचा जन्म श्रेष्ट, त्यांत जगाचा पालन कर्ता नृपती श्रेष्ट. हें खरें कीं नाहीं, आणि त्याची मी आज

भार्या, तेव्हां आतां माझ्या सुखांत कमतरता, ती कोणती. बाहेरील विचारानें मी सुखाच्या समुद्रांत पडलें. असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हर हर!! मला सुखाचा एक लेश तरी प्राप्त जाहला आहे काय? माझे प्राणपति सर्व जगाचें पालन करते जाहले, पण त्याचा मजला काय उपयोग. माझें सुख तर अधिक अधिक कमी होत चाललें, एखादा भिकारी जसा अन्नानें अतृप्त असतो, तशीच मी नाहीं काय? प्राणनाथ आज पर्यंत सरदार स्थितींत होते, तर माझी आणि त्यांची गांठ वर्षागणती होत नव्हती. आतां तर ते भूपती जहाले, मग त्यांना सुंदर युवतीस काय कमी! खरोखर, ज्या गोष्टींत आपणांस सुख नाहीं, त्या गोष्टींत सुख असूनही व्यर्थ आहे. श्रीमान् पतीचे प्रेम त्याच्या प्रिय भार्येवर नसलें तर, त्या श्रीमंतीचा काय उपयोग. व जेथें कनक, तेथेंच कांता. मग श्रीमंतींत असणाऱ्या स्त्रियांना आपलें सुख सदां सवतमच्छरांतूनच वांटून घेऊन त्यांतच सुख मानण्याचें कपाळीं येतेंना? खऱ्या व पूर्ण प्रीतीच्या सुखाचा अनुभव तर नाहींचना? जगांत बहुतेक स्त्रियांची नेहमीं समज अशी असते कीं, श्रीमान पती मिळावा, पण बायाहो, नुसत्या श्रीमंतीचा कांहीं एक उपयोग नाहीं. जेथें श्रीमंती, तेथें बहुत करून खऱ्या सुखाचा अभावच. पती जर गुणवान् असला तर मात्र अपवाद. अरे? पण किती मी वेडी! श्रीमंतींत, गुण शिरतो कशानें? श्रीमंतांना कां गुण कमी असतात? गर्वानें फुगलेले, मदानें माजलेले, अभिमानाचे लोभी, व शहाण्याचे शत्रु असतात; मग सद्गुण त्यांच्यांत येणारच कोठून! असल्या अरसीक ज्ञानशत्रू श्रीमंतास वर्ण्यापेक्षां गुणवान् पति गरीब असला तरी पुरेल! परंतु ह्या श्रीमंतींत पडून, ह्या मूर्ख अधमांची संगत नको. गुणवान् पति दरिद्री असला तरी त्याच्या अप्रतिम निष्कपट व निर्मल अशा खऱ्या सौख्यछायेंत वनांतील कंद मुळांचा आहार, व वल्कलांचें वेष्टन, खचित फार सुखकारक होईल, पण ह्या श्रीमंतींत, ह्या सुवर्ण पलंगावर

सदां हातपाय, आपटीत कुजून मरणें हें फारच दुःखदायक आहे. प्राणनाथ तर प्राणनाथच आहेत. त्यांना प्राणनाथ ह्मणूं किंवा प्राणाचे घातक ह्मणूं. आतां तर मर्कटास राज्य प्राप्त जाहलें आहे. मग मर्कटचेष्टांचें वर्णन, आतां मी किती करावें. आतांशी जेव्हां तेव्हां ह्मणतात कीं, मला काय कमी? मी रंभेचा व कमळेचा भोक्ता जहालों. परंतु नीचा, ही तुझी विवाहीत अंगना, परांग सुखाचा लाभ इच्छित आहे, हें तुजला कसें समजत नाहीं. मूर्खच तूं, अधमच तूं. हो, व त्यांतून खलाचा, मूर्तीमंत पुतळाच तूं, तुला हे विचार कोठून येणार? मेल्या येक तूं व्यभिचारी, असल्यामुळें मलाही व्यभिचार करावासा वाटतोना! नाहींतर मला व्यभिचार करण्याची काय गरज होती. पहा! आज तूं सर्व पृथ्वीपती जरी जाहाला आहेस, तरी त्याचें किंचितही सुख मला वाटत नाहीं. त्या सर्व सुखावर आग कां पडेना. अरेरे आपल्या भार्येवर चित्त न ठेवणाऱ्या पतीस राज्य मिळालें असूनही मला, किंचित् सुख मिळालें नाहीं, उलट तुझा नाश व्हवा असेंच मी इच्छितें. तर जे गरीब असून, परांगना वश असतील, त्यांच्या स्त्रिया कीतपत त्यांचें कल्याण इच्छित असतील! नाहींच नाहीं. व्यभिचारी पुरुषांच्या स्त्रिया नेहमी आपल्या पतीचा सूड घेण्याचीच वाट पाहत असतात, यांत संशयच नाहीं. व ते जसें अनेक सौंदर्य संपन्न अशा स्त्रियांचा समागम इच्छितात, तशा मग आह्मीही अनेक तरुण, एका पेक्षां एक सुंदर, अशा देखण्या पुरुषांचा नित्य समागम करून, विषयानंद भोगितो, कारण मग अब्रुची भीति तर आह्मांस मुळींच नसते, पतीचें मुख जितकें काळें होईल, तितकें अधिक काळें होण्याची आमची इच्छाच असते. पहा! माझा पती जरी आज या सुवर्णपुर नगरीचा राजा जाहाला आहे, तरी त्याचें तोंड पाहण्यास मी इच्छीत नाहीं. कारण जर त्याचें प्रेम मजवर नाहीं, तर माझें तरी प्रेम त्याजवर कोठून असणार? मेल्या तूं रंभेचा उपभोग घे. किंवा कमळेचा घे. मीही आज तुज पेक्षां हजारपट जास्त देखणा,

करणा बांड, सौंदर्याचा पुतळा, बोलवून त्याच्याशीं मनमुक्त रंग करितें. हो, असेंच मी करणार अलबत् करणार. तूं तसा तर मग मीही अशीच. (असें ह्मणून निघून जाते.)

(पडदा पडतो.)

## अंक ४. प्रवेश १२ वा.

चंद्रशेखर....................(राजा.)

## सुवर्णपुरींतील किल्ला.

(चंद्रशेखर राजा बंदिखान्यांत पडला आहे व शिपाई पाहारा करीत आहेत.)

**राजा**—भगवंता! योग्य शासन मला मिळालें, अरे मी कार्म्याचे जर लाड नसते केले तर असा दुर्धर प्रसंग मजवर कधींही आला नसता. शूरसेना, माझ्या उदरीं जन्मून फार उत्तम सार्थक केलेंस. अरेरे!! मी या कार्म्याचे लाड करून त्याच्या मनास वाटेल त्या प्रमाणें वागूं दिलें, त्याचें फळ मला मिळालें, फक्त मला मिळालें येवढेंच नाहीं, परंतु सर्व राज्याची व राजकुटुंबाची राख रांगोळी करण्यास मी कारण जाहलों. प्रिया, विजया मला तर वारंवार ह्मणत असे, परंतु त्या साध्वीच्या बोलाकडे मी लक्ष्य मुळींच दिलें नाहीं. प्रिये, विजये, तूं कोठें असशील आणि ते दुष्ट काय तुझे हाल करीत असतील तें परमेश्वरास ठाऊक. कार्म्या, हें तूं आह्मांशीं काय कपट केलें असशील तें तुझें तुलाच ठाऊक. असो आतां आमची करुणा भगवंतास येईल तेव्हां खरें.

(पडदा पडतो.)

## अंक ५. प्रवेश १ ला.

### पात्रें.

१ मयुरध्वज.........(कांतीपुरचा राजा.)

२ दिवाण.

(कांतीपुरचा मयुरध्वज सिंव्हासनावर बसला आहे. भालदार चोपदार पुकारताहेत, सर्व सरदार लोक बसले आहेत.)

**मयुर**—दिवाणजी, काल रात्रीं माझी लाडकी कन्या कमळा स्वप्नांत आली होती, व ती जशी कांय घोर संकटांत पडली आहे, असें स्वप्न पडलें आमचे व्याही जे चंद्रशेखर ते राणी समवेत कैदेत पडले आहेत, त्या प्रमाणें आमचे जामांत शूरसेन व कमळाही कारागृहांत आहेत, असें मी स्वप्नांत पाहिलें. आमची कुलस्वामीण मीनाक्षी देवीनें, असें सांगितलें कीं, हे मयुरध्वजा कन्येला संकटांतून मुक्त कर असें ती प्रत्यक्ष मजजवळ बोलली.

**दिवा**—महाराज, जर प्रत्यक्ष कुलस्वामीण, जगदंबा, हिनें जर आपणांस दृष्टांतात येऊन सांगितलें तर ही गोष्ट अगदीं खोटी नसेल.

**मयुर**—प्रधानजी, आपले जवळ सैन्य किती आहे?

**दिवा**—महाराज, पंचावन हजार स्वार, च्याळीस हजार पायदळ, दोनशें तोफा, इतकी फौज सरकार जवळ अगदीं तयार आहे.

**मयुर**—प्रधानजी, तर उद्यां स्वारी सहवर्तमान तुह्मी येथून निघा, आणि मीहीं परवां दिवशीं निघतों. ज्या अर्थी कुलदेवता मला प्रत्यक्ष सांगते, तर माझे कन्येवर कांहीं तरी संकट आलें पाहिजे, याकरितां तुह्मी तयारी करा, व आपण पोहोंचण्याचे आधींच वाटेंत, आपल्याला सुवर्णपुरीची सर्व हकीकत मिळेल असें करावें, आणि आपले एकंदर तमाम सरदार, व मांडलीक राजानांही, आपल्या बरोबर घ्यावें.

**दिवा**—महाराज, आज्ञे प्रमाणें सर्व बंदोबस्त ठेवितों.

**मयुर**—तर आतां कचेरी बरखास्त करा आणि उद्याचे उद्या स्वारीनिशीं निघा. मीही तुमच्या मागून निघालोंच समजा. (असें ह्मणून राजा

उठतो.) सर्व मुजरे करितात; भालदार पुकारतात.

(पडदा पडतो.)

## अंक ५. प्रवेश २ रा.

## सुवर्णपुर नगर, कमळा राणीचा महाल.

(दया आणि क्षमा कमळेच्या दासी उभ्या आहेत.)

दया— हर-हर!! अहो महाभाग्यशाली कमळाबाई साहेब, आपली काय ही आवस्था. ज्या प्रमाणें शरीरांतून प्राण निघून गेल्यावर तेंच शरीर निस्तेज व भयंकर दिसतें, त्या प्रमाणें हल्लीं हा रंगमहाल आह्मांस आपल्या वांचून भासतो आहे. ज्या महा पवित्र मंदिरांत साक्षांत लक्ष्मी वास करीत होती ती निघून जाऊन, आतां येथें तो मेला दुरात्मा, दुराचारी आणि खल, याचें वास्तव्य व्हावें अँ!! काय चमत्कार पहा कीं, सिंव्हांचे आश्रमीं ह्या गर्दभाचा दिमाख! पण मेल्या, ज्या ठिकाणीं लक्ष्मीचें वास्तव्य नाहीं, तेथें तुला सुख कोठून होईल. तुझा प्रवेश झाल्या पासून आमच्या बाई-साहेबांच्या ज्या खाशा बागेंत कोकीला सुस्वर गायन करीत होत्या, तेथें हल्लीं दिवाभितें राग काढूं लागलीं आहेत, पिंगळे कुजबुजूं लागले; शुक सारिकांचे आवाज बंद होऊन, कावळ्यांचा आवाज सुरू झाला आहे. ह्या प्रमाणें सर्वत्र स्थिति झाली आहे. अरे! या मेल्या अधमाचें आणि सुवर्णपुरांत राज्य! नारायणा! जी तुझी इच्छा असेल ती खरी. बाईसाहेब आपण कोठें असाल! आणि ह्या मेल्यानें आपले काय हवाल केले असतील! अरे खाटक्याचे हातीं ज्या प्रमाणें धेनू पडावी, किंवा पारध्याचे हातीं हंस यावा, अगर एखाद्या राक्षसाचे घरीं चुकून एखादा ईश्वर भक्त जावा, तद्वतच शेवटीं जाहलेंना!! अरेरे!! शिव शिव! आतां ह्या तडाक्यांतून बाईसाहेब सुटणार तरी कशा? (इतक्यांत क्षमा दासी येते.)

क्षमा— दये! अग तूं येथें काय करितेस! बाईसाहेब कोठें आहेत हें तुला

कांहीं समजलें आहे काय?

दया– क्षमा-बाई, आतां बाईसाहेब ह्या पापी डोळयांस कोठून दिसणार!

क्षमा– अग दये, काल किनई त्या मेल्या खलानें कमळा बाईच्या संगाची इच्छा धरून, त्यांना बंदिखान्यांतून शिपाया कडून विलास मंदिरीं नेलें, आणि तो मेला नर पशू लांब कानाचा गाढव, मस्तीनें धुंद जाहलेला टोणगा, आणि निंद्य कर्मानें भ्रष्ट जाहलेला पिशाच्य, त्या पुण्यवान् गौरीच्या अंगावर स्पर्श करण्या साठीं धांवला पण. त्या वेळीं ईश्वर इच्छेनें त्या मेल्याची अशी फजीती जाहली कीं, ज्या प्रमाणें सूर्यापुढें एखादा अंध जावा, अगर बृहस्पता पुढें एखादा मुका, किंवा रती पुढें सर्वांगानें पिडलेला महारोगी, अथवा गर्भ श्रीमाना पुढें एखादा दरिद्री, जाऊन उभा राहावा, या योग्यतेचा तो मेला खल या महासाध्वी पुढें दिसला.

दया– क्षमाबाई! वाहवा! मग पुढें काय झालें तें सांगा. त्या मेल्यानें आपल्या दयाळू बाईसाहेबांस स्पर्श तर केला नाहींना?

क्षमा– दये, अग मग हा मेला अधम, त्या पतिव्रतेच्या अंगास स्पर्श करतो असें पाहून, बाईसाहेबांनीं क्रोधानें नेत्र वटारतांच या मेल्याची पांचावर धारण बसली व त्यामुळें त्याची जी पञ्ची जाहली ती तर सांगतांच यावयाची नाहीं.

दया– बाई सांगा हो सांगा. या मेल्याची खोड तर चांगली मोडलीना!!

क्षमा– दये, अग काय विचारतेस, कमळाबाईनें जगदंबची स्तुती करतां क्षणींच, हा मेला एखाद्या देवते वरून बळी उतरून टाकावा, त्या प्रमाणें याची स्थिती जाहली, तोंडांतून रक्त वाहूं लागलें, मोठ्यानें आरोळ्या मारूं लागला. अशा दशेंत असतां ज्या प्रमाणें एखाद्या पाप्याला यमाचे दूत बांधून नरककुंडांत ढकलण्यास घेऊन जातात त्या प्रमाणें या मेल्याचे लोक यास घेऊन गेले.

दया– शाबास भली मेल्याची खोड मोडली, आपल्या बाईसाहेबावरचें संकट केव्हां दूर होईल व त्या केव्हां ह्या सुंदर मंदिरांत प्रवेश करितील व ह्या चांडालाचें केव्हां पारिपत्य होऊन हा जगांतून

नाहींसा होईल कोणजाणें.

क्षमा– दये अग गप्प रहा, गप राहा! अग बाई कोणी वरती येत आहेसें वाटते.

दया– चला बाई चला, आपलें भाषण हल्लीं अरण्यांत रोदन केल्या प्रमाणें आहे. अशा भाषणा पासून वेळेस आणखी कांहीं विपरीतच परिणाम एखादे वेळेस व्हावयाचा! (असें ह्मणून निघून जातात)

(पडदा पडतो.)

## अंक ५. प्रवेश २ रा.

### पात्रें.

१ खलराज. २ अघोरीराव. (शिपाई)
३ कमळा. ४ देवी.
५ शूरसेन. ६ चंद्रशेखर.
७ मयुरध्वज.

(खलराज एकटा विचार करीत बसला आहे.)

खल.–काय? कमळा मला वश होत नाहीं? मग मी खलराज तो काय? कमळे तूं पातिव्रत्याचा दिमाख मजपुढें लावतेस काय? आज चंद्रसेखर, विजया, आणि शूरसेन या सर्वांचीं प्रेतें पाडून तिला दाखवितों, ह्मणजे तिची निराशा होईल, आणि येवढेंहो करून जर ती न ऐकेल तर आज तिच्यावर बलात्कार करून हा खलराज आपली काम वासना परिपूर्ण करणार. (असें ह्मणून हाक मारतो.) कोण आहेरे पाहऱ्यावर?

शिपा–महाराज मी आघोरीराव आपल्या पायाचा गुलाम है.

खल.–अरे, चंद्रशेखर, विजया, शूरसेन या सर्वांस मज समोर घेऊन या.

शिपा–(धांवत येतात आणि सांगतात) सरकार ते तिघही आपआपल्या जागीं मरून पडल्याती त्याना मरून खीन बी झाल नाहीं.

खल.–ठीक झालें, त्या तिघांचीं प्रेतें इकडेस घेऊन या (असें ह्मणतांच शिपाई त्यांचीं प्रेतें घेऊन येतात) अरे अघोरीराव, त्या कमळेला मजकडे घेऊन ये. (असें ह्मणतांच एक शिपाई कमळेला धक्के

मारीत घेऊन येतो.)

**शिपा**–महाराज कमळा बाईना पायाप हजर केल्या हैती.

**खल.**–कमळे आतां तरी या तिघांचीं प्रेतें पाहून तूं आपला हट्ट सोडून दे आणि एकवार वश जहालें ह्मणून सांग नाहीं तर तुझीही अशीच अवस्था होणार हें पक्कें समज आणि हें माझें ह्मणणें जर तूं कबूल न करशील तर तुलाही यमपुरीस पाठविलेंच समज.

**कम.**–(प्रेतांकडे पाहून घाबरते आणि धाडदिशीं जमिनीवर पडते, व मोठ्यानें आक्रोश करून ह्मणते) नारायणा आतां मात्र माझ्या सर्व सुखाचा कळसच जहाला. मेल्या, चांडाळा, अधमा, अरे तूं हा आमच्यावर काय कहर मांडला आहेस! मेल्या ह्या कर्मापासून कोणाचें कल्याण जहालें आहे, ह्मणून आतां तुझेंच होईल. नीचा तूं काय करशील. तुझ्या दुष्ट कर्णीचें विष तुझ्या सर्वांगांत भिनून जाऊन तूं अधमाधम बनला आहेस, तुझ्या मृत्युनें तुला ग्रासिलें आहे. चांडाळा, मला स्पर्श करण्याची इच्छा करतोस काय? पण मेल्या, तुझा काळ आपलें मुख पसरून तुला गिळण्यास उभा असेल. त्याला तूं विसरून अमृताची इच्छा धरून कालकुट विष पिण्यास तयार जाहला आहेस; असो, आतां तुला शिक्षा माझी जगदंबा करील. (असें ह्मणून जमिनिवर पडते.)

**खल.**–सखे, आतां तुझा तो उपदेश पुरे कर, जों जों अधिक अधिक बोलतेस तों, तों, तुझ्या मधुर वाणीनें माझा कामाग्नि अधिक खवळतो. (असें ह्मणून धरावयास जातो इतक्यांत तोफांचा गडगडाट होतो व वाड्या सभोंवतीं वेढा पडतो. खलराज्याचे छातींत धपका बसतो, व खलराज रक्त ओकून मुर्छीत पडतो.)

**कम.**–हे जगदंबे, आदिमाये, तूं आपल्या ह्या दिन कन्येस उदरांत घे. (असें ह्मणून एक शस्त्र उपसून आपल्या गळ्यावर मारिते; इतक्यांत अग्नीतून एक देदीप्यमान देवी प्रवेश करिते, व कमळेचा हात धरते, व ह्मणते, हे कन्ये, तूं हें काय करतेस, घाबरूं नकोस मी तुला साह्य आहें असें ह्मणून कमळेस पोटाशीं लावते.)

**कम.**– हे माते, आतां मला हें काळें तोंड घेऊन वांचून काय करावयाचें आहे. ज्या प्रमाणें माझ्या सासू सासऱ्याचा, तसाच माझ्या प्राणपतीचा नाश झाला तसाच माझा तूं शेवट कर ह्मणजे माझें सार्थक्य झालें.

**देवी.**–कन्ये तूं कांहीं काळजी करूं नकोस मी तुला साह्य आहें, आतां तुझे सर्व नष्ट दिवस संपलेच समज. (असें ह्मणून चंद्रशेखरावर व विजयाराणीचे आणि शूरसेनाचे प्रेतावर अमृत शिंचन करते. चंद्रशेखर, विजया, आणि शूरसेन उठतात, व देवीस साष्टांग नमस्कार घालतात. इतक्यांत कांतीपुरचा राजा मयुरध्वज येतो.)

**शूर.**– (लज्जितपणें मातापितरांच्या चरणांवर पडतो.)

**चंद्र.**– पुत्रा, आतां झाल्या गोष्टीचा पश्चाताप कशास करितोस! आज आमची ही सूर्यवंशाची कुलोद्धारिणी जी कमळा, हिनें आह्मां सर्वत्रांस उद्धारिलें. (असें ह्मणून सासूसासरे तिला पोटाशीं धरितात.)

**मयुर**– अरे, पण हा कोण, दुर तिकडे रक्ताची वांती होऊन पडला आहे. (चंद्रशेखर जवळ जाऊन पाहातो.)

**चंद्र.**– हाच सज्जन मनुष्य, आमच्या शूरसेनाचा मित्र, खलराज, आह्मां सर्वत्रांस पदच्युत् करून कारागृहवासांत टाकून आमचे हाल करणारा तो हाच.

**मयुर**– (डोळे लाल करून) अरे, कोण आहे, या अधमाच्या हातां पायांत बेड्या घालून याला घेऊन चला. (शिपाई तसें करितात)

**चंद्र.**– आणि आमचे ते विश्वासू सरदार कोठें दिसत नाहींत?

**मयुर**– कोण ते.

**चंद्र.**– जे आमचे अन्न खावून, आमचा गळा कापण्यास तयार झाले ते.

**मयुर**– महाराज, ह्या वेळीं मला आज्ञा करा. त्या सर्व दुष्ट जनांला एकदम कैद करून तोफेच्या तोंडीं देतों किंवा, आपण जें सांगाल त्या प्रमाणें त्या दुष्टांचे हाल हाल करून ठार मारितों.

**चंद्र.**– ठिक आहे; संकट समयीं आपण धांवत आलांत एवढे आपले

महत् उपकार मजवर जाहले. आतां, ह्या कीटकांची काय विशाद! उद्यां सर्वत्रांना पकडून मागवितों. पाताळांत जर जातील तर तेथूनही हा चंद्रशेखर त्यांना ओढून काढील. फक्त श्री जगदंबेची कृपा मात्र आह्मांवर अशीच असली ह्मणजे झालें.

**कम.**— चंद्रशेखराच्या पायीं नमस्कार करिते.

**चंद्र.**— (कमळेला पोटाशीं धरून) बाई! पूर्वीच्या अनेक जन्मांची आमची पुण्याई, कीं तूं साक्षात् लक्ष्मी सुनेचा वेश घेऊन आमच्या येथें आलीस व आमच्या सर्वत्रांचा उद्धार केलास. आह्मांस सर्व संकटांतून मुक्त केलेंस. तुझ्या चरणाचें तीर्थ घेऊन आह्मी मुक्त होऊं. (असें ह्मणून पायां पडावयास जातो, तों कमळा हात एकीकडे करून ह्मणते.)

**कम.**— महाराज! छे: छे: अशी माझी योग्यता मुळींच नाहीं आणि एवढा मान आपणां कडून मिळण्याची बुद्धी परमेश्वर मला कधींही न देवो महाराज! ह्या माझ्या बापानें आपल्या व सासूबाईच्या पदरीं पायांची सेवा करण्यासच सोंपली आहे, ती जर माझ्या कडून कदाचित घडली असेल तर त्यांत मी जास्त तें काय केलें.

**चंद्र.**— बाई! तुझी, आह्मांवर व तशीच तुझ्या पतीवर निष्ठा पाहून प्रत्यक्ष जगदंबेनें आमचीं सर्वांचीं प्रेतें उठविलीं. या पेक्षां जास्त आणखी आह्मी काय इच्छावें? (असें ह्मणून विजया व चंद्रशेखर तिला पोटाशीं लावितात.)

(पडदा पडतो.)

## अंक ५. प्रवेश ४ था.

### पात्रें.

१ चंद्रशेखर. २ दिवाण. ३ सुंदरसिंग.
४ कल्याणसिंग. ५ जव्हेरसिंग. ६ मयुरध्वज.

(मयुरध्वज आणि चंद्रशेखर सिंहासनावर बसले आहेत. खालच्या पायरीवर शूरसेन बसला आहे, चोपदार व भालदार पुकारतात, खिजमतगार चवऱ्या ढाळतात.)

चंद्र.– दिवाणजी, काल कोणत्या प्रकारें तजवीज केली ती सविस्तर सांगा.

दिवा– सरकार एकंदर आपलें सैन्य जमा करून व महाराजांचें सैन्य एकत्र करून त्या तिघां दुष्ट सरदारांवर आणि दुसरे जे कोणी आपणांस विरोधी असतील त्यांच्यावर छापा घालून त्यांना सर्वांना धरिलें. बंडखोर लोकांना तोफेच्या तोंडीं दिलें, व त्यांचे जे प्रमुख सरदार, फाकडे, शिंदे, आणि देसाई, यांना कैद करून चरणां जवळ घेऊन आलों आहें. त्याच प्रमाणें खलराज हजर केला आहे. व सरकारची आज्ञा होतांच सुंदरसिंगास व त्याचे, दुसरे लोक जे, या नीचांनीं कैदेत घातले होते, त्या सर्वांस बंदमुक्त केलें व तेही सर्व चरणां जवळ हजर आहेत. (सुंदरसिंग, कल्याणसिंग व जव्हेरसिंग मुजरे करितात व आपआपल्या जागेवर बसतात.)

मयुर– (डोळे लाल करून) ते दुष्ट सरदार कोठें आहेत?

चंद्र.– दिवाणजी त्यांना घेऊन या. (दिवाण त्यांना घेऊन येतो व ते मुजरे करितात.)

मयुर– या दुष्टांचा एक एक अवयव तोड तोडून टाका. आणि ह्यांचे हाल हाल करून ठार मारा.

दिवा– जी महाराज, आज्ञे प्रमाणें तसेंच करितों.

चंद्र.– तसें करण्याची कांहीं जरूरी दिसत नाहीं.

मयुर– चंद्रशेखर, तुह्मी या कामीं मुळींच पडूं नका. या सर्वत्रांना आणि या दुष्ट खलराजास मी आपल्या डोळ्यां समोर हाल हाल करून मारणार.

चंद्र.– दुष्टांनों! केल्या कर्माचें फळ भोगा. तुमच्या प्रारब्धाला मी काय करूं; आज पोटच्या लेंकरा प्रमाणें मी तुह्मांस मोठमोठाल्या जाहागिरी देऊन तुमचा सांभाळ करीत होतों; परंतु तुमचें दुर-वर्तन तुह्मांस कोठून खावूं देणार!!

दिवा– सत्य आहे महाराज, या दुष्टांचे असेच हाल करून मारणें उचि-त आहे.

**चंद्र.**— त्याच प्रमाणें विठोजीराव महाळुंग्याची दुष्ट मुलगी, रंभा कोठें आहे. आणि ती पापी ह्मातारी तिची मावशी कोठें आहे?

**दिवा**—महाराज! त्या चांडाळणीही चरणां जवळ हजर आहेत. (असें ह्मणून रुजू करितो.)

**चंद्र.**— या दुष्ट पापीणीचें घर जप्त करावें आणि दागदागिना, कपडालत्ता आपल्या जामदार खान्यांत ठेवावा; आणि या पापिणीस तुरुंगांत टाकून ह्यांच्या कडून कैदी लोकांचें धान्य दळून घ्यावें; त्याच प्रमाणें कैद्यांचा स्वैंपाक वगैरे सर्व नीच कामें यांना सोंपावित, आणि हीं सर्व कामें हिनें व हिच्या मुलीनें करावींत.

**दिवा**—आज्ञा महाराज, आज्ञे प्रमाणें सर्व व्यवस्था ठेवितों.

**चंद्र.**— दिवाणजी, या दुष्ट सरदारांची जी जहागीर कमी करण्यांत आली आहे, ती सर्व जहागीर या माझ्या विश्वासू सुंदरसिंगास आणि त्याच्या लोकांस द्यावी. (सुंदरसिंग मुजरा करितो.) सुंदरसिंग तुह्मी उद्या ह्या दुष्ट खलास, तसेंच शिंदे, फांकडे, देसाई यांस सुळीवर द्या.

**सुंद.**— बहोत अच्छा खाविंद ईन, अकलके शैतानोको कल स्मशान भुमीका राज्जा भिशक करताहूं. (असें ह्मणून सर्व मुजरे करतात)

(पडदा पडतो.)

## सुवर्णपुरींतील स्मशानभूमी.

(खलराज, शिंदे, फांकडे, देसाई स्मशानभूमीवर उभे आहेत, आंगावर लाल वस्त्रें व रक्तवर्ण पुष्पांच्या गळ्यांत माळा घातल्या आहेत, माथ्यावर शेंदूर भरला आहे. सुंदरसिंग, कल्याणसिंग आणि शिपाई लोक उभे आहेत.)

**खल.**—(छातीवर हात मारून) हा दुष्टा, क्षणिक वैभवाचे लालचिनें आपलें मुख काळें करून घेतलेंस! यःकश्चित विषया साठीं मित्रद्रोही, राजद्रोही होऊन आपल्या मुखास काळोखी लावून घेतलीस, एवढेंच नाहीं पण तुझ्या पुर्वजांस सुद्धां आज त्वां एका क्षणांत अपकीर्तीच्या नरकांत बुडविलेंस. मी आपली स्थिती विसरून या धनाच्या आणि परस्त्री सेवनाच्या आशेनें या भयंकर प्रसंगांत

येऊन पडलों. या कामांत मी गुंग होऊन गेलों असतां परमेश्वरास तर मुळींच विसरलों. कामाचा पुतळा, क्रोधाचा सागर, लोभाचा स्वामी, असा बनलों! त्या महापतिव्रते साध्वीवर बलात्कार करण्यास किंचित्‌ही शंका मला वाटली नाहीं!! माझ्या पापी मनास ह्या जगांतील सर्व स्त्रिया जारिणीच असतील असें वाटत होतें. अरे, कोठें ती रंभा आणि कोठें ती महालक्ष्मी कमळा!! तिच्या चरण तीर्थानें सुद्धां माझीं पापें जळून जातील. पण आतां तिच्या पायांचें तीर्थ या पाप्यास कोण देतो. (असें ह्मणून खालीं पडतो.)

**फांक**–( कपाळावर हात मारून ) अरे देवा, कुठूनशानी मी या कामांत पडलों! माझ बाळासाबाला आतां कोण बगील. ( असें ह्मणून रडतो. )

**शिंदे**– अर माझ्या जिवाच्या अस्तुरीला तरी एकदां बगुन द्या, मगशानी सूळ तर माझ्या नशिबाला हैच.

**देसा.**–चंद्रशेखर राजा लई चांगला! जस कराव तस भोगावं! आतां आपल्याला कोण सोडतया, अरे रामा! मदादेवा! संकरा! आह्मी अस केल नसत तर कशान हा येळ आमच्यावर येता.

**शिपा**-धक्के मारितात आणि ह्मणतात. अब्बे आब काहेंका शंकर, और राम लाया अब रोकर ढोंग काहेको बताते हो. “ जैसा करना वैसा पाना. ”

**सुंदर.**-भाई, इन बिचारोंको अब अक्कल आई है, खैर उनको जो कुछ परमेश्वरकी बंदगी करलेना होगी तो करलेनेदो. ( शिपाईलोक तिघांस सुळावर चढवितात. )

( पडदा पडतो. )

## अंक ५. प्रवेश ५ वा.

### पात्रें.

१ **आशाजीराव**........( रंभेचा नवरा. )

( आशाजीराव रंभेचा नवरा तक्याशीं बसला आहे. कारकून मंडळी जवळ

बसली आहेत.)

आशा-(पत्र हातीं घेऊन) मला श्रीमंत व स्वरूपवान बायको मिळाली असें पाहून किती आनंद वाटला होता!! पण, तो आनंद, आज या पत्रा वरून समूळ वाहून गेला. या दुष्ट मावशीनें माझी बायको एकदां सुद्धां मज जवळ पाठविली नाहीं; आणि जरी तीनें पाठविली असती तरी काय होतें? मी एकदां चोरून तिच्या जवळ गेलों व तिच्या नुसत्या आंगास हात लाविला होता. तेवढ्यानें ती रागानून एखाद्या डांकिणी सारखी माझ्या आंगावर आली आणि ह्मणाली, या मूर्तींवर शेणाचे दिवे ओंवाळावेत. हे जारिणी! तुला राजानें योग्य शिक्षा दिली. तुला शूरसेन नवरा हवा काय? आणि तिची ती मावशी तर शुद्ध अधर्माची आणि दुराचर्णाची, मूर्तिमंत मूर्तीच होती. ती सहज बोलूं लागली ह्मणजे तिच्या आंगावरील बोटीन् बोटी हले. अग ह्मातारडे, आतां तुझ्या रंभेचें सुख सुवर्णपुरांतील तुरुंग खान्यांत पहा. हर हर! गरीबानें श्रीमंताची मुलगी बायको मिळावी अशी स्वप्नांत देखील आशा धरूं नये. पहा! हीच मला मिळाल्या पासून सुखाचा वारा तर लागलाच नाहीं, पण उलटा त्रास, चिंता, आशा, इत्यादि गोष्टींनीं मी अगदीं त्रासून गेलों. शेवटीं सर्व जगांत माझी अपकीर्ति होऊन, आतां या जगांत क्षणभर सुद्धां राहाणें नको असें मला वाटतें. (असें ह्मणून कट्यार पोटांत खुपसण्याचा प्रयत्न करितो तोंच मंडळी त्याला धरितात व त्याचें समाधान करितात.)

(पडदा पडतो.)

## अंक ५. प्रवेश ६ वा.

### पात्रें.

१ रंभा.

२ काळ्या............(तुरुंगांतील शिपाई.)

३ हराम्या.............. ,, ,,

४ रामसिंग........( शिपायां वरील जमादार.)

५ कुमती................ ( रंभेची मावशी. )

( सुवर्णपुरांतील तुरुंगखाना. शिपाई नागवी तरवार घेऊन फिरत आहे. रंभा तुरुंगखान्यांतून बाहेर येते, आणि पांढरें खादीचें वस्त्र नेसली आहे, दोन आण्याची चोळी घातली आहे अशा स्थितींत कपाळास हात लावून बसली आहे. )

रंभा— हे, हतभाग्य रंभे! आतां तुझ्या सुखाचा कळसच जाहला! अरेरे काय माझी ही अवस्था! कैदी लोकांचें दळण दळणे आणि त्यांच्या भाकरी करणें. रंभे! विषय सुखाचे मार्गे लागली होतीस त्याची गोडी ईश्वरानें तुला पूर्ण दिली. आज तुरुंग खान्यांत कमीत कमी पांचशें कैदी आहेत, त्यांच्या तडाक्यांत मला दिली आहे. व आतां माझी येथें दाद कोण घेतो? राजाचे मनांत तर आमचे हाल हाल करून मुदाम आह्मांस मारावयाचें आहे. हा जीव तरी किती कठीण जाहला आहे! कैदी लोकांचें दळण दळून, व स्वयंपाक करून माझ्या हातांना फोड आले आहेत. रात्र जाहली ह्मणजे मेलेल्या प्रेता प्रमाणें उघड्यावर पडावें! नाहीं दिवा! नाहीं अंथरूण! हे परमेश्वरा! अशा वेळीं मला दुखणें जरी येतें तरी बरें होतें! पण तें कोठून येणार? मी अतिशय नाजुक होतेंना! आतां तो माझा नाजूकपणा कोठें गेला? हर हर! आज पर्यंत मी ऐकत होतें कीं, मेल्या नंतर केलेल्या कर्माचें फळ परलोकीं भोगावें लागतें. परंतु तो विचार आतां अगदींच खोटा ठरला. ह्या हातावरचे झाडें ह्या हातावर भोगावें लागतात, याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला आहे. अरे! जीवंतपणीं मी या यम यातनेंत पडलें! येथें या दुःसहः यातना भोगीत आहें, व असा भयंकर प्रसंग गुदरण्याला कारण माझी ती दुष्ट मावशी जाहली. तीला काय ह्मणूं? रांड, ती मावशी कीं सात जन्मांची माझी वैरीण? रांडे! सर्वस्वी माझा घात केलास. पूर्वजन्माचा वैर साधण्यास माझी तूं मावशी जाहलीस.

काळतोंडे! अग तुझे दहा लक्षाचे दागिने आतां कोठें आहेत? आग लागो त्यांना. माझे अत्यंत लाड करून शेवटीं तूं आपल्या बरोबर मला घेऊन ह्या तुरुंग खान्यात दळण दळावयास लाविलेंस! अग राक्षसणी माझें लग्न केलेंस त्या वेळीं मला माझ्या नवऱ्याच्या येथें पाठविलें नाहींस. अनेक व्यसनी दुष्ट लोकांची संगत करवून माझें मन निर्दयी, चांडाल, विषयी, पापी, असें करून सोडलेंस. राजपुत्राचे हाल पहाण्यास त्या मेल्या खलराजा बरोबर मोठ्या हौसेनें मला पाठविण्यास प्रवृत्त झालीसना! खरोखर ह्या तुझ्या दुष्ट कृत्यास शिक्षा राजानें फार थोडी दिली. परंतु येथील ही शिक्षा भोगून आणखी किती जन्में कोणत्या प्रकारचीं दुःखें तुला आणि मला भोगावीं लागतील कोणासकळे! आतां या वेळीं आमचे विषयीं दया करणारा प्राणी सर्व ब्रह्मांडांत एक सुद्धां सांपडणार नाहीं. आह्मी वाटेनें चाललों असतां शहरांतील लोक आमच्यावर धूळ उधळतात; शेणमार करितात, लहान लहान मुलें सुद्धां नाना प्रकारची निर्भत्सना करितात. असो; देवा! तूं सर्व साक्षी आहेस. तुला विसरून जे प्राणी क्षणिक विषय सुखाचे मागें लागून निंद्यकर्म करतील, त्यांचा अशी अवस्था होते या विषयीं माझी तर पक्की खातरी जाहली. (इतक्यांत चार पांच कैदी येतात.)

**काळ्या**-अग, ये सटवे इथ कशाचा विचार करीत बसलीस, भाकरी बिकरी, केल्यास कां नाहींस अजून पर्यंत, रांडला मसती आली है जनु.

**हारा**-अरे तूं तरी लई शहाणा दिसतोस भाकरी ती ह्मातारि करील पग माझ्या मनांत दुसरच है तुरुंगांतून सुटल्यावर आपल्याला असल पाखरू कुठूनशानी मिळणार (असें ह्मणून तिला आंत घेऊन जातो.)

**काळ्या**-अर, तिला इसावा तर राव जरा घेऊन द्या. आपली सगळ्यांची बायको तर ती हैच, पण घडी घडी अस करूं लागलो तर तीं

मरून जाईल, मग आपल्याला अजल पावरू कोठूनशिनी मिळ-णार. तुरुंगांत असल काम कोण करून देतो. पन जमादार साहेबाचा हुकूम है ह्मणून कांहीं फीकीर नाहीं.

शिपा–कुमतीस पकडून आणितो आणि ह्मणतो काग ये रांड कैद्यांच्या भाकरी अजून कशापाई आटपल्या नाहींस. (इतक्यांत जमादार धांवत धांवत येतो.)

जमा.-शिपाई, इस रंडियेनें आपना काम अभीतक नहीं किया, ओहो बडी ताजूबकी बात है. ह्मणून बुटानें लाथ मारतो.

कैदी–(रंभेचे केस धरून तिला ओढून आणतो.) व सांगतो कीं जमादार साहेब ही आमच्या भाकरी करीत नाहीं, आणि काम चुकविण्यासाठीं भलतें सलतें काम करिते.

जमा.-वोहो, ये रंडी यांहा आकर हमारे कैदी लोकोंकु खराब करती है. (ह्मणून बुटानें लाथ मारतो.) सर्व निघून जातात. कुमती मागें रहाते.

कुम.–(कपाळास हात लावून) परमेश्वरा तुला विसरल्याचें हें फळ मला प्राप्त जाहलें, श्रीमंतींत उन्मत्त होऊन रात्रं दिवस दुराचरणांत जो मी काळ घालविला त्याचें फळ मला यथायोग्य मिळालें. अहा! जिवंतपणींच काळ मला तोडताहेत, नाना प्रकारचे हाल करीत आहेत माझें वय साठ वर्षांचें झालें अशा समयीं कैदी लोकांच्या भाकरी करण्याचा प्रसंग स्वप्नांत तरी मला यावा काय? परंतु माझें कर्म किती घड होतें हें माझें मलाच ठाऊक आहे. मी स्वत: बुडलें येवढेंच नाहीं त्या बिचाऱ्या गरीब पोरीस घेऊन बुडलें. तिच्या जन्माचा सत्यानाश करून तिच्या व माझ्या सत्तावीस पिढ्या नरकांत माझ्याच दृष्टी समोर मी घातल्या. मेल्यावरती तरी माझे असे हाल झाले असतें तरी बरें होतें. छे: छे: परमेश्वर कां असा अन्याई आहे! मेल्यावर माझी अशी स्थिती कोण पहातें. कुमती आतां तुझे डोळे उघडले काय? आतां स्वस्थ तुरुंगांतील भाकरी करणे हा गंजिफा, दळण हा सारीपाट

व बुटानें मार खाणें ही दासी कडून सेवा मानून घे. ( असें ह्मणून धाडदिशीं जमिनीवर पडते. )

( पडदा पडतो. )

## अंक ५ प्रवेश ७ वा.

### पात्रें.

| | | |
|---|---|---|
| १ गोपाळराव......... | } | सुवर्णपुरांतील मंडळी. |
| २ माधवराव.......... | | |
| ३ रंगराव............. | | |

**गोपा**–( सर्वत्रांस नमस्कार करून ) कां मंडळीची कोणीकडे तयारी.

**माध.**–अहो तयारी ह्मणजे काय सध्या आपल्या सुवर्णपुराची बरोबरी स्वर्गलोक सुद्धां करूं शकणार नाहीं, जिकडे पहावें तिकडे गंमत, मौज या शिवाय दुसरी गोष्टच नाहीं.

**रंग.**– कांहो माधवरावजी सरकारचे सासरे जाणार ह्मणून जी आज आतषबाजी होणार आहे ती कोणीकडे? आपण आज सर्व लष्कराचा थाट व स्वारीची मिसल पाहून तर गारेगार जहालों, आज असें दिसत होतें कीं जणुं काय साक्षात् इंद्र आपल्या तेहतीस कोटी देवां सहवर्तमान अमरावतींतच फिरावयास निघाला आहे काय? असें वाटलें. अहा! काय ते सुवर्णाचे रथ झळकत होते, लक्षावधी घोडे थै, थै, नाचत असत शेंकडों गजेंद्र जागजागीं झुलत होते, वाद्यांचा गजर सगळ्या शहरांत दुमदुमून गेला होता. अशी अद्वीतीय शोभा या पुर्वीं आपण कधींच पाहिली नव्हती.

**माध**– आजची आतषबाजी तर पहा ह्मणजे तुह्मी अक्कल गुंगच होऊन जाईल.

**रंग.**– खरोखरी महाराजांनीं या वेळीं कांतीपूरच्या राजाला मेजवानी तर सोळाआणे दिली.

**माध**– सरकारचे सासरे आतां लवकरच जाणार आहेत असें मी ऐकिलें.

**रंग.**– अरे वेड्या, ऐकलें ह्मणजे परवांचे दिवशीं सकाळीं सात वाजतां

*ते जाणार असून तर इतक्या घाईनें काय घईकडे चालले आहे.*

माध– परमेश्वरानें शेवटीं आनंद आनंद करून दिला, नाहीं तर या राज्यावर केवढें संकट आलें होतें!

रंग.– अरे, परमेश्वर कां कोठें दूर आहे?

माध.–मी ऐकिलें आहे कीं त्या दुष्ट खलराजानें चंद्रशेखर, शूरसेन, विजयाराणी या सर्वांस ठार मारिलें होतें?

रंग.– छे, छे, तो दुष्ट आपणांस आतां मारणार असें पाहून त्यानींच आपल्या हातांतील हिरकणी खावून प्राण दिले.

माध.–कायरे नुसत्या हिरकणीनें प्राण जातो?

रंग.– अरे वेड्या मग हे थोर लोक लाखो रुपयांच्या हिऱ्याच्या आंगठ्या उगीच जवळ ठेवतात काय? एखादे वेळीं असल्या प्रसंगीही हिरा कामास येतो.

माध.–मोठेंच विघ्न राज वराण्या वरील गेलें.

रंग.– ह्मणजे? त्यांचा सर्वांचा पुनर्जन्म झाला.

माध.–शाबास! राणी असावी तर अशीच असावी, तिचे पाय धुवून नित्य आपण तीर्थ घेतलें तर, आह्मी निःसंशय जन्ममुक्त होऊं.

रंग.– परमेश्वरानें जर जन्म दिला तर सुखानें देवो, पण जन्माला येऊन असें सार्थक झालें तर आईबापांच्या उदरीं जन्म घेतल्याचें फळ नाहींतर आमच्या बायका.

माध.–परवा तूं ऐकिलेंसना ते आपले प्रख्यात गृहस्थ त्यांच्या मुलीनें पोबारा दिला. ती ह्मणतात एका पुराणीकाचा हात धरून गेली. खरोखर असल्या दुष्ट स्त्रिया जगांत नसाव्यात यांना समुद्रांत नेऊन बुडविलें तरी चालेल.

रंग.– आधीं आपण सर्वत्रांनीं बुडलें पाहिजे, मग त्यांची गोष्ट.

माध.–आपणास बुडण्याचें कारण?

रंग.– अरे गृहस्था, त्याना दोष देऊन काय उपयोग. किती झाल्या तरी त्या अबला, अविवेकाच्या केवळ खाणीं पण आपण धड कोठें आहोंत. अरे, दोन दोन च्यार च्यार शास्त्रें पारंगत होऊनही जर

आमच्या बुद्धीवर उजेड पडत नाहीं तर आह्मी ह्या अबलांना काय दोष द्यावा. तुला आपल्या पेठेंतील ते थोरले मोठ्या पोटाचे शास्त्री ठाउक आहेतना? तो गृहस्थ एका विधवेच्या एथें आपल्या शास्त्राचें पारायण करीत असतो.

**माध.**—अरे, बोलण्याला आतां जागाच राहिली नाहीं, त्याच्या विषयीं मी तर कांहीं विचित्र ऐकिलें आहे.

**रंग.**— विचित्र तें काय ( माधवराव कानात सांगतो. ) त्याच्या सुने शीं-तो-जा-तो.

**माध.**—तर मग या शास्त्रज्ञ नर पशुंची अशी अवस्था मग आपण नुसत्या विचाऱ्या अज्ञानीं अशा अबलांस दोष देण्यांत काय अर्थ आहे?

**रंग.**— शाबास! आतां मात्र तुला यांतील इंगित कळलें. अरे पण या बोलण्यांत आपला किती वेळ गेला. चल चल मग आपणांस गंमत पहावयास जागा मिळणार नाहीं, आपण आधीं जाऊन आपली जागा संभाळून बसलें पाहिजे. (असें ह्मणून निघून जातात)

. ( पडदा पडतो. )

## अंक ५. प्रवेश ८ वा.

### पात्रें.

**१ मयुरध्वज. २ शूरसेन. ३ कमळा.**
**४ चंद्रशेखर. ५ विजया. ६ नगरवासी जन.**

( सुवर्ण पुरांतील राजवाड्या समोर रथ उभा आहे, सर्व स्वारीचा सारला थाट जाहला आहे, मयुरध्वज राजा सर्वत्रां जवळून निरोप घेत आहे, चंद्रशेखर, विजया, शूरसेन वगैरे त्याशीं मंडळी उभी आहे. कमळा मयुरध्वजाशीं भेटते. )

**मयुर**—( कमळेला उराशीं लावून ) बाई, कमळे, अशीच आनंदांत रहा तुजवर आलेलें घोर संकट तुझ्या सदाचरणानें दूर झालें, तूं जगदंबेवर एकनिष्ट भाव ठेवून या संकटांतून मुक्त जाहलीस. बाई गे, एकनिष्टनें भगवंतावर विश्वास ठेवून राहिलें असतां परमेश्वर अगदीं दूर नाहीं, सत्याचा परिणामीं जय आणि अधर्मानें वागणाऱ्या पापी लोकांस ह्याच जन्मीं दुःख व परलोकीं नर्क ह्याच

हाच सिद्धांत समज. ही नरतनू क्षणभंगूर आहे. आपल्या नशीबानें सुख मिळो किंवा दुःख मिळो, सुखाचे वेळीं उन्मत्तपणा किंवा दुःखाचे वेळीं अधिरपणा कधीं ठेवूं नये. दुःख, किंवा दारिद्र, हें सदां परमेश्वर प्राण्यावर ठेवीत नाहीं. स्वरूपाचा, धनाचा, किंवा कोणत्याही गुणाचा अभिमान प्राण्यानें स्वप्नांतही करूं नये. प्राण गेला तरी जावो पण नीचाशीं संगती, कालत्रयीं करूं नये, सर्प दंशानें जसा प्राणी जिवास मुकतो, तसेंच नीचाच्या संगतीनें प्राणी जगांत अघोर संकटांत पडून शेवटीं नरकाचा अधिकारी होतो. बाई, श्वशुर गृहीं स्त्रियाना सासू सासरे, हे प्रत्यक्ष श्रीगुरूचे ठिकाणीं आहेत. त्यांच्या कृपेनें संसारांत सर्व सुखें मिळून अंतीं सुकीर्ती व सद्गती प्राप्त होते. बाई, गे तूं सर्व गोष्टीनें शहाणी आहेस आतां मी जातों.

कम.– ( डोळ्यांत अश्रू आणून ) बाबा, माझ्या मातेच्या चरणावर माझा अनन्यभावें नमस्कार सांगा बरें. (पुन्हां डोळे पाण्यानें भरून येतात. ) रथ चालूं लागतो.

शूर.– ( नमस्कार करितो. )

मधुर– तुमचें कल्याण असो. ( नागरिकजन पुष्पांचा वर्षाव करितात. )

( पडदा पडतो. )

## अंक ५. प्रवेश ९ वा.

## सुवर्णपुरांतील रंग महाल.

१ चंद्रशेखर..................( राजा. )

२ विजया....................( राणी. )

३ मथुरा.....................( दासी. )

४ मैना.......................( ,, )

( विजया राणी बसली आहे दासी पंख्यानें वारा घालीत आहेत. )

राणी–मथुरे किती वाजले असतील ग!

मथु.– बाईसाहेब दहा वाजून जाऊन अकराचा सुमार जाहला आहे.

**राणी**—परमेश्वरा, तुझीच कृपा आह्मां जिवांवर असली पाहिजे हेंच खरें, नाहींतर ह्या जगांत कोणत्या वेळेस मनुष्यांवर कसा प्रसंग येईल याचा अगदीं नियम नाहीं. पहा बरें आमच्यावर जो प्रसंग गुदरला होता, तो आमच्या स्वप्नि तरी यावा काय? परंतु तुझी अगाध लीला आहे. भक्तांचें सत्व पाहाण्या साठीं अनेक लीला तूं करितोस, व त्यांतच दुष्ट जनाला चढवून शेवटीं शिक्षाही तूंच देतोस. (*इतक्यांत चंद्रशेखर राजा येतो व विजया उभी राहते.*)

**राजा**—कां? आज स्वारी कांहीं खोल विचारांत होती असें वाटतें.

**राणी**—प्रिया, कसचा विचार आपल्या पायाची वाट पहात बसलें होतें, स्वारीलाही आज विलंब लागला, तेव्हां मनाला अगदीं करमेनां तेव्हां कमळा बाईला तरी घटकाभर बोलवावें ह्मणून मथुरीला तिकडे पाठविणार होतें इतक्यांत हे पांय दृष्टीस पडले.

**राजा**—प्रिये, आपल्या कमळा बाईची तर गोष्टच निराळी तिची मूर्ती तर सदोदित सर्वकाळ ह्या हृदयांतच बसली आहे, परमेश्वर करून तेव्हढें येकदां माझ्या मना सारखें जाहलें कीं मग आनंदास पारावारच नाहीं.

**राणी**—प्रिया, अशी ती कोणती गोष्ट? ती तरी ह्या दासीला कळूंद्या! आपणास ह्या पेक्षां जास्त आनंद होणार, तेव्हां हल्लीं पेक्षां जास्त आनंद देणारी गोष्ट अशी ती कोणती, ती मला अवश्य कळली पाहिजे, येखादा नवीन देश आपण काबीज करणार किंवा आपल्या ताब्यांतील प्रदेशांत कोठें कांहीं अपूर्व रत्नाचा शोध आपणास लागला आहे किंवा येखाद्या नविनच प्रकारच्या हिऱ्याची खाण निघणार आहे किंवा अपूर्व विधात्यानें घडलेली अशी येखादी नवी वधु आपण करणार आहांत कीं काय! हें तरी सांगा.

**राजा**—प्रिये आतां आणखी कोणता नवीन देश सर करावयाचा बाकी आहे, आज पर्यंत हजारों देश काबीज केले, कोण्यावश्री रूप-

यांचा संग्रह केला, तुझ्या सारख्या लावण्य लतिकेचा उपभोग घेतला, आतां जी मुख्य हौस पूर्ण होणें आहे ती जाहली ह्मणजे संपलें.

**राणी**–( हनवटीस हात लावून ) सख्या ह्या पेक्षां मेली आतां कोणती हौस या मनाची पूर्ण होणें बाकी राहिली आहे ती मला कळली पाहिजे, तेवढी ह्या दासीला सांगाल काय !

**राजा**–वेडे या जगांत पशु प्रमाणें जन्मभर या क्षणीक आणि नाशीवंत अशा विषयादिक सुखांतच रममाण होऊन राहणें हेंच आपलें कर्तृत्व समजतेस काय !

**राणी**–सख्या आज बाई हें काय नवीनच विचार आपल्या मनास सुचले आहेत, मग आतां ह्या सर्व सुखांस सोडून देऊन येखाद्या मोठ्या घोर अरण्यांत जाऊन बसल्यानें का सुख होणार ?

**राजा**–शाश्वास येकंदरीत सुखा साठीं घोर वनांत जाऊन बसतात हें तुला ठाऊक आहे, प्रिये तुला ठाऊक असतां मग कां बरें असें उगीच वेड घ्यावें.

**राणी**–जा मेलें मी नाहीं जाऊन देणार असलें सोन्या सारखें ऐश्वर्य सोडून वनांत जाऊन बसण्यांत काय अर्थ आहे.

**राजा**–प्रिये अग अज्ञान तें यालाच ह्मणतात, प्राणि समजून उमजून ह्या विषय लालचित पडतो, मेरे पर्यंत विषय वासना दूर होत नाहींत असें होतां होतां आपल्या खऱ्या स्वरूपास विसरून दीन, दुर्बल, बुभुक्षित, दरिद्री बनतो, तरी देखील ही विषय भ्रांती त्याची दूर होत नाहीं, येवढेंच नाहीं पण मग पुढें या जिवास ब्रह्मराक्षस पिशाच् होऊन नीचपणानें युगान युग फिरण्याचें याचे कपाळीं येते, अनंत जन्म पर्यंत पश्वादिक व कीटकादिक योनींत जन्म घेऊन मलमूत्र नरक भक्षण करावें लागतें, तरी देखील आपलें खरें स्वरूप कोणतें हें ओळखत नाहीं, व ह्या सर्व अनर्थास कारण आपण आहांत आपल्या नादानें ही दशा प्राप्त होते.

**राणी**–काय मी? प्रिया सर्व प्राणिमात्राची अशी दशा करण्यास माझा

काय संबंध?

**राजा**–(हंसून) वेडे तूं ह्मणजे तुह्मीं स्त्रियाच कारण होतां.

**राणी**–महाराज आह्मीं कशा कारण होतों? आह्मीं बिचाऱ्या अबला ज्याच्या पदरीं टाकल्या त्याची जन्मभर सेवा चाकरी करावी, आपला स्वामी ज्या रीतीनें वागवील तसें वागावें, तो सुख देवो अथवा दुःख देवो तसें भोगावें, असें असतां आह्मी स्त्रिया त्या अनर्थास कारण आहोंत असें कसें होईल बरें?

**राजा**–सखे जरी ह्या बाह्य दृष्टीनें तुह्मीं अबला आहांत तरी सर्व गोष्टीनें ह्या जगांत प्रबलत्व तुमचेंच आहे, तुह्मी जर नसतां तर आह्मीं ह्या जगांत उत्पन्नच कोठून होतों, ह्याचाच विचार कर बरें. सखे तूं शहाणी आहेस. जगनियंत्यानें प्रथमारंभीं सगळे पुरुषच आपल्या सत्तेनें निर्माण करून या भूतलावर सोडले, व त्यांनीच कांहीं नियमित काल पर्यंत राहून आपल्या आयुष्याची काळकर्मणुक करावी अशी जगनियंत्याची त्यांना आज्ञा झाली, पण येव्हढ्यानें त्याचा हेतु सिद्धीस जाईना? सृष्टीचीं कर्मे योग्य रीतीनें कोणीच करीनात असें जाहलें. ज्याला त्याला आपल्या मरणाची भिती उत्पन्न होऊन जो तो परमेश्वर चरणीं रममाण होऊं लागला, संसार नाहीं, विचार नाहीं. कारण अशा स्वस्थ व क्षणभंगूर अशा देहाचें वैराग्य निरंतर त्याच्या मनांत उत्पन्न होऊन अभिष्ठा प्रमाणें त्याची स्थिती जाहली. सारांश जगांतील व्यवहार सारे बंद होऊन शून्यवत स्थिती त्याची बनली तेव्हां आतां ही आपली खटपट निर्थक होते अशा विचारांत तो परमात्मा गुंग जहाला तेव्हां त्याच्याच सत्तेनें ही आदिमाया उत्पन्न होऊन तिनें ही सृष्टी आपल्या सामर्थ्यानें चालविण्याचा विडा उचलून ह्या भूतळीं आली. मग काय विचारतेस, ज्ञान कसलें व वैराग्य कशाचें. ह्या सर्व गोष्टींचा येकदम विसर पडल. देवादिक सुर गण ह्या मायेच्या मोहास भुलून येकदां नाहीं पण लक्षावधि वेळ जन्म घेण्यास कबूल जहाले हिच्या साठींच मरावें, व पुन्हां हिच्या साठींच जन्मावें, अशी

स्थिती त्यांची होऊन गेली. इच्या सौंदर्यानें वेडे होऊन त्या सुर-गणांची अशी स्थिती जहाली कीं, त्याच मायेनें ह्यांना प्रत्यक्ष स्त्रिया करून सोडल्या तरी इखोल आपल्या स्वरूपाचा विचार न करितां त्या मायेच्याच गळीं पडले, मग त्या वेळीं त्या मायेनें आपला पगडा बसवून आपण पुरुष रूपानें त्यांना भोगूं लागली. आधींची ही अबला व मग तिचें प्रबलत्व कसें जहालें हें तूं समजलीस ना?

**राणी**–प्रिये, ह बाई ब्रह्मज्ञान मला कांहीं समजत नाहीं, पण मी मात्र आपल्या पायांस सोडणार नाहीं.

**राजा**–( हंसून ) सखे, तूं कशी सोडशील तूं आणि मी ज आज पर्यंत या विषयादिक सुखाचा उपभोग घेतला त्याची शिक्षा भागण्या करितां पुढें पश्वादिकांची नीच योनी धारण करून येथील सुखाची फेड जाहल्या वांचून तूं मला सोडणार नाहींस हें उचितच आहे.

**राणी**–काय बाई बोलावं कोण जाणें, मला तर बोलण्यास आज कांहींच सुचत नाहीं, सख्या मी आपणास पश्वादिकांच्या योनीप्रत कशी नेणार? व आपण महापुण्यवान् भाग्यशाली असतां असलें मलें नीच शरीर तरी तुह्मांस व मला कशास्तव धरावें लागेल, व अशीच गोष्ट होणार हें आपणास तरी कोणी सांगितलें हें कृपा करून आपण मला सांगा. खरेंच बाई आज पर्यंत आत्मज्ञान, आत्मज्ञान असं कांहीं मी ऐकिलें आहे खरें, परंतु तें बाई मला कांहीं बरोबर समजलें नाहीं, तर आतां तें काय आहे, हें आपण सांगाच. प्रिया खरोखर आज आपला विषय मोठ्या मौजेचा निघाला, आपण मरण पावल्या नंतर आपली स्थिती कशी होणार व आपणास वाईट स्थिती न येण्याबद्दल आपण काय केलें पाहिजे हें मलं सांगाच.

**राजा**–( आपल्या मनाशीं अरे ह्या अज्ञान स्त्रिची भ्रांती आतां मी एकदम दूर कशी करावी? असो; ज्या अर्थीं इला उत्तम विषय समजून घेण्याची उत्कृष्ठ इच्छा जाहली आहे हें तरी इच्या पूर्व पुण्याइचेंच फळ होय. तर इला आतां सांगावेंच, परंतु इच्या अधिकारा

प्रमाणेंच सुलभ सुलभ गोष्टी सांगून इची समजूत केली पाहिजे; कारण इला हें ज्ञान समजल्यावांचून आपलीही सुटका होणार नाहींच, इला समजविण्यांतच आपलें अर्धें कार्य होणार आहे.) प्रिये मी तुला नुकतेंच सांगितलें कीं, ती परमेश्वर शक्ति आदिमाया जेव्हां ह्या तुमच्या स्त्रियांचें अनिवाररूप घेऊन भूतळीं आली, तेव्हां तिला पाहतांच ह्या मृत्युलोकींचे सर्व लोक तिच्या सौंदर्यास पाहून भुलून गेले; सर्वांना तिच्या सहवासाची गोडी लागली, जिकडे जिकडे तिनें फिरावे तिकडे तिकडे ह्यांनीं वेड्याप्रमाणें तिच्या मागें मागें हिंडावें, तिला हरण करून आपल्या ताब्यांत ठेवावी ह्या हेतूनें आपआपसांत तंटा भांडण करूं लागले, तिच्या साठीं मरूं लागले, ही स्थिती पाहतांच त्या आदिमायेनें प्रथमारंभीं जगन्नियंत्यास वश करून त्याची सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली मग काय विचारतेस, त्या सत्तेनें तुजसारख्या लक्षावधि सुंदरी उत्पन्न करूं लागली व पुरुषही तीच प्रसवली, नंतर स्त्री पुरुषांचा परस्पर संबंध करून, अनेक ब्रह्मांड आ[illegible] सत्तेनें चालवूं लागली, तिच्या सुखांत स्वर्गींचे देवसुद्धां रममाण होऊं लागले, ती जिकडे झुगारून देईल तेथेंच पडून राहण्यांत सुख मानूं लागले! लक्षावधि वेळेस स्वर्गांतून ती येथें आणते, व लक्षावधि वेळेस स्वर्गीं पोहोंचविते. तिच्या स्वरूपाच्या नादीं जे लागतात त्यांनाच ती या मृत्यु लोकीं जन्मास आणून शोक दुःखाच्या तडाक्यांत घालून अनंत काळ पर्यंत रडविते, तरी देखील जीव तिच्या अघोर कृत्याचा विचार करित नाहीं, [illegible] जिकडे नेईल तिकडे जाण्यास हा अज्ञान जिव प्रवृत्त होतो, मग पश्वादिकांची भयंकर स्वरूपें धारण करविते तरी तेथें ही याला विषयाची भ्रांती असतेच. हा भ्रांतीतून दूर होण्यास असमर्थ होतो. पश्वादिक देह धारण करून अनंत कालपर्यंत हा जीव तेथें अनंत जीवांचा नाश करित असतो, तसतसा त्या त्या [illegible] स्थितीला पोहोंचून शेवटीं कीटकादिक

देह लक्षावधि वेळ घेतो. अनेक जीवांचा आहार बनतो, व ह्याही अनेक जीवांचा आहार करतो, अशी विपरीत स्थिती प्राप्त झाल्यावर, प्रिये त्या दुःखांचें वर्णन काय करावें! मग तसल्या अमंगळ शरिरीं ज्ञान कोठून आणावें? जो देह मिळेल तो घेतल्यावांचून सुटकाच नाहीं? कधीं व्याघ्र होऊन इतर पश्वादिकांना मारावें कधीं आपण पश्वादिक देहाला येऊन व्याघ्र मुखीं पडावें, कधीं नर्क भक्षण करावें, कधीं नर्कांतच उत्पन्न होऊन त्यांतच मरावें! प्रिये, अशी स्थिती ह्या जीवाची होऊन जाते, व हा सारा अनर्थ होण्यास मूळ कारण तुमची संगती, प्रथमारंभीं तुमचे हे नेत्रकटाक्ष मोठे गोड लागतात, परंतु ह्या कटाक्षबाणाच्या वेधांतून कां या नरदेहीं हा प्राणी सुटला नाहीं तर मात्र त्याच्या शोक दुःखास पारावारच नाहीं.

**राणी**–प्रिया, जगांतील प्रत्येक मनुष्यांच्या घरीं आमच्या सारख्याच स्त्रिया कोठें असतात? कोठें तर अंधळ्या, पांगळ्या, काळ्या कुरूप अशा शेंकडो स्त्रिया ह्या जगांत आहेत मग ते लोक ह्या असल्या दुःखरूपी मायेंत कां पडतात?

**राजा**–प्रिये, तूं ह्मणतेस हें खरें, परंतु त्या अज्ञानी लोकांस कोठें त्यांचा तरी कंटाळा येतो, ते त्यांच्याशीच सुख मानून घेतात. त्यांच्या डोळ्यांनें तर त्या त्यांना रंभेपेक्षांही जास्त प्रिय वाटतात. अग तुला नुकतेंच सांगितलें कीं, ह्या स्त्रियांच्या सहवासाचा असा कांहीं विलक्षण चमत्कार आहे कीं, प्रिये, प्राण्यांचें मनुष्यशरीर जाऊन पश्वादिक स्थिती प्राप्त होऊन तो जीव व तेथेंही तीच इच्छा करितो, मग त्याला आपली वासना पश्वादिकांच्या देहांतच पूर्ण करून घ्यावी लागते हें आपण डोळ्यांनीं पाहातच आहोंत कीं नाहीं?

**राणी**–काय बाई चमत्कार आहे!! प्रिया, मग असें झाल्यानें त्या मायेस यापासून काय फायदा झाला? तिलाही ह्यांना फसावावयासाठीं अनेक जन्म घ्यावें लागतात. हे ज्या शरिरीं जातील तेथें इलाही तो जन्म घेऊन तेथें त्यांची संगती करावी लागते, मग

तेथें जसें सुख किंवा दुःख तें इआही त्यांच्या प्रमाणें भोगावें लागतें, असेंच कीं नाहीं?

**राजा**—हो तूं ह्मणतेस असेंच बहुत करून खरें.

**राणी**—प्रिया असें हो काय? बहुत करून खरें ह्मणजे काय? मला बाई समजावून सांगा.

**राजा**—अग मी तुला नुकतेंच सांगितलें ना, जीवच अज्ञान भ्रांतीनें पुरुष व स्त्रियाही तोच बनतो. प्रत्येक जीवाजवळ त्या महा मायेला जाण्याची काय जरूर.

**राणी**—प्रिया मग असें जर आहे, तर मग आह्मी स्त्रिया या अनर्थास कारण आहोंत, असं जें आपण ह्मणतां तें कसें बरें शोभेल? जे तुह्मी त्याच आह्मी! जें सुख तुह्मी भोगता तें आह्मालाही भोगावें लागतें.

**राजा**—मग असेंच खरें, अग तुह्मी ह्मणजे काय? मायेचा मोठेपणा त्यांत येवढाच कीं हा जीव वश करण्यास्तव प्रथमारंभीं इनें हें विलक्षण मोह उत्पन्न करणारें जें स्त्रीशरीर तें प्रथमारंभीं इनें रचिलें, व याच्या द्वारें जीवाला भ्रांतींत टाकून तिला आपलें इच्छित कार्य साधण्यास हीच युक्ती बलवत्तर जाहली, मूळ नरदेही भ्रम उत्पन्न करणारें हें शरीर; या नादीं लागला ह्मणजे मग पुढें सर्व तऱ्हेचीं दुःखें सोसण्यास हा जीव तयार होतो; मग ती ज्या ज्या नादीं लावील तिकडे तिकडे तिच्या मरजीनुरूप वळतो, व मग एक देह नाहीं पण सहस्त्रावधि देह धारण करावें लागतात, हें तुला वर सांगितलेंच आहे, व स्वतः नुकतांच तुला आणि मलाही अनुभव आलाच आहे, ह्या राज्यावर केवढें मोठें संकट येऊन गुदरलें होतें! येवढा जो अनर्थ जाहला त्याचें कारण हेंच कीं दुसरें?

**राणी**—( अश्रुनें डोळे भरून आणते. ) प्रिया खरेंच बाई ह्या जागांत कांहीं सुख नाहीं. जेथें सुख तेथेंच दुःख अशी माझी पूर्ण खातरी झाली.

**राजा**—प्रिये तूंच ह्मणालीसना कीं असलें सुवर्णासारखें ऐश्वर्य सोडून वनांत जाऊन बसण्यांत काय अर्थ आहे?

**राणी**–हो, मीच ह्मणालें, मग वनांत बसल्यानें हा अनर्थ दूर कशानें होणार? कारण हें सुख किंवा दुःख देण्याची सत्ता त्या परमेश्वराच्या हातची पडली, तो जसा ठेवील तसें राहिलें पाहिजे. वनांत जाऊन बसल्यानें काय सुख होणार, वनांत दुख नसतें काय? हें तरी सांगा?

**राजा**–[ हंसून ] वेडे, अग अझून तुझे जसेंचें तसें अज्ञान कायम आहे, तूं अझून पुरतें समजली नाहींस? समजल्यावर हा मग तुझा हट्ट मुळींच राहणार नाहीं.

**राणी**–प्रिया, खरेंच माझी अझून पुरती समजूत झाली नाहीं तर कृपा करून येवढें मला सांगाच.

**राजा**–[ मनाशीं ] [ स्त्रिया ह्मणजे प्रत्यक्ष अज्ञानाची खाणी, त्यांचें अज्ञान एकदम दूर होणें फार कठीण आहे, तरी त्यांतून ही शहाणी आहे इला आणखी थोडें तरी सांगून इची समजूत करणें अवश्य आहे, असा विचार करून सांगतो. ] प्रिये, वनांत जाऊन बसल्याशिवाय सुख होणेंच नाहीं, प्रथमारंभीं तूं अशी कल्पना कर, वनांत जाऊन बसणें ह्मणजे काय? हें तूं समजलीस, तरी येथील या प्रपंचांतील सर्व वासनेंतून आपलें चित्त काढून घेऊन निर्विषयीं असे जे सच्चितानंदवन त्या वनाची इच्छा ह्या मनास झाली पाहिजे, येथील सर्व लोभ दूर झाल्यावांचून त्या वनांत कसें जाववेल? येवढ्यां करितां प्रथमारंभीं येथें या मनांवर जी द्रव्यदारादि सुखें मनास भासमान झालीं आहेत, व जीवानें सर्व सुख जें याच ठिकाणीं मानिलें आहे तें खरें सुख नाहीं, परिणामीं हेंच भयावह होणार अशा गोष्टींचा निरंतर विचार केला पाहिजे; करितां येथील सर्व सुखांचा त्याग केल्यावांचून हा मोह कसा तुटेल? कारण जोपर्यंत आपण येथील सुखाचा उपभोग घेणार तोपर्यंत तें सुख आपणास वाटेल त्याचा कंटाळा

आपणास कधींही येणार नाहीं व ह्या मनाची इच्छा तृप्त कधींही होणार नाहीं; व हीं सुखें आपणास नियमित काळपर्यंतच मिळणार आहेत, तो नियमित काळ संपला ह्मणजे हीं सर्व सुखें सोडून आपणास चालती होतील व हें मन तर नेहमीं सुखाचीच इच्छा करितें, दुःख त्याला सहन होत नाहीं, हें तूंही जाणतेस. मग हें मन त्या सुखाच्या नादीं लागून विलक्षण भ्रमांत पाडणें; आपली पुण्याई संपली, आतां आपणांस सुख कोठून मिळणार हा विचार त्यास मुळींच राहत नाहीं व आपला देह अशाश्वत आहे हें सुध्दां हा जीव विसरतो; मग येखादे वेळीं येथील सुखें कायम असतांना ही, हा देह जाऊं लागला ह्मणजे याला तीं सुखें सोडून जाणें अत्यंत कठीण वाटतें; तो देह राहावा ह्मणून अनेक प्रयत्न करितो, भितो रडतो येथील सुखें भोगण्यास्तव गायावाया होतो, दिन दुर्बळ बनतो, परमेश्वराची शक्ति सर्व विसरून यःकश्चित याच्याच प्रमाणें दुसरा जिव त्याची प्रार्थना करितो कीं, अरे, मला कोणी वांचवा, मला हीं सुखें सुटतात परंतु त्याला वांचविण्याची शक्ति त्या प्रभूवांचून इतराची आहे काय? तो आपल्या सत्तेनें घेऊन जातो तरी त्या देहांतील तो जीव सर्व वासनेनें जर्जर झालेला व त्याची पुण्याई संपूर्ण संपलेली असतांनाही, तींच सुखें पुन्हां इच्छितो, तेव्हां तीं सुखें नाहींत, दुखें आहेत, याचा अनुभव पहावा ह्मणून परमेश्वरास याच्या इच्छेनुसार अनेक जन्म त्याला देणें भाग पडतें, मग हा जिव तीं सुखें भोगण्यास अनेक वेळां जन्म धारण करितो पण एकदां जें सुख ज्या पुण्याईनें यानें भोगिलें तेंच भोगिलें, पुन्हां तें याला प्राप्त कोठून होणार, पण हा भ्रम त्याचा मिटत नाहीं, मग जातां जातां वर सांगितलेल्या दुर्दशेला पोंचतो; येव्हढ्या करितां आपली पुण्याई कायम असतां व हे मनुष्य शरीर सुरक्षित असतांनाच ह्या गोष्टींचा विचार मनुष्यानें केला पाहिजे; व ह्या सर्व दुःखांतून वांचले पाहिजे;

ह्यांतून कां एक वेळ तो चुकला कीं ह्या वर सांगितलेल्या विपत्तींत पडलाच! सुख किंवा दुःख प्राप्त होण्यास कारण आपणच आहोंत, हें तूं आतां तरी समजलीस ना?

**राणी**--अहा! काय बाई मजेचा विषय. अशा गोष्टी मी आजपर्यंत कधींही ऐकिल्या नव्हत्या. प्रिया, खरोखर ह्या गोष्टी ऐकल्यानें आज माझें फार समाधान झालें.

**राजा**--अग, इतर मौजप्रमाणें ही मौज नव्हे. लक्ष चौऱ्यायशीं दुःखरूपीं जन्मांतून मुक्त करण्याचा हा विषय आहे. ह्याचा निरंतर विचार करणें हेंच आपलें ह्या जगांत कर्तव्यकर्म आहे, बाकीच्या सर्व गोष्टी दुःखरूपीं आहेत त्या क्षणभर गोड वाटतात, परंतु परिणामीं सुखाचा लेश सुद्धां ह्या संसारीं नाहीं. असें तुला वाटतेंना?

**राणी**--प्रिया, खरोखर चला आपण हे सर्व सोडून वनांत जाऊं?

**राजा**--वेडे, पुन्हां भ्रमांत तूं अशी कां पडतेस? आधीं या अनंत वासना ज्या तुझ्या मनांत भरल्या आहेत, त्या तूं आधीं क्रमाक्रमानें दूर कर, तरच तूं त्या निरतिशय आनंदवनांत जाण्यास पात्र होशील. ही गोष्ट सहज नव्हे, ती गोष्ट तुह्मां स्त्रियास साधणें फार कठीण आहे.

**राणी**--प्रिया, एकंदरींत तुमचा बेत मला टाकून जाण्याचा दिसतो; मी आपल्या बरोबर आल्यावांचून कधींही रहाणार नाहीं.

**राजा**--सखे. पहा पुन्हां तुझी बुद्धि जशीच्या तशीच आहे. तुला यांतील खरें इंगित अजून देखील कळत नाहीं. अग मी आणि तूं ही भ्रांती आधी सोड, पहा; हीच वासना आणि हाच भ्रम. खरें पाहतां विचार कर, तुझा आणि माझा कांहींच संबंध नाहीं, आणि संबंध नाहीं ह्मणावा तर तूं आणि मी एकच आहोंत. तूं ह्मणतेस "मी जाऊं देणार नाहीं, उद्यां माझें आयुष्य संपलें आणि

हा देहच टाकण्याचा प्रसंग आला तर त्यावेळीं तूं मज बरोबर कशी येणार? कदाचित् येथील दृष्टीनें मजकरितां तूं आपला देह सोडलास तर देह सोडल्यानंतर तूं ही जीव आणि मीही जीव. मग तेथें स्त्री पुरुषांचा संबंध कोठें राहिला? तर ही भ्रांती तुझी मिटल्यावांचून तूं वनांत जाण्यास पात्र नाहींस. येथेंच राहून हा लोभ, हा मोह जिंकला पाहिजे, मी जी आज्ञा करीन तीच प्रमाण मानून त्यावर पुर्ण श्रद्धा ठेवून वागशील तर तुझेंही कार्य होऊन या सर्व सुखदुःखांतून तूं मुक्त होशील.

**राणी**–खरोखर आजपासून तुह्मी मला जसें सांगाल त्याचप्रमाणें मी वागेन. आपल्याशीं हट्ट कधींही करणार नाहीं; पण आपण केव्हां जाणार हें तरी मला सांगाल ना? कां तेंही नाहीं.

**राजा**–( हसून ) वेडे ज्ञानानें विचार केला असतां तेंही सांगण्यास मी असमर्थ आहे, परंतु व्यवहारास अनुसरून पाहतांना तुला सांगितल्यावांचून मी कसा बरें जाईन? आपल्या शूरसेनास मुलगा झाला ह्मणजे मी या पाशांतून सुटलोंच! शूरसेनास गादीवर बसवून मग आह्मी आपले स्वस्थपणें तपश्चर्येस जाणार व अशी आपली पूर्वापार नीतीच आहे.

**राणी**–प्रिया, खरंच बाई बरी आठवण झाली. मी सुद्धा पुरणांतरीं पुष्कळ ठिकाणीं आपण सांगतां असेंच ऐकिलें आहे कीं, पूर्वींचे सुद्धां आपल्या सूर्यवंशांतले व चंद्र वंशांतले राजे हजारों वर्षें राज्य करून शेवटीं तपश्चर्येला ही जात होते, परंतु प्रिया, माझी मेली थोडीशीं विनंती आहे मला ठाऊक नाहीं ह्मणून विचेरितें त्याची क्षमा असावी.

**राजा**–सखे, अग निःसंशय विचार, अशी लाजतेस कां? तूं शहाणी आहेस मी जाणतों, तूं निरर्थक कांहीं विचारणार नाहींस. हें विचार

पाहूं !

**राणी** —प्रिया, विचारणें ह्मणजे इतकेंच कीं, त्यांच्या बरोबर स्त्रियां-सुद्धां तपश्चर्येला जात होत्या कीं नाहीं? येवढं मला सांगा, कारण या विषयांची माहिती माझ्या कोठेंही ऐकण्यांत नाहीं.

**राजा**—येवढाच कां तुझा प्रश्न? हा प्रश्न तूं करणार हें मी जाणतच होतों. प्रिये, अझून तुला हें ज्ञान संपूर्णपणें झालें नाहीं. आज सहज तुला या मनोरंजक विषयाची माहिती व्हावी ह्मणून, सोप्या रितीनें तुझी हल्लींची गृहण शक्ति किती आहे हें जाणूनच थोडीशी माहिती सांगितली, पुढें तुझी बुद्धि हा विषय समजून घेण्या-विषयीं जस जशी अधीक वाढत जाईल तस तशी तुझीही सर्व भ्रांति दूर होत जाईल. प्रिये, आतां थोडक्यांत तुला ह्या प्रश्नाचें उत्तर येव्हढेंच देतों, तें हें कीं, पूर्वीचे लोक तपश्चर्येला जात असत त्यांच्या बरोबर स्त्रियां बहुत करून जात नव्हत्या व न जाण्याचें कारण येवढेंच कीं, स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या शरीराचा तसाच स्वभावाचा विचार करूं गेलें असतां, त्यांत महदंतर आहे. प्रथमारंभीं त्यांचें शरीर अत्यंत नाजुक असल्या शरीरानें शम, दम, शांती, तितीक्षादि संपत्ति प्राप्त करून घेण्यास फारच कठीण पडतें, कारण हे गुण येण्याला मनोनिग्रह कांहीं निराळाच लागतो व तो तर यांना मुळींच परमेश्वरांनीं दिला नाहीं, तेव्हां त्या ह्या कामांत प्रवृत्त होऊनही काय उपयोग? कारण त्या मूळच्या भित्र्या कोमल अंतःकरणाच्या असतात. सुखासाठीं पुढें व दुःखाच्या वेळीं मागें हटावें हा त्यांचा स्वभावधर्मच पडला, त्यांत ईश्वरानें स्त्रियांना पुरुपांपेक्षां अधिक सौंदर्य दिलें आहे, त्यामुळेंच त्यांची स्वतंत्रता नष्ट झाली. स्त्रिसौंदर्य हें प्रत्येक मनुष्याच्या मनास मोह उत्पन्न करणारी सर्वांत श्रेष्ट वस्तु आहे. तिच्यावर प्रत्येक मनुष्याचा डोळा असतो! तेव्हां त्यांना पारतंत्र्य स्थिती येण्याला सौंदर्य उपा-

षिच कारण झाली व येवढ्यांसमुळें त्यांना स्वतंत्रता न देतां त्यांना पुरुषांच्या ताब्यांत दिलें आहेत; त्यांच्या सर्व सुखदुःखाचें ओझें मनुष्यावर आहे. स्त्री जर अधर्मानें वागिलशी तर तिच्या सर्व पापाचें ओझें तिच्या पतीचे डोक्यावर आहे; ती आपल्या पापानें पतीस अधोगतीस पोंहोचवील; मग तो पुण्यवान् कां असेना त्याची सर्व पुण्याई निरर्थक होणार स्त्री सदाचरणीं असली तरच पुरुषांची सर्व कार्ये शेवटास जातील व तो जें कांहीं पुण्य संपादन करील त्या पुण्याईत इचा अर्धा भाग मग तो धर्म करो, तपश्चर्या करो, कांहीं कां करीना त्यांत इचा अर्धा भाग आहेच. अशी नीतीच आहे, व तूं साधारण व्यवहारांत पहातेस कीं नहीं? पुरुषानें कितीही प्रयासानें द्रव्य संपादन केलें तर द्रव्याचा उपभोग कोण घेतो? स्त्रीच कीं नाहीं? त्याचप्रमाणें ही गोष्ट तूंच सांग बरें. स्त्रियांना वनांत जाऊन तपश्चर्या करण्याचें काय कारण आहे? अग, त्यांचा मुख्य धर्म हाच कीं, त्यांनीं आपल्या पतीच्या आज्ञे-प्रमाणें वर्तन करणें त्याप्रमाणें वर्तन स्त्रीचें असलें ह्मणजे झालें, मग ती घरीं राहवो किंवा पती बरोबर वनांत जावो; दोन्हीं गोष्टी सारख्याच; मुख्यत्वें करून या गोष्टीची काळजी पुरुषानें ठेविली पाहिजे व स्त्री त्याप्रमाणें वागली ह्मणजे सहजच ती जन्म मुक्त होणार.

राणी —प्रिया अहा! हा आज परमेश्वराचे मजवर फार आभार झाले, आजचा विषय ऐकून मनाची अत्यंत समाधानवृत्ति झाली. मी बाई नेहमीं आतां ह्याच विषयावर बोलत जाईन.

राजा—प्रिये तुझी जर अशी इच्छा आहे तर मी तुला अवश्य सांगेन व तुला सांगणें हा माझा धर्मच आहे. असो, आज या भाषणांत बरीच रात्र उलटून गेली. प्रभात काल समीप आला आहे, तर

थोडी तरी विश्रांति घेतली पाहिजे.

राणी–[ हंसून ] माझाही अज्ञान अंधःकार दूर होऊन ज्ञानाचा प्रभातकालही आजचाच नव्हे काय ?

( असें ह्मणून राजा व राणी शय्यास्थानीं जातात )

[ पडदा पडतो. ]

समाप्त.

